इचलकरंजी ICHALKARANJI ▶ वर्ष - ४१ ▶ अंक - १९२ ▶ शनिवार,ता.१५ नोव्हेंबर २०२५ ▶ पाने १२
इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### कार दरीत कोसळून पाच ठार

भोपाळ,ता.१४-

मध्य प्रदेशातील रतलाम येथील दिल्ली-मुंबई एक्सप्रेस वेवर येथे शुक्रवारी एक वेगाने जाणाऱ्या कारचे नियंत्रण सुटून ती दरीत कोसळली. या अपघातात कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. सदरची घटना सकाळी सुमारे आठ वाजता घडली आहे. रावटीपासून १० किलोमीटर अंतरावर भीमपुरा गावाजवळ माही नदीच्या पुलापूर्वी ही घटना घडली. एक्सप्रेसवेवर वाहन अचानक अनियंत्रित झाले आणि दरीत पडले.प्राथमिक तपासात अतिवेग हेच अपघातास कारण असल्याचे दिसून येत आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

### जळगावचे तापमान ९ अंशावर

जळगाव,ता.१४-

जिल्ह्यात थंडीचा कडाका प्रचंड वाढला आहे. जळगावचे तापमान थेट ९ अंश सेल्सिअस इतके खाली घसरले. यंदाच्या हंगामातील ही सर्वात निचांकी तापमानाची नोंद आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे ही परिस्थिती निर्माण झाली. हवामान विभागाने आगामी काळात जिल्ह्यात थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे. नोव्हेंबर महिन्यात थंडीची सुरुवात होते खरी, पण तापमान इतक्या कमी पातळीवर सहसा घसरत नाही. मात्र, यंदा अवकाळी पावसाची स्थिती संपल्यानंतर गेल्या आठवडाभरापासून जिल्हाभरात रात्रीच्या तापमानात चांगलीच घसरण झाली आहे.

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# एनडीएचा बिहारमध्ये ऐतिहासिक विजय

## महाआघाडीला केवळ ३४ जागा, काँग्रेसचा धुव्वा

■ पाटणा,ता.१४ –

**बिहार विधानसभा निवडणुकीच्या शुक्रवारी जाहीर झालेल्या निकालात भाजपप्रणीत एनडीए आघाडीला २४३ पैकी २०३ जागांवर विजय मिळाला आहे. तर ९० जागा जिंकत भाजप राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर राजद, काँग्रेस आणि सहकाऱ्यांची महाआघाडी ३४ जागांवर गुंडाळली गेली आहे.**

बिहार विधानसभेच्या २४३ मतदारसंघांमध्ये ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यांत मतदान पार पडले. या दोन्ही टप्प्यांत मिळून २ हजार ६१६ उमेदवार रिंगणात होते. मुख्य लढत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीविरुद्ध महाआघाडी यांच्यात होती, जनसुराज हा नवा पक्ष प्रथमच निवडणुकीत उतरला होता. एनडीएमध्ये भाजप, संयुक्त जनता दल, लोक जनशक्ती पार्टी (रामविलास), हिंदुस्थानी अवाम मोर्चा (धर्मनिरपेक्ष) उपेंद्र कुशवाह यांच्या राष्ट्रीय लोकदल मोर्चाचा समावेश आहे. दुसरीकडे, महाआघाडीमध्ये राष्ट्रीय जनता दल (राजद), काँग्रेस आणि भाकप सारखे पक्ष होते. बिहार विधानसभेच्या २४३ जागांपैकी बहुमतासाठी १२२ जागांची आवश्यकता असते.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर बिहार विधानसभा निवडणुकांच्या इतिहासात २०२५ मध्ये मतदारांनी नवा विक्रम प्रस्थापित केला. पहिल्यांदाच ६६.९१ टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्यात ६ नोव्हेंबर रोजी ६५.०८ टक्के मतदान झाले होते, तर दुसऱ्या टप्प्यात मंगळवारी ६८.७६ टक्के मतदान झाले होते.

राज्यातील २४३ जागांची आज मतमोजणी झाली. यामध्ये एनडीए आघाडीला २४३ पैकी २०३ जागा मिळाल्या गेल्या निवडणुकीच्या तुलनेत एनडीएला यंदा ८१ जागा अतिरिक्त मिळाल्याचे दिसून आले. गेल्यावेळच्या निवडणुकीत एनडीएला १२२ जागा जिंकता आल्या होत्या. पक्षनिहाय आकडेवारी पाहता भाजप राज्यात ९० जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. गेल्या निवडणुकीत राज्यात भाजपला ७४ जागांवर विजय मिळाला होता. म्हणजे यंदाच्या निवडणुकीत गेल्या वेळच्या तुलनेत भाजपला १६ जागा अधिक मिळाल्या आहेत. एनडीएचा घटकपक्ष असलेल्या नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाने (जेडीयू) देखील मोठा विजय संपादित केला आहे. जेडीयू गेल्या निवडणुकीत ४३ जागांवर विजय मिळवला होता. तर यंदाच्या निवडणुकीत जेडीयूने ८५ जागा पटकावल्या आहेत. गेल्या वेळच्या तुलनेत जेडीयूने ४२ जागा अधिक पटकावल्या आहेत. राष्टीय जनता दल (आरजेडी),काँग्रेस आणि सहकाऱ्यांच्या महाआघाडीला निवडणुकीत पराभवाचे तोंड पहावे लागले आहे. गेल्या निवडणुकीत ११४ जागा मिळवणाऱ्या महाआघाडीला यंदाच्या निवडणुकीत ८० जागा गमवाव्या लागल्या आहेत.महा आघाडीला यंदा केवळ ३४ जागा मिळताना दिसत आहे. गेल्या निवडणुकीत ७५ जागा जिंकणाऱ्या आरजेडीला २४ जागांवर समाधान मानावे लागले. तर काँग्रेसला अवघ्या ६ जागा मिळाल्या आहेत. गेल्या निवडणुकीत काँग्रेसला बिहारमध्ये १९ जागा मिळाल्या होत्या. यंदाच्या निवडणुकीत आरजेडीला ५१ आणि काँग्रेसला १३ जागांचे नुकसान सहन करावे लागले आहे.



पाटणा येथे भाजपा कार्यकर्ता जल्लोष करताना घेतलेले छायाचित्र.

| बिहार विधानसभा-२४३ | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एनडीए-२०३ | | | महाविकास आघाडी-३४ | | | इतर - ६ | |
| भाजपा | जेडीयू | इतर | आरजेडी | काँग्रेस | इतर | एआयएम/बीएसपी | |
| ९० | ८५ | २८ | २४ | ६ | ४ | ५ | १ |



पुन्हा एकदा सत्तेत



सत्ता स्थापनेचे स्वप्न भंगले

### मुस्लीम बहुल भागात एनडीएची सरशी

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) जोरदार कामगिरी करत आघाडी घेतली आहे. तर तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला या निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, मुस्लीम बहुल भागातही एनडीएला अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाले आहे.

#### मैथिली ठाकूर विजयी

बिहार निवडणुकीत सर्वात हायव्होल्टेज लढतींपैकी एक असलेली लढत म्हणजे, अलीनगर विधानसभेतील भाजप उमेदवार मैथिली ठाकूर हिने जिंकली आहे. मैथिली ठाकूर हिने आरजेडी उमेदवार विनोद मिश्रा यांचा ११ हजार मतांनी पराभव केला आहे. मैथिली ठाकूर हिला ८४,९१५ मते मिळाली, तर विरोधी उमेदवार विनोद मिश्रा यांना ७३,११५ मते मिळाली आहेत. लोकप्रिय गायिका मैथिली ठाकूर फक्त पंचवीस वर्षांची आहे आणि ती पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे.



### हवाई दलाचे प्रशिक्षण विमान कोसळले

■ चेन्नई,ता.१४-

**भारतीय वायुदलाचे एक पीसी-७ पिलाटस बेसिक ट्रेनर विमान शुक्रवारी नियमित प्रशिक्षण उड्डाणादरम्यान तांबरम,चेन्नईजवळ दुर्घटनाग्रस्त झाले. सुदैवाने पायलट वेळेवर सुरक्षित बाहेर पडल्यामुळे कुठलीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाले नाही.**

ही घटना तांबरम एअर फोर्स स्टेशनच्या जवळ दुपारी २ वाजता घडली. पिलेटस पीसी-७ एमके हे विमान नव्या पायलटांना प्रशिक्षण देण्यासाठी वापरले जाते.हे विमान नियमित प्रशिक्षण मोहिमेवर होते, तेव्हाच अचानक काही बिघाड झाला. पायलटने (पान २ वर)

## बिहारच्या जनतेने देशाचा मूड स्पष्ट केला-शहा

■ नवी दिल्ली,ता.१४-

**बिहारच्या जनतेने दिलेले प्रत्येक मत हे 'भारताच्या सुरक्षेशी खेळणाऱ्या घुसखोर व त्यांच्या समर्थकांविरोधातील मोदी सरकारच्या भूमिकेवरील विश्वासाचे प्रतीक' आहे. यामुळे बिहारच्या जनतेने देशाचा मूड स्पष्ट केला असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली.**



बिहार विधानसभा निवडणुकीतील निकालांचा राष्ट्रीय राजकारणावर मोठा प्रभाव पडत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मतदारांशी संबंधित मुद्यांवर जोरदार प्रतिक्रिया दिली.

अमित शहा म्हणाले की, काही राजकीय पक्षांनी व्होटबँकेसाठी घुसखोरांना वाचवण्याचा' प्रयत्न केला, मात्र बिहारच्या जनतेने त्यांना 'परखड उत्तर' दिले आहे. देशातील मतदार याद्यांची फेरतपासणी करणे आवश्यक आहे. याच्या विरोधातील राजकारणाला आता कोणतीही जागा उरलेली नाही असे शहा म्हणाले. राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस बिहारमध्ये शेवटच्या पायरीवर पोहोचल्याचा टोला देखील त्यांनी लगावला. बिहार हे देशातील महत्त्वाचे राजकीय राज्य मानले जात असल्याने तिथले संकेत राष्ट्रीय पातळीवरील वातावरण (पान २ वर)

## इचलकरंजी मनपाची आरक्षण सोडत पुन्हा

### ओबीसी व सर्वसाधारण महिला जागांसाठी प्रक्रिया : नवी सोडत १७ नोव्हेंबरला

■ इचलकरंजी,ता.१४-

**इचलकरंजी महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत पुन्हा होणार आहे. चार दिवसापूर्वी प्रभाग आरक्षण सोडत झाली आहे. मात्र राज्य निवडणूक आयोगाने अचानक ओबीसी सर्वसाधारण; ओबीसी महिला आणि सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठीची सोडत नव्याने काढण्याचे आदेश महापालिकेला दिले आहेत, त्यानुसार १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्रीमंत घोरपडे नाट्यगृहात नवी आरक्षण सोडत पार पडणार आहे. यामुळे शहरात खळबळ उडाली असून राजकीय वातावरणही पुन्हा तापणार आहे.**



इचलकरंजी महानगरपालिका निवडणूक

इचलकरंजी महापालिका निवडणुकीसाठी १६ प्रभागांतून चार सदस्यीय प्रणालीद्वारे ६५ नगरसेवक निवडले जाणार आहेत. नुकतीच ११ नोव्हेंबर रोजी घोषित झालेल्या आरक्षण सोडतीनंतर इच्छुक उमेदवार तयारीला लागले असतानाच आयोगाने शुक्रवारी नव्याने आदेश काढल्याने राजकीय गणिते बदलणार आहेत. (पान २ वर)

## इलेक्ट्रिक दुकान फोडून अडीच लाखाची चोरी

### सीसीटीव्हीत महिलेसह दोघे कैद

■ कोपार्डे,ता.१४ (प्रतिनिधी)-

**कोल्हापूर-गगनबावडा मार्गावर बालिंगा येथील मुख्य रस्त्यावर असलेल्या पार्थ लाईट हाऊस या इलेक्ट्रिक साहित्याच्या दुकानाला मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य केले. पहाटे सुमारे तीनच्या सुमारास दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश करत सुमारे अडीच लाखांची वायर, तांब्याच्या तारांचा माल व कॉपर साहित्य चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याबाबत करवीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.**




या दुकानात मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक साहित्याचा साठा ठेवला जातो. चोरटे रात्री शांततेचा फायदा घेत दुकानाबाहेर आले. त्यांनी शटरचे कुलूप उचकटले आणि आत प्रवेश करताच प्रथम सीसीटीव्ही कॅमेरा परतवून लावला, जेणेकरून त्यांच्या हालचाली दिसू नयेत. मात्र, इतर कॅमेऱ्यांमध्ये (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १२५५०० रु. | १६२००० रु. |

अंडी ६७० रुपये शेकडा

### हास्यतुषार

भारतात एक लाखांपेक्षा अधिक करोडपती!




## राहुल गांधींच्या विषारी प्रचाराला जनतेने उत्तर दिले-फडणवीस

■ मुंबई,ता.१४-

**बिहारमध्ये भाजप एनडीए आघाडीला मोठे यश मिळाले असून मुख्यमंत्री फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे.जोपर्यंत राहुल गांधी अशाप्रकारे संवैधानिक संस्थांवर आरोप करतील तोपर्यंत काँग्रेसची हालत अशीच राहिल. काँग्रेसची हालत एमआयएमपेक्षाही खाली गेली असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले.**



अतिशय मनापासून बिहारच्या जनतेचे अभिनंदन करतो, आभार मानतो. बिहारच्या जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन, नितीश कुमार यांच्या सुशासनावर विश्वास ठेऊन प्रचंड बहुमत दिलेले आहे.जे आकडे दिसत आहेत, त्यावरुन २०१० चा रेकॉर्ड तुटेल (पान २ वर)

**मुख्यमंत्री कोण होणार यासंदर्भातील निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा,आमच्या पक्षाचे प्रमुख आणि नितीशकुमार हे एकत्र बसून घेतील. मुख्यमंत्री पदासंदर्भातील बोलण्याचा अधिकार मला नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. वेळोवेळी अमित शहा यांनी अतिशय स्पष्टपणे त्यासंदर्भात भूमिका मांडली आहे. आमच्या संसदीय समितीचा आणि पक्षाच्या प्रमुख नेत्यांचा तो निर्णय होईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.**

### नवले पुल अपघात प्रकरण

## कंटेनर चालकासह तिघांविरुध्द गुन्हा दाखल

■ पुणे,ता.१४-

**नवले पुलावर गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातास जबाबदार असलेल्या ट्रक चालकासह तिघांविरुध्द सिंहगड रस्ता पोलीसांनी गुन्हा दाखल केला.अपघातास जबाबदार असणाऱ्या कंटेनर चालकासह क्लिनरचा होरपळून मृत्यू झाला होता. कारमधील दोन पुरुष, दोन महिला आणि एका मुलीचा घटनास्थळीच होरपळून मृत्यू झाला. कंटेनर चालक आणि त्याचा क्लीनर यांचादेखील आगीत होरपळून**



मृत्यू झाला.

याप्रकरणी ट्रक चालक रुस्तम रूदार खान (वय ३५, रा. किरवारी, किसनगड, जि. खेरतल, राजस्थान), मदतनीस (क्लिनर) मुस्ताक हनीफ खान (वय ३१, रा.मनापुरी,रासगड,जि.अलवर, राजस्थान) (पान २ वर)

(पान १ वरून)

## देशाचा मूड स्पष्ट केला

ठरवतात, असे तज्ञांचे मत आहे. अमित शाह यांच्या या वक्तव्यामुळे पुढील काही दिवसांत केंद्रवती राजकारणात अधिक चर्चेला उधाण येण्याची शक्यता व्यक्त केली जाते.

## अडीच लाखाची चोरी

दोन जण, त्यात एक महिला असल्याचे रेकॉर्ड झाले आहे. कपाटातील वायर,तांब्याची तार,कॉपरसह सुमारे अडीच लाखांचे साहित्य त्यांनी काही मिनिटात लंपास केले. घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध सुरू केला आहे. तपास करवीर पोलीसांकडून सुरू आहे.

## जनतेने उत्तर दिले

असा हा विजय झालेला आहे.मोदींवर बिहारच्या जनतेचे असलेले प्रेम आपल्याला दिसून येत आहे.कॉग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांनी देशामध्ये जो विषारी प्रचार सुरू केलाय, त्याला जनतेने उत्तर दिले आहे.संवैधानिक संस्थांवर आरोप करणे, संवैधानिक मार्गाने चालणाऱ्या कारभाराला विरोध करणे, जनतेच्या मताधिक्याला विरोध करणे.जोपर्यंत राहुल गांधी अशाप्रकारे संवैधानिक संस्थांवर आरोप करतील तोपर्यंत काँग्रेसची हालत अशीच राहिल.काँग्रेसची हालत एमआयएमपेक्षाही खाली गेली आहे. बिहारच्या इतिहासातील काँग्रेसचा सर्वात कमी स्कोअर आहे.राहुल गांधींनी व्होट चोरीचा मुद्दा काढला, त्यावर यात्रा काढली, नदीत उड्या टाकून बघितल्या,डान्स करून बघितला. पण, लोकांचा विश्वास हा मोदी आणि नितीशकुमार यांच्यावर आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. तसेच, काँग्रेस आणि आघाडीतील पक्षाला आत्मपरिक्षण करण्याचा सल्लाही फडणवीस यांनी दिला आहे.

## तिघांविरूध्द गुन्हा दाखल

ताहीर नासीर खान (वय ४५,रा.किसनगड, राजस्थान) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक मधुकर तुपसौंदर यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.साताऱ्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून आणि ब्रेक नादुरुस्त होऊन नवले पुलाजवळ गुरुवारी सायंकाळी भीषण अपघात झाला.या कंटेनरने १० ते १२ वाहनांना धडक दिल्यामुळे लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. तर ९ ते १० जण गंभीररित्या जखमी झाले होते.

## प्रशिक्षण विमान कोसळले

तात्काळ आपत्कालीन लँडींग करण्याचा प्रयत्न केला परंतु विमान कोसळले. सुदैवाने पायलटने स्वत:ला वेळेत बाहेर काढले. वायुदलाने सांगितले की, हे उड्डाण सामान्य प्रशिक्षण मिशनचा भाग होते.दुर्घटनेचे नेमके कारण शोधण्यासाठी कोर्ट ऑफ इन्क्वायरी (चौकशी समिती) स्थापन करण्यात आली आहे.जी या प्रकरणाची सखोल तपासणी करेल. घटनेच्या ठिकाणी तात्काळ बचाव आणि सुरक्षा पथके पाठवण्यात आली. स्थानिक प्रशासनानेही वायुदलाला आवश्यक ती मदत केली. या अपघातानंतर वायुदलाने स्पष्ट केले की,उड्डाण सुरक्षा हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे आणि चौकशी अहवाल आल्यानंतर आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील.

## इचलकरंजी मनपाची आरक्षण सोडत पुन्हा

नव्याने काढण्यात येणाऱ्या सोडतीत एससी, एसटी आणि मागास प्रवर्गाच्या आरक्षित जागांमध्ये कोणताही बदल होणार नाही. मात्र नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण व महिला आणि सर्वसाधारण महिला या दोन प्रवर्गासाठीचे आरक्षण पुन्हा सोडतीद्वारे निश्चित केले जाणार आहे. अनेक प्रभागांतील आरक्षण व्यवस्थेवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

नव्या आदेशाप्रमाणे १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्रीमंत घोरपडे नाट्यगृहात पुन्हा सोडत होणार आहे. त्यानंतर आरक्षणाची प्रारूप प्रसिद्धी १९ नोव्हेंबर रोजी आणि आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्यासाठी २५ नोव्हेंबर पर्यंत अंतिम मुदत आहे. नवीन सोडतीनंतर प्रभागांतील समीकरणे बदलण्याची शक्यता असल्याने इच्छुकांमध्ये खळबळ उडाली आहे.

# काँग्रेसमध्ये आणखी फूट पडण्याची शक्यता

■ नवी दिल्ली,ता.१४ –

**बिहार विधानसभेच्या निकालानंतर राजकीय वातावरण तापले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर तीव्र टीका करत काँग्रेसमध्ये आणखी एक फूट पडण्याची शक्यता असल्याचा दावा केला. बिहारमध्ये एनडीएने मिळवलेल्या मोठ्या विजयाच्या पार्श्वभूमीवर पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.**

यापसंगी पंतप्रधान म्हणाले की, बिहारच्या जनतेने विकसित आणि समृद्ध बिहारसाठी मतदान केले. रेकॉर्ड मतदानाची मी लोकांना विनंती केली होती, आणि त्या आवाहनाला प्रतिसाद देत जनतेने सर्व विक्रम मोडले. एनडीएला प्रचंड विजय देऊन बिहारच्या लोकांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास पुन्हा सिद्ध केला.बिहारच्या निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असून, महाआघाडीला मोठा धक्का बसला आहे. याच निकालाच्या पार्श्वभूमीवर मोदींनी काँग्रेसच्या कामकाजावर कठोर टीका केली.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, गेल्या सहा राज्यांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला मिळालेल्या जागांपेक्षा बिहारमध्ये भाजपने एकहाती जास्त जागा जिंकल्या.त्यांच्या मते काँग्रेसचे राजकारण सध्या पूर्णपणे नकारात्मकतेवर आधारित आहे 'चौकीदार चोर है' अशा घोषणा, संसदेच्या कामकाजात अडथळे, ईव्हीएमवर वारंवार आरोप, निवडणूक आयोगावर टीका, देशविरोधी अजेंडा पुढे नेणे अशा गोष्टीच काँग्रेस धन्यता मानते काँग्रेसकडे देशासाठी कोणताही सकारात्मक दृष्टिकोन उरलेला नाही. आज ती मुस्लीम लीगी-माओवादी काँग्रेस बनली आहे, असा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसच्या नकारात्मक भूमिकेमुळे पक्षाच्या

### मोदींचा ममता बॅनर्जींना इशारा

**बिहार जिंकल्यामुळे भाजप कार्यकर्त्यांना केरळ, तामिळनाडू, पाँडेचेरी आणि पश्चिम बंगाल, ओडिशामध्ये ही ऊर्जा पोहोचली आहे. बिहारमधून वाहणारी गंगा बंगालला जाते. बिहारने बंगालमध्ये भाजपच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे. मी बंगालच्या नागरिकांना सांगू इच्छितो की आता भाजप तुमच्याबरोबर मिळून पश्चिम बंगालमधूनही जंगलराज उखडून फेकणार आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आता बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना अप्रत्यक्षरित्या इशारा दिला आहे.**

## विजयोत्सव सभेत मोदींचा दावा

आत वेगळा प्रवाह तयार होत असल्याचा दावा करत मोदी म्हणाले की, या नकारात्मक धोरणांमुळे काँग्रेसमध्ये मोठे विभाजन होण्याचीही शक्यता आहे. तसेच काँग्रेसवर सहकारी पक्षांना गिळून टाकण्याचा आरोप करत ते म्हणाले की, काँग्रेसच्या नावदारांच्या धोरणांमुळे मित्रपक्षही बुडतात.

एनडीएच्या विजयामुळे आता बिहारच्या विकासाची जबाबदारी अधिक वाढल्याचे सांगत पंतप्रधान म्हणाले की, बिहारमध्ये उद्योग, रोजगार आणि पर्यटन वाढीस नवे दार उघडतील, ऐतिहासिक वारशाचे संवर्धन केले जाईल, बिहारची प्रतिमा देश-विदेशात अधिक उजळेल अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच बिहारच्या जनतेने विकासविरोधी आणि घराणेशाहीच्या राजकारणाला स्पष्ट नकार दिल्याचे मोदी म्हणाले. सहा दशके सत्ता उपभोगूनही काँग्रेसने बिहारचा गौरवशाली इतिहास विसरला. छठ पूजेसारख्या लोकउत्सवाची थट्टा करणाऱ्यांना बिहारने योग्य उत्तर दिल्याचे त्यांनी नमूद केले.

# मलकापुरात भांडी-फर्निचर दुकानाच्या आमिषाने फसवणूक

### शटर तोडून गुंतवणूकदारांचा ताबा

■ कराड,ता.१४(प्रतिनिधी)–

**आगाशिवनगर (मलकापूर) ता. कराड येथे परप्रांतीय व्यक्तींनी अवाजवी सवलतीचे आमिष दाखवून शेकडो नागरिकांची लाखोंची फसवणूक केली आहे. ही घटना शुक्रवारी सकाळी उघड झाली. 'सोना ट्रेडर्स' या भांडी, फर्निचर व इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या दुकानात २५ ते ५० टक्के डिस्काउंटच्या आश्वासनावर आगाऊ रक्कम घेण्यात आली. दुकान बंद आढळताच संतप्त गुंतवणूकदारांनी शटर तोडून वस्तू ताब्यात घेतल्या.**

आगाशिवनगरातील वृंदावन कॉलनीमध्ये हे दुकान गेल्या महिन्यात सुरू झाले होते. काही ग्राहकांना सुरुवातीला वस्तू देत विश्वास संपादन करण्यात आला. त्यामुळे बुकिंग वाढत जाऊन सुमारे ७०० ते ८०० जणांनी आगाऊ रक्कम जमा केली. प्रत्येक वस्तूसाठी पूर्ण आगाऊ भरल्याची पावती ग्राहकांकडे आहे.

गुरुवारी रात्री दुकान बंद केल्यानंतर मध्यरात्री ते थोडावेळ उघडून पुन्हा बंद केल्याचे स्थानिकांनी पाहिले. शुक्रवारी सकाळी ठरलेल्या वेळेत दुकान न उघडल्याने ग्राहकांनी गर्दी केली आणि व्यापारी फरार झाल्याची शंका बळावली. त्यानंतर संताप नागरिकांनी दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश करीत उपलब्ध वस्तू उचलण्याची चढाओढ केली. यावेळी काहीमध्ये बाचाबाचीही झाली. घटनेनंतर अनेक गुंतवणूकदारांनी कराड शहर पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदवल्या आहेत. पोलिसांनी तपास सुरू केला असून, संबंधित परप्रांतीय व्यक्तींचा शोध सुरू करण्यात आला आहे.

## बेकायदा गॅस रिफिलींग; एकावर गुन्हा दाखल

■ सरूड,ता.१४(प्रतिनिधी)–

**शाहूवाडी तालुक्यातील बांबवडे येथे बेकायदेशीररित्या घरगुती गॅस सिलेंडर विक्री करत घरगुती गॅस व्यवसायिक गॅस टाकीत भरून विक्री केल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गॅस विक्रेत्यावर शाहूवाडी पोलिसांनी कारवाई करीत ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील बांबवडे गावच्या हद्दीत बेकायदेशीररित्या गॅस विक्री करत असल्याची तक्रार शाहूवाडी तहसील कार्यालयात झाल्या होत्या. त्यानुसार शाहूवाडी पोलिसांनी या ठिकाणी टाकलेल्या धाडीत एचपी इंडियन, भारत गॅस कंपनीच्या ४९ टाकिया सह घरगुती गॅस व्यवसाय टाकीत भरण्यासाठी वापरण्यात आलेली साहित्य व काटा असा एकूण ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याच्या घटनेची नोंद शाहूवाडी पोलिसात दाखल झाली आहे. अधिक तपास शाहूवाडी पोलीस करीत आहेत.

# महाराष्ट्र भूषण पुरस्काराने शिल्पकार राम सुतार सन्मानित

■ नवी दिल्ली,ता.१४(प्रतिनिधी)–

**विख्यात शिल्पकार राम सुतार यांनी आपल्या शिल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशाचा नावलौकिक जगभरात वाढविला आहे. त्यांनी घडविलेली शिल्पे इतिहासाची साक्षीदार असून त्यातून अभिव्यक्त होणारा वारसा शेकडो वर्षे अबाधित राहील, अशा शब्दात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांचा गौरव केला.**

श्री सुतार यांना आज राज्य सरकारचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार (२०२४) मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. नोएडा (उत्तर प्रदेश) येथील श्री सुतार यांच्या निवासस्थानी झालेल्या या अनौपचारिक कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, खासदार महेश शर्मा, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर विमला, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे उपस्थित होते.

शिल्पकला क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल श्री सुतार यांना हा पुरस्कार देण्यात आला असून सन्मानचिन्ह, मानपत्र आणि २५ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पुरस्कारा मागची भूमिका विशद करून श्री सुतार यांनी कलेच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाची माहिती दिली. सुतार परिवाराच्या वतीने अनिल सुतार यांनी मनोगतात या सन्मानाबद्दल महाराष्ट्र सरकारचे आभार मानले.

यापसंगी स्वाती सुतार, सोनाली सुतार, समीर सुतार, दिवाकर शर्मा, कुलदीप मित्तल यांसह विविध अधिकारी आणि सुतार कुटुंबातील सदस्य यावेळी उपस्थित होते.

# गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी सांगली जिल्ह्यात कोम्बिंग ऑपरेशन

■ सांगली,ता.१४(प्रतिनिधी)–

**गुन्हेगारांचे कंबरडे मोडून काढण्यासाठी पोलिस दलाकडून आरखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार शहरासह जिल्ह्यात विशेष मोहीम राबविली जाणार आहे. त्यासाठी स्वत: पोलिस अधीक्षक संदीप घुगे रस्त्यावर उतरणार आहेत. जिल्ह्यात कोम्बिंग ऑपरेशन राबवले जाणार आहे. ही मोहीम रस्त्याने केली जाणार असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.**

जिल्ह्यातील गुन्हेगारीत फाळकुटांसह सराईत गुन्हेगारांचा सहभाग अधिक दिसून येत आहे. गत वर्षीच्या तुलनेत गुन्हेगारीचा आलेख कमी असला, तरी सुरक्षित सांगलीसाठी पोलिस दलाकडून ही विशेष मोहीम राबवली जाणार आहे. पोलिस अधीक्षक घुगे यांनी त्याचा ॲक्शन प्लॅन तयार केला आहे. शहरातील प्रत्येक चौकासह गल्लीबोळात पोलिसांची फौज उतरणार आहे. नशेखोरांसह फाळकुटदादांना आता पोलिसांचा खाक्या दाखवला जाणार आहे. त्याची तयारी आता पूर्ण झाली असून रविवारपासून ही मोहीम राबवली जाणार आहे.

स्वत: अधीक्षक आणि अप्पर अधीक्षक कल्पना बारावकर या सांगलीत नेतृत्व करणार आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व पोलिस ठाण्याचे प्रभारी असणार आहे. नशेखोरीचे अड्ड्यांसह हुल्लबाजी, दादागिरी करणाऱ्यांना आता दंडुका दाखवला आहे. सांगलीकर नागरिकांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी पोलिस अधीक्षकांनी हा प्लॅन बनवला आहे. प्रत्येक भागातील बीट मार्शल आणखी क्षमतेने काम करतील, अशा सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

शहरात गेल्या आठवड्यात झालेल्या खुनाच्या घटनेनंतर पोलिस अधीक्षकांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. गर्दीची व सार्वजनिक ठिकाणी हुल्लडबाजी करणाऱ्यांना आता दणका दिला जाणार आहे.

तसेच जिल्ह्यातील प्रत्येक भागात कोम्बिंग ऑपरेशन राबवले जाणार असून तशा सूचना प्रत्येक पोलिस ठाण्यांना देण्यात आल्या आहेत.

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस दल आता अलर्ट मोडवर आले आहेत. तसेच संवेदनशील ठिकाणी साध्या वेशातील पोलिसांची गस्ती आणखी प्रभावी केली जाणार आहे. पोलिस अधीक्षकांचा हा नवा क्शन प्लॅन उद्यापासून राबवला जाणार असल्याचे पोलिस सुत्रांनी सांगितले.

### सीसीटीव्ही व्हॅनची मदत

**शहरातील गर्दीच्या ठिकाणी पोलिस दलातील सीसीटीव्ही व्हॅनची गस्त आता वाढवली जाणार आहे. त्याची करडी नजर ठेवली जाणार आहे. त्यात काही आक्षेपार्ह गोष्टी आढळून आल्यास तातडीने कारवाई केली जाणार आहे.**

## ऊसाने भरलेली ट्रॉली पलटली रेल्वे ब्रिज बनला धोकादायक

■ हातकणंगले,ता.१४(प्रतिनिधी)–

**हातकणंगलेतील इचलकरंजी मार्गावरील रेल्वे ब्रिज खालील खराब रस्त्यामुळे ऊस वाहतुक करणारी ट्रॉली दुपारच्या सुमारास पलटी झाली. त्यामुळे इचलकरंजी-वडगावकडे जाणारी वाहतुक विस्कळीत झाली होती.**

गेल्या काही महिन्यांपासून रेल्वे ब्रिज खाली पडलेल्या खड्ड्यांमुळे छोटे मोठे अपघात होत आहेत. तात्पुरती मलमपट्टी केली जाते. मात्र ब्रिजखालील वळण, कमी रुंदी आणि रस्त्यावरचे खड्डे यामुळे या पुलाचा धोका दिवसेंदिवस वाढत असल्याची तक्रार वाहनचालकांकडून सातत्याने केली जात आहे. सुदैवाने अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणात उस रस्त्यावर पडला होता.

त्यामुळे इचलकरंजीला येणारी-जाणारी वाहतुक पाच तिकटी मार्गे वळवण्यात आली होती.जेसीबीच्या सहाय्याने ऊस ट्रॉलित भरून वाहतुक सुरळीत करण्यात आली. मात्र रेल्वे ब्रिज खालील रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे असल्याची मागणी वाहनधारकातून होत आहे. पाण्याचा निचरा होत नसल्याने वारंवार रस्ता करूनही रस्ता खराब खराब होत आहे.

# संशोधित वितरण क्षेत्र योजनेसाठी महाराष्ट्राला मिळणार २६५५ कोटी

### फडणवीस यांची खट्टर यांच्यासोबत बैठक

■ नवी दिल्ली,ता.१४(प्रतिनिधी)–

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल खट्टर यांची नवी दिल्ली येथे भेट घेत पायाभूत सुविधांच्या संशोधित वितरण क्षेत्र योजनेसाठी (आरडीएसएस) महाराष्ट्राला २६५५ कोटी रुपये देण्याची मागणी केली. लवकरच हा निधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.**

सोबतच ८००० मेगावॅट तास क्षमतेच्या बॅटरी स्टोरेज प्रकल्पासाठी व्यवहार्यता तूट निधी देण्यासाठी सुद्धा सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन केंद्रीय मंत्र्यांनी दिले.

नवीनीकरणीय ऊर्जा प्रकल्पात निर्माण झालेली अतिरिक्त वीज बॅटरी स्टोरेज साठवून कमाल मागणीच्या वेळी ती वापरली जाते. यात ४५०० मे.वॅ.तास क्षमतेच्या अशा प्रकल्पासाठी केंद्राने यापूर्वीच व्यवहार्यता तूट निधी मंजूर केला आहे. त्याच्या निविदाही जारी करण्यात आल्या आहेत. आता अशा प्रकारचा ८००० मे.वॅ. तास क्षमतेचा आणखी एक प्रकल्प महावितरण उभारत आहे. त्यासाठी व्यवहार्यता तूट निधी देण्यासाठी केंद्र सरकार मदत करेल, असे मनोहरलाल खट्टर यांनी सांगितले. सौर ऊर्जा पारेषण जाळ्यातून नेण्यासाठीचे प्रकल्प, राज्यातील १८ मोठे सौर प्रकल्प, ग्रीडच्या तांत्रिक अडचणींवर उपाय अशा विविध विषयांवर यावेळी चर्चा झाली. या बैठकीत महाराष्ट्रातर्फे ऊर्जा क्षेत्रात हाती घेण्यात आलेल्या विविध उपाययोजनांची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यात संसाधन पर्याप्तता आराखडा, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टीम (बीईएसएस), पंपस्टोरेज प्रकल्प इत्यादींचा त्यात समावेश होता.

या बैठकीत केंद्रीय ऊर्जा सचिव पंकज अग्रवाल, महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र, एनटीपीसीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गुरुदीपसिंग आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# मोदी जनतेच्या दृढविश्वासाचे प्रतिक-अजितदादा

■ मुंबई,ता.१४–



**बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) मिळविलेला विजय हा ऐतिहासिक असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावरील जनतेच्या दृढविश्वासाचे ते प्रतिक आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.**

बिहारमध्ये एनडीएच्या सरकारने समाज कल्याणाच्या अनेक क्रांतिकारी योजना राबवल्या.तेथील लाडक्या बहिणींनेसुद्धा त्यांना मोठ्या प्रमाणात आशिर्वाद लाभले. त्याचेच हे यश आहे. बिहारमधील जनतेने डबल इंजिन सरकारला पुन्हा एकदा भरघोस कौल दिला आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल बिहारमधील एनडीएच्या सर्व घटक पक्षांचे अजित पवार यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

हा विजय केवळ संख्याबळाचा नसून विकास, सुशासन आणि सामाजिक न्याय धोरणाचा विजय आहे. एनडीएच्या एकजुटीचा विजय आहे.त्यामुळे बिहारच्या सर्वांगिण विकासाला आणखी गती देईल आणि राज्याला नवी दिशा मिळेल.पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात बिहार आणखी झपाट्याने पुढे जाईल असा विश्वासही अजित पवार यांनी व्यक्त केला.

# तारदाळ-खोतवाडी जल जीवनच्या कामाबाबत ग्रामपंचायतीचे निवेदन

■ तारदाळ,ता.१४ (वार्ताहर)–

**तारदाळ-खोतवाडी जल जीवन मिशन योजनेचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे व तारदाळ खोतवाडी गावांना लवकरात लवकर पाणी द्यावे याबाबतचे निवेदन तारदाळ ग्रामपंचायतीचे वतीने व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रसाद खोबरे यांच्यावतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.कार्तिकेन यांना जल जीवन योजनेचे काम त्वरित पूर्ण करून गावाला पाणी देण्याबाबतचे निवेदन देण्यात आले.**



**जल जीवन मिशन योजनेचे काम त्वरित पूर्ण करावे याबाबतचे निवेदन देताना प्रसाद खोबरे, सुरज कोळी सचिन पोवार, प्रवीण पाटील यांचे सह मान्यवर.**

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेन म्हणाले की, रोजच्या रोज कामाचा पाठपुरवठा करत असून लवकरात लवकर दानोळी व तारदाळ मधील अपुरे असलेली कामे पूर्ण करून लवकर पाणी देण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी प्रसाद खोबरे, उपसरपंच सूरज कोळी, सचिन पोवार, प्रवीण पाटील, अवधूत दाते, प्रवीण खोबरे, सूरज कांबळे उपस्थित होते.

### सीएसएमटीच्या बाहेर संशयास्पद बॅग आढळल्याने खळबळ

**मुंबई,ता.१४**–मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या बाहेर शुक्रवारी एका संशयास्पद बॅगने खळबळ उडाली. मुंबई पोलीस बॉम्बशोधक पथकासह घटनास्थळी पोहोचले आणि संपूर्ण परिसर सील केला. त्यानंतर बॅगची काळजीपूर्वक तपासणी करण्यात आली आणि कपडे, कागद आणि टॉवेल सापडल्याने पोलिसांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. आझाद मैदान पोलीस स्टेशनचे पथक बॅगच्या मालकाचा शोध घेत आहे.शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळ एका बेवारस बॅगची तक्रार मिळाली होती. बॅग सापडल्याने जवळच्या रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी तात्काळ बॉम्बशोधक पथकाला घटनास्थळी बोलावले आणि मेटल डिटेक्टरने बॅगची तपासणी केली.

# दहशतवादी उमर नबीचे घर आयईडीने उडवले

■ श्रीनगर,ता.१४–

**दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ सोमवारी झालेल्या कार बॉम्ब स्फोटाचा मुख्य आरोपी दहशतवादी उमर नबी याचे पुलवामा येथील घर सुरक्षा यंत्रणांनी आयईडी स्फोटाने उद्ध्वस्त केले आहे.अधिकाऱ्यांनी सांगितले की गुरुवार आणि शुक्रवारच्या मध्यरात्री ही कारवाई करण्यात आली.**



दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्ब स्फोटानंतर सुरक्षा दलांनी कठोर पाऊल उचलले आहे. मुख्य आरोपी दहशतवादी डॉ.उमर नबी याचे पुलवामामधील घर पूर्णपणे पाडण्यात आले.दिल्लीतील स्फोटात वापरलेल्या स्फोटकांनी भरलेली कार चालवणारा डॉ. उमर नबी हा पुलवामा जिल्ह्यात राहत होता आणि त्याचे घर सुरक्षा दलांनी उद्ध्वस्त केले आहे. लाल किल्ल्याजवळ सोमवारी झालेल्या कार स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाला आणि अनेकजण जखमी झाले. स्फोटकांनी भरलेली आय-२० ही कार उमर चालवत होता. स्फोटस्थळावरून गोळा केलेल्या डीएनए नमुन्यांची चाचणी डॉ. उमरच्या आईच्या नमुन्यांशी केल्यानंतर त्याची ओळख निश्चित झाली.आपल्या परिसरात शैक्षणिकदृष्ट्या कुशल व्यावसायिक म्हणून ओळखला जाणारा उमर नबी गेल्या दोन वर्षांत दहशतवादी विचारांकडे झुकला होता, असेही चौकशीत समोर आले आहे.

# महानगरपालिकेसाठी महाविकास आघाडीची रणनिती सुरू

## आमदार, माजी आमदार विरोधात संघर्ष ; इच्छुकांची मते आज आजमावणार

इचलकरंजी ता.१४–

**महायुतीबरोबरच आता महाविकास आघाडी आपले सहकारी एकत्र घेऊन आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी समोर जाण्याची रणनीती आखत आहे.या पार्श्वभूमीवर शनिवारी १५ रोजी आघाडी इच्छुकांची मते आजमणार आहेत. आमदार आणि माजी आमदारांच्या विरोधात संघर्ष करताना महाविकास आघाडी भक्कम आणि मजबूत उमेदवारी देण्यासाठी तयारीत आहे. त्यामुळे आगामी महानगालिकेची निवडणूक चुरशीने होण्याची चिन्हे दिसत आहेत.**

### इच्छुकांची मते आजमावणार

महाविकास आघाडीमध्येही अनेकजण निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत.त्यांना कोणत्या प्रभागात संधी देता येईल, या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत असून इच्छुकांची मते आजमावण्यासाठी उद्या शनिवारी काही प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत काय चर्चा होते,याकडे लक्ष लागून राहिले आहे.

महाविकास आघाडी एकसंघपणे विधानसभा निवडणुकीत महायुतीला सामोरे गेली होती.संख्या कमी असली तरी महाविकास आघाडीने ताकदीशी लढा दिला होता.आताही त्याच पद्धतीने निवडणुकीस सामोर जाण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.महाविकास आघाडीकडेही अनेक दिग्गज नेते आहेत. आपल्या सोबत एक-दोन जागा घेऊन येण्याची त्यांची क्षमता आहे.



महायुतीमध्ये उमेदवारी मिळणार नाही त्यातील काही इच्छुक इकडे येऊन आपले नशीब आजमावून शकतात. सध्या महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रीय काँग्रेस, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, स्वाभिमानी शेतकरी संघटना, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, मनसे, आम आदमी पार्टी, वंचित आघाडी, समाजवादी पार्टी, शेकाप, भाकप, मँचेस्टर आघाडी आदी पक्षांचा समावेश आहे. त्या सर्वांना एकसंघ पणे बांधून ठेवून व्यापक रणनिती आखली जाऊ शकते. त्यामुळे आगामी महानगरपालिकेची पहिली निवडणूक चांगलीच रंगतदार होण्याची शक्यता आहे.

### राष्ट्रवादी व शिवसेना यांची भूमिका महत्वाची

महायुतीमध्ये अद्याप राष्ट्रवादी आणि शिवसेना यांच्या सोबत बैठक अथवा खुली चर्चा झालेली नाही.प्राथमिक माहितीनुसार खूप कमी जागा राष्ट्रवादीला भाजपाकडून दिल्या जाऊ शकतात. तसेच शिवसेना यांच्या मागणीकडे महायुती कसे बघणार आणि त्याच्या जागा देणार का? हे पाहणे उचित ठरणार आहे. जर या दोन्ही पक्षांचे महायुती सोबत जुळले नाही तर महापालिका निवडणुकीचे चित्र वेगळे असणार आहे.त्याचा फायदाही महाविकास आघाडी उचलू शकते. त्याचा फायदा आघाडीस होणार आहे. त्यातच महायुतीमध्ये इच्छुकांची संख्या मोठी आहे.त्यातील नाराजीचा फायदाही महाविकास आघाडीला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यांना

# लग्न लावून देण्यास नकार दिल्याने तिघांना मारहाण

इचलकरंजी , ता.१४–

**मुलीसोबत लग्न लावून देण्यास नकार दिल्याच्या कारणावरुन शिवीगाळ करत तिघांना मारहाण केल्याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. शब्बीर डोंगरीसाब शेख (वय ३९, रा. समर्थनगर, तारदाळ), शाबीर शेख व सोहेल शफिक शिरोळे अशी जखमींची नांवे आहेत. या प्रकरणी साहिल रशीद सय्यद (वय २०), साजीद रशीद सय्यद (वय २२, दोघे रा. समर्थनगर, तारदाळ) व आरमान मोमीन (वय २४, रा. खोतवाडी) यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून सय्यद बंधुंना अटक करण्यात आली आहे.**

याबाबत माहिती अशी की,गुरुवारी दुपारच्या सुमारास पार्वती औद्योगिक वसाहतीच्या प्रवेशद्वारासमोर अडवत लग्नासंदर्भात विचारणा केली. त्यावर शेख यांनी नकार दिल्याने साहिल, साजीद सय्यद व आरमान मोमीन या तिघांनी शेख यांच्यासह त्यांचे भाऊ शाबीर शेख व सोहेल शिरोळे यांना शिवीगाळ करत मारहाण केली. साहिल याने कटरने शिरोळे याच्या उजव्या हाताच्या दंडावर वार करुन जखमी केले. या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल झाला असून साहिल व साजीद सय्यद या दोघांना अटक करण्यात आली आहे.



बिहार विधानसभा निवडणुकीतील विजयाप्रित्यर्थ म. गांधी चौक येथे आनंदोत्सव साजरा करताना कार्यकर्ते. (छाया.– मयूर चिंदे)

# भाजपातर्फे आनंदोत्सव साजरा

इचलकरंजी,ता.१४–

**बिहारमधील विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या भरघोस यशाबद्दल इचलकरंजी शहर भाजपाच्या वतीने साखर-पेढे वाटत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शहर भाजप कार्यालयापासून श्री शिवतीर्थ मार्गे गांधी पुतळा अशी रॅली काढत विजयाचा जयघोष करत फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.**

यावेळी आमदार राहुल आवाडे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शशिकांत मोहिते, सीमा कमते, सपना भिसे, पूनम जाधव, अश्विनी कुबडगे, नीता भोसले, रंजना डावरे, नागुबाई लोंढे, ज्योती लाटणे, योगिता दाभोळे, शबाना शाह, मंगल सुर्वे, मनोज साळुंखे, कोंडीबा दवडते, शेखर शहा, अरूण आवळे, सचिन पवार, प्रमोद बचाटे, शिवानंद रावळ, महेश पाटील, उमाकांत दाभोळे, रवींद्र जावळे, दिपक पाटील, अनिकेत पाटील, राजू पुजारी, उत्तम विभूते यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वेताळ मंदिरात विविध कार्यक्रम

इचलकरंजी,ता.१४ –

**येथील वेताळ पेठ भागातील वेताळ मंदिरात श्री नृसिंह वेताळ देव कार्तिक उत्सव सोहळा १६ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणार आहे. यानिमित्त भजन, मनोरंजन व पटसोंगटी, हाफपिच क्रिकेट स्पर्धासह विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. उत्सवाचा मुख्य दिवस गुरुवारी २० रोजी असून सकाळी नृसिंह वेताळदेवला महाअभिषेक व दुपारी पालखी मिरवणूक याच दिवशी होणार आहे, अशी माहिती श्री वेताळदेव उत्सव समितीच्यावतीने देण्यात आली.**

येथील वेताळ पेठ परिसरात श्री वेताळ देवाचे मंदिर असून मूर्ती स्वयंभू आहे. येथे प्रतिवर्षी कार्तिक अमावास्येला उत्सव भक्तिमय व भव्य प्रमाणात होत असतो. यंदाचे ९९ वे वर्ष असून यानिमित्त विविध धार्मिक, मनोरंजन, क्रीडा स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी श्री वेताळदेव कार्तिक उत्सव समिती, श्री वेताळ कार्तिक चॅरिटेबल ट्रस्ट, सुकाणू समिती, वेताळ पेठ गणेशोत्सव मंडळ, नवरात्र उत्सव मंडळ, सद्गुरू बाळूमामा नवरात्र मंडळ, व्यंकटेश्वरा गणेशोत्सव मंडळ, योगायोग गणेशोत्सव मंडळ, एम. बी. बॉईज गणेशोत्सव मंडळ यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ... अन्यथा स्वाभिमानाने स्वबळावर लढा

## राष्ट्रवादीच्या मेळाव्यात नाम. मुश्रीफ यांचे आवाहन

इचलकरंजी , ता.१४–

**महानगरपालिका निवडणुकीच्या जागांबाबत महायुतीशी चर्चा करा. जर सन्मानजनक जागा मिळाल्या नाही तर स्वबळावर अभिमानाने व स्वाभिमानाने लढण्याची तयारी ठेवा. सर्वांनी एकदिलाने महापालिकेवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकवावा, असे आवाहन राज्याचे वैद्यकिय शिक्षण मंत्री तथा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हसन मुश्रीफ यांनी इचलकरंजीतील मेळाव्यात बोलताना केले.**



मेळाव्यात उपस्थितांना अभिवादन करताना नाम. हसन मुश्रीफ, माजी आम. अशोकराव जांभळे, सुहास जांभळे, लतिफ गैबान, परवेज गैबान, अमित गाताडे व इतर. (छाया. – अनंतसिंग)

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येथील मराठा मंडळ सांस्कृतिक भवन येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गटाचा मेळावा झाला. यावेळी नाम. मुश्रीफ यांनी, यापूर्वी नगरपालिका निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घवघवीत यश संपादन करतानाच माजी आमदार अशोकराव जांभळे यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत जाण्याची किमयाही केली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीतही यश निश्चित मिळेल. काहीजण पक्षातून गेले म्हणून पक्षाची ताकद कमी झाली अशा भ्रमात असतील तर ते चुकीचे ठरेल. इचलकरंजी हे कामगारांचे शहर असून त्यांच्या श्रमाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. शहराला भेडसावणारा पाणी प्रश्न संपविण्यासाठी आम्ही कटीबध्द असल्याचे स्पष्ट केले.

स्वागत करुन प्रास्ताविकात राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष सुहास जांभळे यांनी, महानगरपालिकेवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकविण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. त्यासाठी आम्हाला मुश्रीफ यांनी हिमालयाची ताकद द्यावी, असे आवाहन केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नासिर अपराध यांनी केले. या मेळाव्यास जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव परवेज गैबान, यासीन मुजावर, तौफिक मुजावर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्याध्यक्ष अमित गाताडे, लतिफ गैबान, विलास गाताडे, बाळासाहेब देशमुख, शामराव कुलकर्णी, राजाराम धारवट, राजाराम लोकरे, प्रिया बेडगे, निहाल कलावंत, सलीम शिरगांवे, यासीन मुजावर आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नितीनचे स्वप्न पूर्ण करा

राष्ट्रवादी पक्षासाठी अव्याहतपणे झटणारा कार्यकर्ता नितीन जांभळे आपल्यातून निघून गेला. महानगरपालिकेच्या पहिल्या निवडणुकीमध्ये पक्षाचा झेंडा फडकवून नितीनचे स्वप्न पूर्ण करा असे भावनिक आवाहन नाम. हसन मुश्रीफ यांनी केले.

# ३१ हजाराचा गुटखा जप्त

इचलकरंजी,ता.१४ –

**गुटखा व गुटखाजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी घातली असतानाही शहापूर परिसरात खुलेआम विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकत एका पान शॉपवर कारवाई केली. या कारवाईत तब्बल ३३ हजार १०१ रुपयांचा गुटखा, पानमसाला व रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

याप्रकरणी ज्योतिर्लिंग राजू रेडे (वय ३६, रा. जवाहरनगर, इचलकरंजी) याच्यावर गुन्हा दाखल झाला. ही कारवाई कोल्हापूर जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या अवैध धंदे कारवाई पथकाने केली. याबाबत बाळासाहेब पोवार यांनी फिर्याद दिली.

पोलिसातून मिळालेली माहिती अशी, गुरुवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास डेक्कन मिल शेजारील 'राजू पान शॉप' या दुकानात छापा टाकण्यात आला. यावेळी विविध ब्रँडचे गुटखा व सुगंधीत पानमसाला असा एकूण ३२ हजार ५१ रुपयांचा साठा मिळून आला. तसेच संशयित आरोपीकडून १ हजार ५० रुपयांची रोख रक्कमही जप्त करण्यात आली. याप्रकरणी महाराष्ट्र शासनाच्या गुटखा विक्रीवरील बंदी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शहापूर पोलिस करत आहेत.


भावपूर्ण

श्रध्दाजंली/ऋणनिर्देश



आयुष्याच्या अनेक चढउत्तारावर
नेहमी चालत राहिला.
कधी डगमगला नाहीत,
आव्हाने पेलताना.
संकटे झेलताना आयुष्यभर चालत राहिलात.
काळाच्या कातळावर आपल्या कर्तुत्वाचा
शिलालेख लिहून ठेवून गेलात.

कै. श्री. पांडुरंग दत्तात्रय पाटील(मामा)

माजी जिल्हा परिषद सदस्य

भुदरगड तालुक्यातील कुर येथील जेष्ठ नेते, माजी जिल्हा परिषद सदस्य श्री पांडुरंग दत्तात्रय पाटील उर्फ पी.डी. पाटील (मामा) यांचे ४ ऑक्टोंबर २०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने भुदरगड तालुक्यातील लोकाभिमुख व्यक्तीमत्व हरपले आहे. या दुःखद प्रसंगी आमच्या परिवार कोसळलेल्या दुःखात कोल्हापुर जिल्ह्यातील सामाजीक, शैक्षणिक. राजकीय, सहकार क्षेत्रातील जेष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरीक व आप्तेष्टांनी भेटून आमचे दुःख हलके केले. या सर्वांचे आम्ही पाटील कुंटूबीय सदैव ऋणी आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

शोकाकुल

श्री जीवन पांडुरंग पाटील
मा.जि.पं. सदस्य, संचालक, बिद्री सहकारी साखर कारखाना

श्री.आण्णासो दत्तात्रय पाटील
मा.उपसरपंच

श्री मदनदादा पांडुरंग पाटील
लोकनियुक्त सरपंच, कुर,ता.भुदरगड

श्री.ॲड.मोहनदादा पाटील

श्री उदय आण्णासो पाटील (सर)

श्री. संजय आण्णासो पाटील (अमेरिका)

श्री विक्रम आण्णासो पाटील (आर टी ओ)

समस्त पाटील परिवार व ग्रामस्थ व पीडी पाटील मामा प्रेमी कुर,ता.भुदरगड

उत्तरकार्य रविवार दि.१६-११-२०२५ रोजी सकाळी १० वाजता कुर ता.भुदरगड जि.कोल्हापूर येथे


परिशिष्ट – ६

(सोडत व आरक्षण प्रसिद्धी – जाहीर सूचना)

**इचलकरंजी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५**

**ICHALKARANJI MUNICIPAL COROPORATION GENERAL ELECTION - 2025**

**- PUBLIC NOTICE -**

For the General Election of Ichalkaranji Municipal Corporation to be held in the year 2025, The Programme for the Draw of lots for reservation of seats in the category of the Backward Class of Citizens, Backward Class of Citizens (women) & Women from General and for the publication of reservation is as below

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of the Draw for the reservation | Monday Date-17/11/2025 At.-11.00 a.m. Place- N.B. Ghorpade Natyagrah, Ichalkaranji. |
| 2 | Date of publishing the draft of reservation | Date - 19/11/2025 |
| 3 | Last date of submitting objection & suggestions | Date - 19/11/2025 to Date - 25/11/2025 to |
| 4 | Place where objection & suggestions are to be filled. | Municipal head office, Election Department |

Note - After considering all Objection & Suggestions, final notification of reservation will be published.

Place - Ichalkaranji.
Date - 15/11/2025

(Pallavi Patil)
Commissioner,
Ichalkaranji Municipal Corpoation

परिशिष्ट – ५

(सोडत व आरक्षण प्रसिद्धी – जाहीर सूचना)

**इचलकरंजी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५**

**- जाहीर सूचना -**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्या करीता सोडत काढणे, तसेच आरक्षणाचे प्रारुप प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविण्यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | सोमवार,दिनांक १७/११/२०२५ सकाळी ११.०० वाजता स्थळ : ना.बा.घोरपडे नाट्यगृह |
| २ | आरक्षणाचे प्रारुप प्रसिद्ध करण्याचा दिनांक | दिनांक १९/११/२०२५ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | दिनांक १९/११/२०२५ ते दिनांक २५/११/२०२५ |
| ४ | हरकती व सूचना | महानगरपालिका मुख्यालय, निवडणूक विभाग येथे सादर कराव्यात. |

टिप – दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेवून आरक्षणाची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.

जा.क्र.निवडणूक/१९/२०२५
ठिकाण– इचलकरंजी.
दिनांक – १५/११/२०२५

(श्रीमती पल्लवी पाटील)
आयुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

■ संपादकीय ■

# अभूतपूर्व विजयाचे सार

बिहार विधानसभा निवडणुका २०२५ या वेळी मतदारांनी दिलेला निकाल केवळ राजकीय बदल घडवणारा नाही, तर राज्याच्या सामाजिक संरचनेत, मतदारांच्या प्राधान्यक्रमांमध्ये आणि नेतृत्वाविषयीच्या अपेक्षांमध्ये झालेला मोठा बदल स्पष्टपणे दाखवणारा आहे. सुमारे २००हून अधिक जागा मिळवत एनडीएने बिहारमध्ये इतिहास रचला आहे. २४३ सदस्यीय विधानसभेत इतक्या मोठ्या बहुमताने मिळालेला जनादेश म्हणजे मतदारांनी स्थैर्य, सुसंगत धोरणे आणि विकासाच्या गतीला प्राधान्य दिले आहे. विशेष म्हणजे, ही निवडणूक अशा काळात झाली आहे जेव्हा राज्याच्या सामाजिक समीकरणांमध्ये बदल जाणवत होते आणि विरोधकांनी मोठ्या प्रमाणात सत्ताविरोधी प्रचार केला होता. पण तरीही स्पष्ट बहुमताने मतदारांनी एनडीएला परत आणत सुसंगत नेतृत्वाचा मार्ग अधिक सुरक्षित मानल्याचे दिसले. या निवडणुकीच्या केंद्रस्थानी 'डबल इंजिन सरकार'ची संकल्पना होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या संयुक्त नेतृत्वाने गेल्या काही वर्षांत जी राज्यकारभाराची शैली विकसित केली होती, ती मतदारांना परिचित आणि विश्वसनीय वाटत होती. कोरोनानंतरच्या पुनर्प्राप्ती प्रक्रियेत पायाभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, ग्रामीण रस्त्यांचे जाळे, गतिमान उद्योग धोरणे आणि ईबीसीओबीसी घटकांसाठी केलेल्या योजनांनी मतदारांमध्ये राज्याच्या स्थैर्याचा ठसा निर्माण केला.एनडीएचा विजय सुनिश्चित करणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे गठबंधनातील अभूतपूर्व समन्वय. बिहारसारख्या बहु-जातीय, बहु-पक्षीय राज्यात सीट शेयरिंग हा नेहमीच वादाचा विषय राहिला आहे. मात्र २०२५ मध्ये हा प्रश्न आश्चर्यकारकपणे सुरळीतरित्या निकाली लागला. भाजप आणि जेडीयू यांनी १०१-१०१ जागांवर स्पर्धा करण्याचे ठरवून दोन्ही पक्षांमध्ये सम-पातळीचा विश्वास प्रकट केला. एलजेपी (राम विलास) ला २९ जागा आणि एचएएमला ६ जागा देण्यात आल्या, तर आरएलएमलाही प्रभावक्षेत्रातील योग्य जागा मिळाल्या. या विभागणीत केवळ राजकीय तडजोड नव्हती, तर गेल्या तीन निवडणुकांच्या डेटा विश्लेषणावर आधारित आघाडी होती. कोणत्याही जागेवर पक्षांमध्ये वाद झाला नाही, कुठेही बंडखोरी दिसली नाही आणि प्रचाराच्या शेवटच्या दिवसापर्यंत संपूर्ण एनडीएत एकजूट दिसून आली. यामुळे कार्यकर्त्यांची उर्जा वाढली, जमिनीवरील काम अधिक मजबूत झाले आणि मतदारांपर्यंत ठोस संदेश पोहोचला. याउलट, महागठबंधनातील गोंधळ आणि विसंगती स्पष्ट दिसत होती. राजदने बेरोजगारांना नोकऱ्या, वीजदरात सवलती, महिलांसाठी कल्याणकारी योजना यांसह मोठमोठ्या वचनांचा आधार घेत प्रचार मोहीम उभी केली. परंतु ही वचने मतदारांच्या स्थैर्याविषयीच्या अपेक्षेशी जुळत नव्हती. या निवडणुकीत 'जंगल राज' हा मुद्दा पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला. ९० च्या दशकातील कायदा-सुव्यवस्थेच्या बिघडलेल्या परिस्थितीच्या आठवणी अनेक वृद्ध मतदारांच्या मनात अद्याप जिवंत आहेत. प्रचारादरम्यान उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा यांच्या ताफ्यावर झालेल्या हल्ल्याचा मुद्दा एनडीएने प्रभावीपणे उचलून धरला आणि याचा वापर करत राजदच्या कारभारातील अस्थिरतेची आठवण मतदारांना करून दिली. जातीय समीकरणाच्या दृष्टीने पाहता यात मोठा बदल दिसून आला. राजदची सर्वात मजबूत पायाभरणी म्हणजे मुस्लीम-यादव (एमवाय) समीकरण. पण या निवडणुकीत 'एमई' म्हणजे 'महिला ईबीसी' हा नवीन घटक निर्णायक ठरला. ईबीसींची जवळपास ३६ टक्के मते आणि विविध दलित गटांचे मतदान एनडीएकडे मजबूतपणे वळले. नितीश कुमार यांची ईबीसींवरील पकड, भाजपचा वरचढ असलेला सवर्ण आधार, एलजेपी व आरएलएमचे दलित व मागासवर्गीयांवरील प्रभाव आणि एचएएमचा खास मतदारवर्ग या सर्वांचा संयोग महागठबंधनाच्या जातीय अंकगणितावर भारी पडला. महिलांच्या मतदानाचा मोठा ओघ तर निर्णायक ठरला. अनेक जिल्ह्यांत महिला मतदारांची उपस्थिती पुरुषांच्या तुलनेत १० ते २० टक्क्यांनी जास्त होती. जीविका समूहांमधील दीदींचे सक्षमीकरण, मदतीसाठी नियुक्त स्वयंसेविकांचे जाळे आणि अनेक कल्याणकारी योजनांनी महिलांचा विश्वास एनडीएकडे दृढ केला. मतदारांच्या मनात नितीश कुमार यांचे व्यक्तिमत्त्व अजूनही प्रभावी आहे. वयाचा उल्लेख चर्चेत येत असला तरी त्यांच्या प्रशासनाच्या सातत्याने निर्माण झालेला 'सुसाशन'चा ठसा टिकून आहे. गेल्या काही वर्षांत जेडीयूचा प्रभाव कमी झाला असल्याचे अनेक राजकीय विश्लेषकांचे मत होते, परंतु भाजप आणि जेडीयू यांच्यातील रसायनशास्त्रही यावेळी अधिक परिपक्व दिसले. एकूणच पाहता, बिहारच्या मतदारांनी या निवडणुकीत दोन गोष्टी स्पष्ट केल्या. पहिली म्हणजे स्थैर्य आणि विकासाला दिलेले प्राधान्य आणि दुसरे म्हणजे सामाजिकदृष्ट्या विस्तारित आघाडीला जनादेश देण्याची प्रवृत्ती. बिहारच्या राजकीय इतिहासातील ही निवडणूक केवळ बहुमताचा विक्रमच नाही, तर नवीन राजकीय समीकरणांच्या युगाची सुरुवात असल्याचे संकेत देणारी आहे.

# गिरवा केरळचा आदर्श

**केरळ हे भारतातील दक्षिणेकडील राज्य नितांतसुंदर निसर्गासाठी जसे ओळखले जाते, त्याचप्रमाणे साक्षरतेबाबतही या राज्याने देशापुढे आदर्श उभा केला आहे. केरळचा साक्षरता दर ९६.२ टक्के इतका असून तो याबाबत देशात सर्वाधिक आहे. शिक्षण हा केरळच्या सामाजिक विकासाचा मुख्य आधार आहे.**

केरळमध्ये शालेय शिक्षण सोडणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. 'साक्षरता मिशन' आणि 'अक्षरलक्ष्यम' सारख्या उपक्रमांमुळे या राज्यात प्रौढ निरक्षरतेवर नियंत्रण मिळाले आहे. शैक्षणिक क्रांतीनंतर केरळने आता सामाजिक कल्याण क्षेत्रात देशासाठी आदर्श निर्माण केला आहे. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी अलीकडेच विधानसभा अधिवेशनात एक महत्त्वपूर्ण घोषणा केली असून त्यानुसार केरळ हे राज्य अत्यंत गरीबीच्या सावटातून मुक्त झाले आहे. अशा प्रकारची किमया साधलेले केरळ हे देशातील पहिले आणि एकमेव राज्य आहे. गेल्या चार वर्षांपासून राबविलेल्या एक्स्ट्रीम पॉव्हर्टी इरॅडिकेशन प्रोग्राम या सामाजिक उपक्रमाचा सुपरिणाम म्हणून याकडे पाहिले जात आहे. या उपक्रमामध्ये अतिगरीबी दूर करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवक, आरोग्य विभाग आणि शिक्षण विभाग यांनी एकत्रितपणे काम केले.विजयन यांच्या मते, ही उपलब्धी सरकार, विविध विभाग आणि स्वयंसेवकांच्या कठोर परिश्रमाचे फळ आहे. २०२१ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाला डाव्या आघाडीच्या (एलडीएफ) सरकारच्या पहिल्या कॅबिनेट बैठकीत मान्यता मिळाली होती. यानुसार राज्यातील कोणताही नागरिक अन्न, निवारा, आरोग्य किंवा उत्पन्नाच्या अभावामुळे वंचित राहू नये, असे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी राज्यभर एक मोठे सर्वेक्षण राबविले गेले.केरळ इन्स्टिट्यूट ऑफ लोकल ॲडमिनिस्ट्रेशनच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ४ लाख एन्युमरेटर म्हणजेच गणक नेमले गेले. त्यांनी घराघरात जाऊन अन्न, आरोग्य, उत्पन्न आणि निवास या चार मूलभूत मापदंडांवर माहिती गोळा केली. ज्या कुटुंबांकडे हे चारही घटक नव्हते, त्यांना अत्यंत



गरीब म्हणून ओळखले गेले. या सर्वेक्षणातून एकूण ६४,००६ कुटुंबे अत्यंत गरीब म्हणून नोंदवली गेली. त्यामध्ये १,०३,०९९ व्यक्ती होत्या. त्यापैकी ४३,८५० एकल सदस्यीय कुटुंबे होती. नंतर स्थलांतर, मृत्यू आणि पडताळणी झाल्यानंतर अंतिम आकडा ५९,२७७ वर आला. या प्रत्येक कुटुंबासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने मायक्रोप्लॅन तयार करण्यात आला. हे मायक्रोप्लॅन अल्पकालीन (तत्काळ मदत), मध्यमकालीन (तीन महिने ते दोन वर्षांत पूर्ण होणारी उद्दिष्टे) आणि दीर्घकालीन (स्थायी पुनर्वसन आणि आत्मनिर्भरता) अशा तीन टप्प्यांमध्ये विभागले गेले. या उपक्रमांतर्गत ३९१३ कुटुंबांना घरे१,३३८ कुटुंबांना जमीनीसह निवास, ५,६५१ कुटुंबांच्या घरांची दुरुस्ती, आणि ४३९४ कुटुंबांना रोजगाराचे साधन देण्यात आले. आरोग्यसेवा क्षेत्रात ८५,७२१ लोकांना औषधे आणि उपचार पुरविण्यात आले. तसेच ५,७७७ रुग्णांना पॅलिएटिव्ह केअर सेवा उपलब्ध करण्यात आली. २०,६४८ लोकांसाठी सामुदायिक स्वयंपाकगृहांतून दररोज तीन वेळा भोजन दिले गेले, तर २,२१० कुटुंबांना दररोज शिजविलेले अन्न थेट पोहोचविण्यात आले. या सर्व योजनांसाठी एकूण १,००० कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च करण्यात आला.या प्रकल्पाअंतर्गत २१,२६३ कुटुंबांना रेशन कार्ड आणि आधारसह ओळखपत्रे उपलब्ध करून देण्यात आली. अनेक लाभार्थी अशा गटांतून आले होते ज्यांचे नाव मतदार यादीत नव्हते आणि ज्यांच्याकडे कोणताही सरकारी दस्तऐवज नव्हता.त्यांना नव्याने सरकारी प्रणालीत सामील करून घेणे हे स्वतःत एक मोठे प्रशासनिक आव्हान होते. पण नियोजनबद्धरित्या त्यावर मार्ग काढण्यात आला. राज्य सरकारच्या दाव्यानुसार, ४३ लाख कुटुंबांना मोफत आरोग्य विमा, ४.७० लाख बेघर कुटुंबांना घर आणि ४ लाख कुटुंबांना जमीनवाटप करण्यात आले. एकूण ६२ लाख कुटुंबांना सामाजिक

**दैनंदिनी**

पेन्शन दिली गेली, आणि ६,००० सार्वजनिक आरोग्य केंद्रे उभारली गेली. या प्रयत्नांमुळे केवळ भौतिक सुविधांचा विस्तार झाला नाही, तर राज्याने सस्टेनेबल डेव्हलपमेंट इंडेक्सवर उल्लेखनीय प्रगतीही केली आहे.विशेष म्हणजे मुख्यमंत्री विजयन यांनी या यशाबद्दल गर्वभाव न ठेवता ही एका नव्या टप्प्याची सुरुवात आहे,असे म्हटले आहे.

तसेच ही गरीबीमुक्त स्थिती टिकवून ठेवण्यासाठी नियमित निरीक्षण, डेटा पुनर्पडताळणी आणि सामाजिक सहभाग वाढविण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. या प्रकल्पाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे महिलांच्या स्वयंसेवी संघटनांनी विशेषतः कुडुंबश्री मिशनने अन्नकिट वितरण, वैद्यकीय मदत आणि आर्थिक सल्ला केंद्रांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. यामुळे केवळ अतिगरीब कुटुंबांचे पुनर्वसन झाले नाही, तर सामाजिक विश्वासनिर्मितीही प्रस्थापित झाली. अर्थात आव्हाने अद्याप संपलेली नाहीत. मुख्यमंत्री विजयन यांनी स्वतः विधानसभेत म्हटले, ही शेवट नाही, तर सुरुवात आहे. गरीबीचे दुष्टचक्र पुन्हा गमितान होऊ नये यासाठी सतत निरीक्षण आणि सुधारणा आवश्यक आहेत. पण तूर्त तरी केरळने आपल्या या दारिद्र्य निर्मूलनाच्या मॉड्युलने देशापुढे आदर्श ठेवला आहे.

# अपघाताच्या घटनांचे वाढते प्रमाण चिंताजनक

**देशात साधारणपणे दरवर्षी १३.५ लाख लोक रस्ते अपघातांमुळे आपला जीव गमवतात. तसेच ५ कोटी अपघातात जखमी होतात. यातील अनेक जण आयुष्यभरासाठी अपंग होतात. रस्ते अपघातग्रस्तांच्या गरजा लक्षात घेऊन, रोड पीस नावाच्या स्वयंसेवी संस्थेने १९९३ मध्ये रोड ट्रॅफिक बळींसाठी जागतिक स्मरण दिन सुरू केला. हा दिवस संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने २६ ऑक्टोबर २००५ रोजी रस्ता अपघातातील बळी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे दु:ख जगाला कळण्याकरिता स्वीकारला. रस्ते अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी दरवर्षी नोव्हेंबरच्या तिसऱ्या रविवारी रस्त्यावरील अपघातग्रस्तांसाठी जागतिक स्मरण दिन साजरा केला जातो.**

भारतातील रस्ते अपघाताची आकडेवारी रस्ते वाहतूक व राज्य महामार्ग मंत्रालयाकडून दरवर्षी प्रसिद्ध केली जाते. यातून समोर येणारी आकडेवारी अत्यंत चिंताजनक आहे. साधारणपणे देशात भारतात दर तासाला ५३ अपघात होतात. या अपघातांमध्ये दर तासाला साधारणपणे १९ मृत्यू होत आहेत ही खूप गंभीर बाब आहे. याची प्रमुख कारणे ही वाहन चालवताना सतर्क नसणे, रस्त्यावरील सुस्थितीतील दिशादर्शक नसणे, वाहन सुस्थितीत नसणे, मोटरसायकल चालवताना हेल्मेट व इतर वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर न करणे. वाहतूक नियमांचे पालन न करणे, अती वेगाने वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईल वापरणे, दारू व इतर मादक पदार्थांचे सेवन करून वाहन चालवणे. यामध्ये सर्वात महत्वाचे कारण म्हणजे काही ठराविक चालक हे वाहतुकीच्या कोणत्याही नियमांचे पालन न करता बेजबाबदारपणे वाहने चालवत असतात. अक्षरश: गाडी चालवणे म्हणजे वेगाची नशा चढल्यासारखे अमर्याद वेगाने वाहन चालवले जाते.यामुळे बरेचसे अपघाताचे प्रसंग उद्भवतात व साहजिकच त्याचा परिणाम इतर वाहन धारकांनाही भोगावा लागतो. यामध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागतो. अनेकांना कायमचे अपंगत्व येते, बहुमोल शरीराचे अनेकदा अनेक अवयव गमवावे लागले आहेत. रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या भारतात जास्त आहे. बऱ्याच वेळा ग्रामीण भागात आपण पाहिलंत तर कमी वयातील मुलांच्याकडे वाहन चालवण्यास



दिले जाते, अनेक वाहनांना ब्रेक कमी असतात, हेडलाईट, इंडिकेटर खराब असतात. काही काही वाहनधारक तर जास्त प्रकाशासाठी वाहनाच्या मूळ लाईट शिवाय एक्स्ट्राची हेडलाईटचे एलईडी बल्ब लावत असतात. त्यामुळे रात्रीच्या समोरून येणाऱ्या इतर वाहन चालकांना काहीच दिसत नाही बऱ्याच वेळा या लाईट अप्पर डिप्पर करता येत नाहीत, अनेक वाहनधारक मद्यपान किंवा इतर नशा करून वाहन चालवत असतात.

वाहन चालवताना थोडी काळजी घेतली तर अशा प्रकारचे असंख्य अपघात टाळता येऊ शकतात व त्यामुळे स्वतःचे व इतरांचे प्राणही वाचवता येऊ शकतात. वाहन चालवताना जे वाहतुकीचे नियम आहेत ते पाळूनच वाहन चालवणे गरजेचे आहे. वाहतुकीचे नियम हे वाहतुकीला व वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठीचे आहेत व सर्वांनी ते पाळणे गरजेचे आहे व ते सर्वांच्या हिताचेच आहेत वाहन चालवताना चालकांनी हेल्मेट, सीट बेल्ट या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक गोष्टीचा वापर करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर वाहन नेहमी सुस्थितीत ठेवून, त्याचे इन्शुरन्स काढणे आवश्यक आहे. सोबतच मानवतावादी दृष्टीने रस्ते अपघातात जखमींना तातडीने मदत करणे आवश्यक आहे. रस्ते अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व अपंगत्व आलेल्या व्यक्तींच्या कुटुंबांना कायदेशीर मदत मिळणे आवश्यक आहे.रस्ते अपघातास जबाबदार व्यक्तीवर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे.रस्ते अपघात व त्यामधील दोषी व त्यांच्यावर होणारी कारवाई त्याबाबत असणारे नियम यामध्ये बदल व आवश्यकतेनुसार सुधारणा होणे गरजेचे आहे.

संयम व सतर्कता बाबत जनजागृती करणारा, अपघातग्रस्तांसाठी जागतिक स्मरण दिनाच्या निमित्ताने सर्वांनी रस्ते अपघातात बळी पडलेल्या लोकांच्या प्रियजनांना, त्यांनी गमावलेल्या कुटुंबातील सदस्यांच्या विरहाची जाणीव करून देणे, सोबतच जनजागृतीचे विविध उपक्रम रॅली, पथनाट्य ,जनजागृती कार्यक्रम,पॅनल चर्चा या यासारखे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवणे आवश्यक आहे.

■ **अमोल पाटील,ओझर्डे,जि. सांगली**

सध्या देशभर भटक्या कुत्र्यांचा आणि बिबट्यांचा धुमाकूळ विशेषत्वाने पाहायला मिळतो आहे. या भटक्या कुत्र्यांनी आणि बिबट्यांनी इतका उच्छाद मांडला आहे की, ज्या शहरांमध्ये व गावांमध्ये स्वतःला सुरक्षित म्हणून सामान्य माणूस राहतो तिथेच आता या भटक्या कुत्र्यांनी आणि बिबट्यांनी सुद्धा शिरकाव केल्याने त्यांच्या या हिंस्त्र आक्रमणाला तोंड देता देता सामान्य माणसाला नाकीनऊ येत आहे.

# उदासीनतेचे निष्पाप बळी


अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने याबाबत कठोर निर्देश देऊन रुग्णालय, शाळा, महाविद्यालय म्हणजेच जी सार्वजनिक ठिकाणे आहेत त्या ठिकाणी या भटक्या कुत्र्यांना तातडीने आवर घालण्याच्या सूचना केल्या आहेत.एकीकडे हे निर्देश दिले जात असतानाच महाराष्ट्रासारख्या राज्यात सुद्धा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला गावागावातला किंवा खेड्यापाड्यातला बिबट्यांचा धुमाकूळ थांबण्याकरिता काही उपाय करायला सुरुवात केली आहे. परंतु महाराष्ट्रातही बिबट्यांबरोबर भटक्या कुत्र्यांची ही समस्या आहे. व्यापक अर्थाने विचार केला तर मनुष्याच्या किंवा सर्वसामान्य माणसाच्या आजूबाजूला कोणती हिंसक घटना कशाप्रकारे घडून येईल याचा भरोसा नसतो. मग कधी जातीवादाचे हिंस्त्र रुप पाहायला मिळते तर कधी राजकीय हेवादाव्यांमधून एकमेकांच्या हत्या करण्याच्या दिल्या जाणाऱ्या सुपाऱ्यांचा हिंस्रपणा पाहायला मिळतो. माणसांचा व्यवहार तर दुसरीकडे जे मुके प्राणी आहेत ते मुके प्राणीसुद्धा माणसाला हैराण करण्यासाठी टपून बसलेले पाहायला मिळतात.एकूणच समाज व्यवस्थेचा विचार करताना भटक्या कुत्र्यांपासून ते बिबट्यांपर्यंत किंवा माणुसकीलाही काळीमा फासणाऱ्या अनेक हिंसक घटनांचा एक विचित्र आघात सातत्याने पाहायला मिळतो आहे. सर्वोच्च न्यायालयाने कुत्र्यांबाबतचे दिलेले आदेश हादेखील देशातला एक अभूतपूर्व प्रकार ठरतो. ज्या कुत्र्यांना आपण पाळीव प्राणी समजतो आणि ज्यांच्याकडे नेहमीच दुर्लक्ष होत असते परंतु तोच कुत्र्यांचा विषय हा थेट सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख निर्देशाचाही एक भाग होतो यावरून त्याची गंभीरता प्रकर्षाने लक्षात येते.

**सुरक्षिततेचे आव्हान..**

एकूणच वेगवेगळ्या पद्धतीने या समस्यांना सामोरे जाण्याची वेळ सामान्य माणसावर येत असते आणि म्हणूनच त्याच्या सुरक्षिततेचे प्रश्न अधिकाधिक गंभीर होत आहेत. या सर्व परिस्थितीतून स्वतःला सहीसलामत ठेवणे हीदेखील त्याच्यासाठी मोठी कसरत ठरलेली आहे. याच्या बरोबरीने दिल्लीसारख्या महानगरात तर आता प्रदूषणासारखा जीवघेणा प्रकार अतिशय गंभीर झालेला आहे. त्या प्रदूषणाच्या संदर्भात सुद्धा सर्वोच्च न्यायालयाला निर्देश द्यावे लागले आहेत. दिल्ली खालोखाल मुंबईच्या प्रदूषणातही वाढ होते आहे आणि जागतिक पातळीवरच्या एका सर्वेक्षणातून असे सिद्ध झालेले आहे की, गेल्या वर्षभरामध्ये प्रदूषणाच्या कारणाने तब्बल वीस लाख लोकांचे मृत्यू झालेत. कधी कोणाला या प्रदूषणातून आतड्यांचा रोग, हृदयविकार, श्वसनाचे रोग अशा प्रकारच्या व्याधी जडतात आणि त्यात त्यांचे बळी जात असतात. म्हणून या समस्यांचा बंदोबस्त करणे आणि जिथे मनुष्याच्या जीवालाच धोके उत्पन्न होत आहेत त्याला सर्वाधिक प्राधान्य देऊन या समस्यांचे निराकरण करणे अत्यंत गरजेचे ठरते. शोकांतिका हीच आहे की, सरकारी यंत्रणा याबाबतीत आवश्यक ती तत्परता दाखवत नाहीत आणि त्या उदासीनतेचे निष्पाप बळी जात राहतात.

■ **शिवाजी चौगुले,कागल**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शनिवार,ता.१५.११.२०२५**, विक्रम संवत २०८२, शिवशक ३५२, शालिवहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे, दक्षिणायणे, शरद ऋतो, कार्तिक मासे, कृष्ण पक्षे, एकादशी तिथी, २६.३८ नंतर द्वादशी तिथी, उत्तरा नक्षत्र, २३.३४ नंतर हस्त नक्षत्र, कन्या रास, विष्कंभ योग अहोरात्र, बवकरण १३.४० नंतर, बालव करण २६.३८ पर्यंत, दिनमान ११.१५, सुर्योदय ६.४०, सुर्यास्त १७.५५ (कोल्हापूरचे), राहूकाळ सकाळी ९ ते १०.३०, उत्पत्ती एकादशी, आळंदी व निर्मळ यात्रा, मध्यम दिवस, धान्य कापणी, मळणी संग्रह, बी ऊस लागवड, मिरची लागवड, घर बदलणे, प्रवास.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**- आपल्या करिअरवर लक्ष केंद्रीत करण्याऐवजी इतर आउटडोअर उपक्रमांकडे असणाऱ्या मुलांच्या ओढ्यामुळे तुम्हाला निराशा येऊ शकते.

**वृषभ**-आज तुम्हाला अनेक नवीन आर्थिक योजना सादर केल्या जातील. कोणतेही वचन देण्याआधी सदर योजनेच्या चांगल्या-वाईट बाबी तपासून पाहा.

**मिथून**- मागच्या दिवसात तुम्ही जितके धन आजचा काळ उत्तम बनवण्यासाठी गुंतवणूक केली होती त्याचा फायदा आज तुम्हाला मिळू शकतो.

**कर्क**- कुटूंबातील सदस्यांसोबत संमेलन, एकत्रित कार्यक्रम केल्याने प्रत्येकाचा मूड चांगला बनेल. इतरांना मदत करण्यासाठी आपला वेळ आणि शक्ती खर्च करा.

**सिंह**-आरोग्य चांगले राहील.व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो.आज तुम्ही धन संबंधाने जोडलेल्या समस्यांच्या कारणाने चिंतीत राहू शकता.

**कन्या**-धार्मिक स्थळी किंवा एखाद्या संतसदृश माणसाला भेटून तुम्हाला मन:शांती मिळेल.आपलं काम आणि प्राथमिकता यावर सारे लक्ष केंद्रीत करा.

**तुळ**- धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. तुमचे व्यक्तीमत्व आणि मोहक आकर्षकता यामुळे काही नवे मित्र जोडाल.

**वृश्चिक**-आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. आजुबाजूला काय घडत आहे याची जाणीव ठेवा. आर्थिक जीवनात आज आनंद राहील.

**धनु**-आज तुमच्या उत्तम अंदाजाने तुमचे सहकर्मी तुमच्याशी आकर्षित होऊ शकतात. तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल

**मकर**- आजच्या दिवशी केलेले स्वयंसेवी कामाचा उपयोग केवळ ज्यांना मदत केली त्यांनाच न होता स्वत:कडे सकारात्मकपणे पाहण्यास होईल.

**कुंभ**-मुलांच्या यशस्वी होण्यामुळे तुम्हाला अभिमान वाटेल. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनाची शांती असेल.

**मीन**-शांततेचा वास तुमच्या मनामध्ये राहील आणि म्हणून, तुमच्या घरात ही उत्तम वातावरण ठेवण्यात यश मिळेल. सामर्थ्याशिवाय अन्यायाचा प्रतिकार करता येणार नाही.

## वाचकांचा पत्रव्यवहार

# जागतिक सत्ता संघर्षातून तिसऱ्या महायुद्धाचे बीज

अमेरिका अनेक वर्ष महासत्ता बनून जगावर राज्य करत आहे पण दक्षिण आशियातील चीन आज ना उद्या अमेरिकेला अडचणीत आणून महासत्ता बनेल अशी भीती अमेरिकेला आहे. त्यामुळे चीनला शह देण्यासाठी त्याच्या शेजारील देशात अस्थिरता निर्माण करणे हा अमेरिकेच्या युद्धनीतीचा भाग आहे. चीनचा दक्षिण आशियातील वाढता प्रभाव कमी करण्यासाठी, त्याच्यावर सातत्याने लक्ष ठेवण्यासाठी अमेरिकेने बांगलादेशाकडे सेंट मार्टिन बेट देण्याची मागणी केली होती त्याला तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांनी ठामपणे नकार दिल्याने त्यांना पदावरून पदच्यूत व्हावे लागले.

भौगोलिक दृष्टीने हे बेट अत्यंत महत्वाचे आहे कारण ते जगाच्या कोणत्याही भागातून समुद्री मार्गाने सहज गठता येते. हा भाग रणनैतिकदृष्ट्याही अतिशय संवेदनशील आहे. या बेटावरून चीन आणि भारत यांच्यावर लक्ष ठेवता येते त्या दृष्टीने बांगलादेशात केलेली कारवाई देशासाठी गंभीर चेतावणी आहे. अमेरिकेची तिरकी चाल, चीनचा विस्तारवाद आणि पाकचा आतंकवाद अशा तिहेरी कचाट्यातून देशाला सोडवण्यासाठी आगामी काळात भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणाचा कस लागणार आहे. अमेरिका आणि चीन पाकिस्तानचा भारताविरुद्ध प्यादे म्हणून वापर करत आहे. शत्रूचा नायनाट करायचा असल्यास त्याला जी भाषा समजते त्याच भाषेत उत्तर देणे आवश्यक आहे, त्यानुसार परराष्ट्र धोरण आखणे त्याचबरोबर त्याला कृतीतील शौर्याची जोड असावी लागते, स्वावलंबित्व, सुसज्ज गुप्तचर यंत्रणा, रोखठोक परराष्ट्र धोरण आणि धडक कृती ही चतु:सुत्री भारताची प्रबळ शस्त्रे आहेत. या शस्त्रांच्या आधारे शत्रूला नेस्तनाभूत करून देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण होऊ शकते हे लक्षात घेऊन कृती करणे यातच देश हित आहे.

■ **लीना गाडगीळ**

# बिबटे मानवी वस्तीकडे का झेपावत आहेत?

निसर्ग स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी मनुष्य, प्राणी वनस्पती यामध्ये संतुलन ठेवतो मात्र गेल्या काही वर्षात माणसाने निसर्गाला ओरबाडणेच सुरु केले आहे त्यामुळे काही प्राणी खाद्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येवू लागले आहेत आणि त्यांच्या पाठोपाठ बिबट्यांनीही मानवी वस्तीची वेस ओलांडली आहे. मानवाच्या कोणत्याही क्रियेवर निसर्ग प्रतिक्रिया देतचं असतो ज्यावेळी माणसे निसर्गाच्या संतुलनामध्ये ढवळाढवळ करतात तेव्हा निसर्ग त्यावरील प्रतिक्रिया देतो. गेल्या काही वर्षात धरणासाठी, कधी रस्त्यांसाठी कधी घरांच्या सजावटीसाठी माणसांनी जंगलावर कुऱ्हाड चालवली आणि आता निसर्ग त्यावरील आपली प्रतिक्रिया वेगवेगळ्या माध्यमातून देत आहे. बिबटे मानवी वस्तीकडे येण्यामध्ये केवळ जंगलतोड एकमेव कारण नाही. पूर्वापार गावांची वस्ती साधारण मध्यभागी होती. त्यानंतर मोकळा भाग मग शेती आणि घनदाट जंगल अशी गावांची रचना होती. शेती करण्याचे प्रमाण अधिक असल्याने वर्दळ अधिक असायची अशावेळी जंगलातील प्राण्यांना शेतीपर्यंत किंवा त्यापुढे येणे शक्य नव्हते. पण गेल्या काही वर्षात शेती करण्याचे प्रमाण कमी झाल्याने तिथे खुरटी झाडेझुडपे वाढत आहेत.

मानवी वस्तीची वर्दळ कमी झाल्याने बिबटे अर्थात जंगली प्राणी वस्तीकडे धाव घेत आहेत. भटकी कुत्री, कोंबड्या, शेळ्या मेंढ्या, इतकेच नाही तर उंदीर, घुशी खाण्यात बिबट्याला अधिक रस वाटू लागला आहे. म्हणजेच जंगल तोडीमुळे माकडे मानवी वस्तीकडे आली. त्यापाठोपाठ बिबट्याही आला त्याला कमी श्रमात खाणे मिळू लागल्याने मानवी वस्तीला अधिक पसंती देत असल्याचे दिसून येते आहे. बिबट्यांची संख्या वाढत आहे हे असेच सुरु राहिले तर प्रवासात कुठल्याही वळणावर बिबट्या दिसण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यासाठी मानवाने निसर्गाच्या संतुलनाला धक्का लावू नये.

■ **राजू जाधव,**
**मांगूर (जि.बेळगाव)**

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अ‍ॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# चिकोडीत विविध ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य

## पालिकेचे दुर्लक्ष; दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

चिकोडी,ता.१४(प्रतिनिधी)-

**येथील नगरपालिकेने गेल्या अनेक वर्षांपूर्वी प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला होता. तो काही काळ राबविण्यात आला होता. मात्र प्लॉस्टिक बंदीचा पुन्हा बोजवारा उडाला असून शहरात विविध ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य वाढत चालले आहे.**

शहरातील मुख्य असलेल्या वर्दळीच्या मार्गासह, इतर परिसरात प्रवेश घेण्याच्या ठिकाणीच कचरा टाकल्याने कित्येक दुचाकी-चारचाकी, पादचारी नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. शहरातील मुल्ला प्लॉट हा मोठा असून कित्येक दिवसांपासून तेथील कचरा हललेला नाही.त्यामुळे नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

चिकोडी शहर हे तालुक्याचे मुख्य केंद्रबिंदू असल्याने त्यामध्ये चाळीस खेडेगावातील नागरिकांची विविध कामासाठी नेहमी वर्दळ सुरू असते. त्यामुळे परिसर नेहमी गजबजलेला असतो. चिकोडी परिसरात विविध हॉटेल आणि नाष्टा सेंटरची खूप दुकाने आहेत. केसीरोड, इंदिरानगर, बसवसर्कल,अंकली कूठ या ठिकाणी हॉटेल नाष्टा स्टॉलमधून पार्सल घेतलेले पदार्थ खाऊन नागरिक ते खुल्या मार्गावर टाकतात. त्याचबरोबर त्यात शिल्लक असलेले खाद्यपदार्थ परिसरात वावरणारी खुली जनावरे खात राहतात.



चिकोडी : येथील मुल्ला प्लॉट मार्गावर कचऱ्याचे साचलेले ढीग.

**कचऱ्यात कालावधी संपलेली औषधे, सिरिंजचा समावेश**

शहरात विविध ठिकाणच्या कचऱ्यात कालावधी संपलेली घातक औषधे सिरिंज उघड्यावर टाकले जातात. मात्र त्याचा वाईट परिणाम नगरपालिकेच्या कचरा गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आरोग्यावर होवू शकतो. त्यामुळे नागरिकांनी कोणते खराब साहित्य कचऱ्यात टाकावे. हे समजून घेणे गरजेचे आहे. आपल्यामुळे इतर कुणाचा जीव धोक्यात घालावा लागतो.याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.

कचऱ्यात टाकलेले प्लास्टिक वाऱ्याने विस्कटून इतरत्र पसरले जातात. कुजलेल्या अन्नाची दुर्गंधी वातावरणात पसरल्याने त्याचा आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे नगरपालिकेने शहरातील विविध ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य तातडीने हटवून त्याची योग्यरीत्या विल्हेवाट लावावी याकडे अधिक लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. यापुढील काळात रोगराई पसरणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे.

# तांबाळे साखर कारखान्याचा दर ३५०० रुपये जाहिर

गारगोटी,ता.१४(प्रतिनिधी)-

**भुदरगड तालुक्यातील अथणी शुगर्स लि. च्या तांबाळे साखर कारखाना यंदाच्या हंगामात उसाला प्रति टन ३५०० रुपये दर देणार असल्याचे प्रशासनाकडून जाहिर करण्यात आले आहे.**

कारखान्याच्या कार्यकारी संचालकांकडून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गाळप हंगाम २०२५-२६ करिता कारखान्यात गाळपास येणाऱ्या ऊसास प्रति मेट्रिक टन ३५०० रुपये ऊस दर देण्याचे व्यवस्थापनाने जाहीर केले असून यामध्ये पहिला हप्ता रुपये ३४०० प्रति मे. टन व दुसरा हप्ता १०० रुपये अदा करण्यात येणार आहे. तसेच रेव्हेन्यू शेअरिंग फॉर्म्युलाप्रमाणे (आरएसएफ) निघणारी रक्कम तिसरा हप्ता दिला जाईल असेही सांगण्यात आले आहे.

# केंपवाड अथणी शुगरकडून ३३०० रुपये दर जाहिर

कागवाड,ता.१४(वार्ताहर)-

**यंदाच्या २०२५-२०२६ गाळप हंगामात पुरवठा करणाऱ्या ऊस उत्पादकांच्या ऊसाला शासनाच्या अनुदानासहीत केंपवाड येथील अथणी शुगर लि. कडून प्रतिटन ३३०० रुपये अदा करणार असल्याची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक श्रीनिवास पाटील यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली.**

पाटील पुढे म्हणाले, ऊस उत्पादकांच्या पाठबळाबर आजतागायत गाळप हंगाम यशस्वीरित्या पार पडले आहेत. तसेच कारखानाही ऊस उत्पादक वर्गाचे हित जोपासण्यावर भर देत आला आहे. यंदाच्या गाळप हंगामात शासन ५० रू. व कारखाना ३२५० असे एकूण प्रतिटन ऊसास ३३०० रू. ऊस दर अदा करण्यात येणार आहे.यंदाच्या गाळप हंगामात वीस लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांनी अधिकाधिक ऊस पुरवठा करुन सहकार्य करावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

# निपाणीत बॉम्बस्फोट घटनेचा निषेध

निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)-

**पाकिस्तान हा देश निर्माण झाल्यापासून आपल्या देशावर सतत आतंकवाद्यांच्या माध्यमातून कुरघोडी करत आहे. आजच्या तरुणांनी केवळ सामाजिक माध्यमांद्वारे पोस्ट टाकण्याएवढेच सिमीत न रहाता देशाच्या रक्षणासाठी आणि सेवेसाठी तत्पर राहिले पाहिजे, असे मत श्री विरुपाक्षलिंग समाधी मठाचे मठाधिपती प.पू.प्राणलिंग स्वामीजी यांनी व्यक्त केले.**

दिल्ली येथे कारमध्ये बॉम्बब्लास्ट करून आतंकवादी हल्ल्यात निष्पाप भारतीयांचा बळी घेणाऱ्या आतंकवाद्यांचा बुधवारी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकात निषेध करून ते बोलत होते.या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी मावळा ग्रुपचे उदय शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पाकिस्तानचा निषेध करून आतंकवाद्यांना चौकात फाशी देण्याची मागणी करण्यात आली यावेळी सागर श्रीखंडे, आकाश माने, राहुल सडोलकर, सुरेश भानसे, अभिजात सादळकर, युवराज पाटील, नंदेश सद्लगे, अजित सादळकर, अनिकेत फडतर, बबन निर्मले, अभिमन्यू भालुगडे,प्रतीक पळगे, प्रमोद पाटील,सतीश पोमई, सुशांत कांबळे, अनिल चौगुले, हेमंत चव्हाण, आकाश चव्हाण, राहुल पाटील, शांतिनाथ मुदकुडे, कृष्णात देवगुळ, दीपक भोपळे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्षाअखेरपर्यंत १९५ नगरपालिकांचा कार्यकाळ संपणार

बेंगळुरू,ता.१४(प्रतिनिधी)-

**राज्यातील १९५ नगर स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ चालू वर्षाच्या अखेरीस संपत असून, या संस्थांसाठी प्रभागनिहाय आरक्षण निश्चित करून अंतिम अधिसूचना जारी करण्यासाठी राज्य सरकारला १५० दिवसांची आवश्यकता आहे, अशी माहिती सरकारने उच्च न्यायालयाला दिली आहे.**

राज्य निवडणूक आयोगाला सर्व नगरपालिकांची (नगर स्थानिक स्वराज्य संस्था) मतदार यादी तयार करण्यासाठी ६० दिवसांचा कालावधी लागणार असल्याचेही सरकारने न्यायालयास कळवले आहे.न्यायमूर्ती सुनील दत्त यादव यांच्या अध्यक्षतेखालील एकल खंडपीठासमोर या संदर्भातील याचिकांवर सुनावणी झाली. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांसाठी दुसऱ्या कार्यकाळातील आरक्षण निश्चित करण्यात होत असलेल्या विलंबामुळे राज्यातील ७० हून अधिक नगरपालिकांच्या सदस्यांनी स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत. याचिकाकर्त्यांनी मागणी केली आहे की, प्रशासकांचा कार्यकाळ हा सभागृहाचा पाच वर्षांच्या कार्यकाळाचा भाग मानू नये. तसेच ज्या संस्थांचा कार्यकाळ संपणार आहे, त्यांच्या प्रशासकांची पुढील नियुक्ती सरकारने करू नये, असे निर्देश द्यावेत.

सुनावणीदरम्यान अतिरिक्त महाधिवक्ता प्रतिमा होत्रापूर यांनी न्यायालयात सादर केलेल्या मेमोमध्ये सांगितले की, न्यायालयाच्या आदेशानुसार पाच नोव्हेंबर रोजी राज्य निवडणूक आयोग आणि नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली, राज्यातील एकूण १९५ नगरपालिकांपैकी ५० पालिकांसाठी पुढील १५ दिवसांत प्रभागनिहाय आरक्षण निश्चित करून अधिसूचना आयोगाकडे सादर केली जाईल. उर्वरित १४५ नगरपालिकांसाठी माहिती जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळाल्यानंतर पुढील १५० दिवसांत अंतिम आरक्षण अधिसूचना जारी केली जाईल, असे नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## ११८ पालिकांवर प्रशासकांची नियुक्ती

राज्यातील एकूण ११८ नगरपालिकांवर प्रशासकांची नियुक्ती सहा नोव्हेंबर रोजी करण्यात आली आहे. यामध्ये ४२ नगरपरिषदा, ५३ नगरपालिका आणि २३ नगर पंचायतींचा समावेश असून या संस्थांचा पाच वर्षांचा कार्यकाळ १८ ऑक्टोबर ते सहा नोव्हेंबर २०२५ दरम्यान संपला आहे.प्रशासकांच्या नियुक्तीबाबत सरकारने जारी केलेल्या आदेशाला आव्हान देण्यासाठी याचिकाकर्त्यांनी अंतरिम अर्ज दाखल करण्याची आणि मूळ अर्जात सुधारणा करण्याची परवानगी मागितली आहे. खंडपीठाने ही विनंती मान्य करून पुढील सुनावणी १८ नोव्हेंबरपर्यंत तहकूब केली आहे.



अलाटवाडी येथे सरकारमान्य धान्य वाटप करताना प्रभारी सरपंच नम्रता माळी, सुधाकर पोवार, यशश्री मसुरकर व मान्यवर.

# अ.लाटवाडीत शिधापत्रिकाधारकांची सोय

पट्टणकोडोली,ता.१४(प्रतिनिधी)-

**अलाटवाडी (ता.हातकणंगले) येथील जागृती स्वयंसहाय्यता महिला समूहातर्फे सरकारमान्य रास्तभाव धान्य वाटप दुकानाचा शुभारंभ पट्टणकोडोली ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंच नम्रता माळी यांच्या हस्ते करण्यात आला.**

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ग्रामपंचायत सदस्य सुधाकर पोवार, बचत गटाच्या सीआरपी सविता स्वामी, वैशाली चव्हाण, धोंडीराम माळी, सुनिल अवघडे व मान्यवर उपस्थित होते.प्रारंभी जागृती स्वयंसहाय्यता महिला समूहाच्या अध्यक्षा यशश्री मसुरकर यांनी स्वागत करुन प्रास्ताविक केले.यावेळी प्रभारी सरपंच नम्रता माळी, अनिता कोगनोळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी जागृती स्वयंसहाय्यता महिला समूहाच्या सचिव स्वाती पाटील, सदस्या पूजा जाधव, संगीता पाटील, उमा जाधव, वैशाली चौगुले, सरिता जाधव, सायली मसुरकर, सविता केळुसकर, सरिता मसुरकर यांच्यासह अन्य मान्यवर, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोगनोळीत श्री कालभैरव जन्मोत्सव साजरा

कोगनोळी,ता.१४(प्रतिनिधी)-

**येथील लक्ष्मी नगरातील श्री कालभैरव मंदिरामध्ये बुधवारी जन्मोत्सव सोहळा अमाप उत्साहात पार पडला. त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेला होता.**

सकाळी गुरुवर्य युवराज उर्फ राजेश्वर गिरी महाराज यांच्या हस्ते श्रींची विधीवत पूजा करुन अभिषेक करण्यात आला. श्रीनाथ महाराज यांच्या हस्ते होमहवन विधी पार पडला तर गोविंद स्वामी यांनी पौराहित्य केले.यावेळी श्रींची आकर्षक पूजा बांधण्यात आली होती. तसेच मानाच्या बिरदेवाचे अश्व पूजन करण्यात आले.याप्रसंगी भक्तीगीतांचा सुश्राव्य कार्यक्रम संपन्न झाला.

# म.बसवेश्वर गुरुवार पेठ महिला शाखा अध्यक्षपदी परमणे,उपाध्यक्षपदी दुमाले

निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)-

**सहकार क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या श्री.महात्मा बसवेश्वर क्रेडिट सौहार्द सहकारी नि.निपाणीच्या गुरुवार पेठ महिला शाखेच्या अध्यक्षपदी वृषाली श्रीकांत परमणे तर उपाध्यक्षपदी स्मिता सदानंद दुमाले यांची सन २०२५-२०२६ या सालाकरिता एकमताने निवड करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन श्रीकांत परमणे होते.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले.**

मावळत्या चेअरमन अमा पाटील म्हणाल्या, गुरुवार पेठ महिला शाखेत २१ कोटी इतक्या ठेवी असून कर्ज वितरण ६ कोटी, कर्जाची वसुली ९६ टक्के, शाखेस १९ लाख ८७ हजार नफा झाल्याचे सांगितले. कार्यक्रमास सहकाररत्न संस्थापक चेअरमन डॉ. सी. बी. कुरबेटी, व्हा. चेअरमन प्रताप पट्टनशट्टी, संचालक एस. आर. पाटील, सुरेश शेट्टी, किशोर बाली, महेश बागेवाडी, अशोक लिगाडे, सदानंद दुमाले, सदाशिव धनगर, दिनेश पाटील, पुष्पा कुरबेट्टी, विजया शेट्टी, सुवर्णा पट्टणशेट्टी, सीईओ एस.के.अदनावर.तसेच गुरुवार पेठ महिला शाखा संचालिका उमा बागेवाडी, वैशाली पाटील, कल्पना कोठीवाले, मीनाक्षी लिगाडे यांच्यासह असंख्य सभासद हितचिंतक व ग्राहक उपस्थित होते.

स्वागत शाखा मॅनेजर व्यंकटेश कोरेगावकर यांनी तर आभार नूतन चेअरमन वृषाली परमणे यांनी मानले.



निपाणीः गुरूवार पेठ शाखेच्या नूतन चेअरमन वृषाली परमणे, व्हा.चेअरमन स्मिता दुमाले यांच्या सत्कारप्रसंगी मान्यवर.

# मुरगूड पालिका नगराध्यक्षपदासाठी सौ.भोसले,सौ.पाटील यांचे अर्ज दाखल

मुरगूड,ता.१४(प्रतिनिधी)-

**मुरगूड पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आजच्या चौथ्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी दोन तर नगरसेवक पदासाठी १२ असे एकूण १४ अर्ज दाखल झाले आहेत.**

नगराध्यक्षपदासाठी दोन उमेदवारी अर्ज दाखल झालेल्या मध्ये शिवसेनेकडून सौ.रेखा खाशाबा भोसले व भाजपकडून माजी नगराध्यक्ष प्रवीणसिंह पाटील यांच्या पत्नी सौ. सुहासिनी प्रविणसिंह पाटील यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.तर नगरसेवकपदासाठी १२ जणाकडून अर्ज दाखल करण्यात आले.नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यामध्ये राष्ट्रवादीकडून (अजित पवार गट) प्रामुख्याने माजी उपनगराध्यक्ष बजरंग सोनुले (प्रभाग क्रं ४ अ) रणजित सुनिल मगदूम (प्रभाग क्रं.१० ब) नामदेव अनंत भांदीगरे(प्रभाग ६ ब) या तिघांकडून अर्ज दाखल झाले.शिवसेनेकडून(शिंदे गट) शिवाजी विठ्ठल चौगले (प्रभाग क्रं ७ ब), पंकज आनंदा मेंडके (प्रभाग क्रं १० ब ), अनिल धोंडीराम राऊत (प्रभाग १० ब), सौ.सुरेखा कुंडलिक लोकरे (प्रभाग क्रं १० अ) या चौघांनी अर्ज दाखल केले. भाजपतर्फे सौ शुभांगी नंदकुमार दबडे (प्रभाग क्रं.१ब),सत्यजित अजितसिंह पाटील (प्रभाग क्रं ६ ब), संजय मोरबाळे (प्रभाग क्रं ८ ब)व अभिषेक पाटील (प्रभाग क्रं ९ ब), अपक्ष म्हणून समाधान नारायण गोरुले यांनी प्रभाग क्रं ८ ब मधून उमेदवारी अर्ज भरला.



मुरगूड नगराध्यक्षपदासाठी शिवसेनेतर्फे उमेदवारी अर्ज दाखल करताना सौ.रेखा खाशाबा भोसले तर भाजपतर्फे उमेदवारी अर्ज दाखल करताना सौ.सुहासिनी पाटील

# हिप्परगीत समर्थ संगमेश्वर महाराजांचा पुण्यस्मरणोत्सव सप्ताह साजरा

कागवाड,ता.१४(वार्ताहर)-

**जगाच्या इतिहासात भारतीय आध्यत्मिक संस्कृती श्रेष्ठ असल्याने माणुसकी धर्म टिकून आहे. धर्माला अध्यात्माची जोड मिळाल्यामुळे अनेक परंपरा राष्ट्र उन्नती, आत्म उन्नती, समाज उन्नती साधण्यासाठी गुरु परंपरेचे योगदान महत्वाचे असल्याचे प्रतिपादन इंचगेरी संप्रदायाचे, हिप्परगी मठाचे प. पू. प्रभूदेव महाराज यांनी येथे बोलतांना केले.**

हिप्परगी येथे सद्गुरु समर्थ संगमेश्वर महाराजांचा ९४ वा पुण्यस्मरणोत्सव सप्ताह सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी ते विमलब्रम्ह या विषयावर प्रवचनपर मार्गदर्शन करताना बोलत होते. याप्रसंगी मा.आ.जी.एस. न्यामगौड, प.पू.काडसिध्देश्वर महाराज, शंकर महाराज,गजानन महाराज, मंजुनाथ महाराज, सुदर्शन महाराज,आनंदसिध्द महाराज यांचेसह महाराष्ट्र कर्नाटक राज्यातील साधू संत उपस्थित होते. या पुण्यस्मरण धार्मिक सोहळ्यात दासबोध वाचन, प्रवचन, किर्तन, सर्वधर्म संमेलनासह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमास महाराष्ट्र,गोवा,आंध्र सह विविध राज्यातील भाविक उपस्थित होते.



बेडकिहाळ सर्कल ते दूधगंगा नदी रस्त्यावर पडलेले खड्डे.

# बेडकीहाळ सर्कल ते दुधगंगा पुल रस्त्याची वाताहात

बेडकिहाळ,ता.१४(वार्ताहर)-

**गेल्या काही महिन्यांपासून बेडकिहाळ सर्कल ते दूधगंगा पुलाच्या दरम्यानच्या रस्त्यावर ठिकठिकाणी लहान मोठे खड्डे पडले असून, वाहने चालवताना वाहन धारकांना मोठी अडचण निर्माण होत आहे.**

विशेष म्हणजे सध्या पूलापासून, चाँदशिरदवाडकडील रस्ता पुन्हा डांबरीकरण करण्यात आला असून, दूधगंगा नदी पुलाच्या दक्षिण भागातील सर्कलकडील रस्ताही डांबरीकरण करण्यात यावा,अशी मागणी परिसरातील नागरिकांतून, व वाहनधारकातून होत आहे. सध्या परिसरातील ऊस तोडणी हंगाम प्रारंभ झाला असून,याच रस्त्यावरून बैलगाड्या, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर गाड्या, ट्रक,एसटी बसेससह इतर वाहनांचीही वर्दळ मोठ्या प्रमाणात सुरू आहे. कर्नाटक व महाराष्ट्र राज्याला जोडणारा चिकोडी-इचलकरंजी जाणारा रस्ता असुन, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनधारकांना वाहन चालविणे म्हणजे तारेवरची कसरतच होत आहे. तेव्हा लवकरात लवकर उर्वरित रस्ताही करण्यात यावा, अशी मागणी वाहनधारक व नागरिकांतून होत आहे.

# दिंडेवाडी ओढ्यावरील साकव बांधकामाची चौकशी व्हावी

## शिवसेना ठाकरे गटाची मागणी

गारगोटी,ता.१४(प्रतिनिधी)-

**भुदरगड तालुक्यातील दिंडेवाडी गावात ओढ्यावर अलीकडे साठ लाख रुपये खर्चाचा साकव बांधण्यात आला आहे. हे काम अत्यंत निकृष्ट पद्धतीने झाले असून या कामाची चौकशी करावी व ठेकेदारावर कारवाई करावी अन्यथा मोठे आंदोलन करण्याचा इशारा भुदरगड तालुका शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने देण्यात आला आहे.**

दिंडेवाडी (ता.भुदरगड) येथील दलित वस्तीकडे जाणाऱ्या बेडकीच्या ओढ्यावर साकव बांधलेले असून त्या कामाकरिता ६० लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. तरी या कामाची शिवसेनेच्या वतीने जागेवर जाऊन पाहणी केली असता अंदाजपत्रकाप्रमाणे काम झालेले नाही व ते काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून सार्वजनिक बांधकाम खात्याने संबंधित ठेकेदाराकडून ते काम योग्य रीतीने करून घ्यावे शिवाय ठेकेदारावर कारवाई करावी. तसेच सार्वजनिक बांधकाम उप विभाग गारगोटी अंतर्गत सर्वच कामांची चौकशी करावी अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.याबाबतचे निवेदन सार्वजनिक बांधकाम खात्याला देण्यात आले. यावेळी निवेदन देतांना शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश पाटील,तालुकाप्रमुख अविनाश शिंदे, कृष्णात डाकरे, उपतालुकाप्रमुख अशोक पाटील, थॉमस डिसोझा, वसंत कांबळे, सुनील मस्कर,दत्तात्रय हिवाळे,संतोष कोटकर यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.



गारगोटी येथे सार्वजनिक बांधकाम खात्यास शिवसेना ठाकरे पक्षाच्यावतीने निवेदन देताना प्रकाश पाटील,अविनाश शिंदे, अशोक पाटील व इतर पदाधिकारी.

# कोगनोळीसह सीमाभागात रब्बी हंगामाला प्रारंभ

कोगनोळी,ता.१४(प्रतिनिधी)-

**कोगनोळीसह सीमाभागातील हदनाळ, मत्तीवडे, आप्पाचीवाडी आदी भागात रब्बी हंगामाला प्रारंभ झाला आहे.**

या परिसरात गेल्या आठ दिवसापासून अवकाळी पावसाने पूर्णपणे विश्रांती घेतल्यामुळे आणि थंडीला प्रारंभ झाल्यामुळे रब्बी हंगामातील शाळू, हरभरा पेरणीला प्रारंभ झाला आहे. काही शेतकरी बैलजोडीच्या साहाय्याने पेरणी करण्यात गुंतले आहेत तर काही शेतकरी मजुरांकडून पेरणी करुन घेत आहेत. बहुतांशी शेतकरी पेरणीसाठी आपल्या स्वतःकडील बियाणांचा वापर करीत आहेत तर काही शेतकरी कृषी सेवा केंद्रामधून आपल्या पसंतीचे बियाणे आणून पेरणी करण्यात मग्न झाले आहेत.

एकंदरीत पोषक वातावरण निर्माण झाल्याने रब्बी हंगामातील पेरणी साधण्यासाठी कर्नाटक सीमाभागात लगबग सुरु असून शेतशिवारातील गर्दी वाढल्याचे चित्र सर्वत्र पहावयास मिळत आहे.

# संकेश्वरात उद्या पोहण्याच्या स्पर्धेचे आयोजन

संकेश्वर,ता.१४(प्रतिनिधी)-

**येथील हिरण्यकेशी स्विमिंग ग्रुपच्या वतीने उद्या रविवार ता.१६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता हिरण्यकेशी नदीपात्रात पोहण्याच्या स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.**

पोहण्याची स्पर्धा दोन गटात घेतली जाणार आहे.लहान मुलांच्या स्पर्धेत १५ वर्षा खालील मुलांना भाग घेता येणार आहे.मोठ्या गटात १६ वर्षांवरील युवकांना भाग घेता येणार आहे. लहान गटात भाग घेणाऱ्या मुलांचे आधार कार्ड असणे बंधनकारक असून विजेत्यांना रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**सेंटर टॉवर,** सुंदर बागेजवळ, पीएनजी पासूनजवळ, १५०० स्क्वे. फूटाचे हॉल भाड्याने अथवा विकणे आहे. (बेसमेंट ४०० स्क्वे. फूट गाळा) संपर्क-९८६०८५८९९४

**चालू स्थितीतील** रसवंती मशिन, २ एचपी मोटर गाड्यासह विकणे आहे व कमी वापरलेली घरगुती गारमेंटची शिलाई मशिन विकणे. संपर्क-९९७५२६३६८५

**जागा विकणे-** ११५१ स्क्वे. फूटाचा रिकामा प्लॉट, ३० फूटी रोडटच, आमराई मळा, इचलकरंजी. फोन-८८८८२२१५९२

**प्लॉट विकणे-** रूई, मानेनगर येथील बंदिस्त एनए प्लॉट विकणे आहे. संपर्क-९४२२०३२०९९

**जुने सोफासेट** रिपेअरी करून देवू तसेच नवीन सोफा, पडदे व गादी ऑर्डरीप्रमाणे तयार करून देवू. संपर्क-८२६१०८९५९०

**४८ आटणीच्या** लाकडी दाब्या ८ नग विकणे आहेत. कनेक्शनविरहीत १२०० रू. प्रत्येकीप्रमाणे विकणे. संपर्क-९८५०७७१८९९

**नवीन कोल्हापूर** नाक्याजवळ, कोल्हापूर रोडटच इचलकरंजी येथे ३६१६ स्क्वे. फूट क्षेत्र जागा व त्यावरील आरसीसी बांधकाम असलेली इमारत विकणे आहे. संपर्क-९४०४१०४०६७, ९३७२००४०६७

**आरसीसी बंगला विकणे.** कबनूर डॉ. आंबेडकर चौक, १०७० स्क्वे. फूट जागा असलेला. एजंट क्षमस्व. कांबळे-९४२०९७१२९८

**खंजीरे इंड. इस्टेटमधील** चालू स्थितीतील Tsudokoma 911 जेकार्डसह एअरजेट लूम विकणे आहेत. संपर्क-९४२२५२२१६३

**बंगला व शेड** विकणेचे आहे. कोल्हापूर रोड, व्यंकटेश्वरा शाळेमागे, पाटील मळा, कबनूर, इचलकरंजी. संपर्क-९४२०४५४२२२

**विकणे आहे.** बोरगाव-इचलकरंजी रोडटच ३.२५ एकर जमीन (प्लॉटिंग व प्रोसेससाठी उपयुक्त) फ्रंटेज २४० फूट. संपर्क-मे. साधना बझार, दाते मळा, सुंदर बागेजवळ, इचलकरंजी.

**जागा विकणे आहे.** अर्जंट तारदाळ-खोतवाडी रोड ड्रीम हॉलिडे रिसॉर्ट, पुढे १५०० स्क्वे. फूट रोडटच जागा विकणे आहे. संपर्क -९६७३७००७१७, ७०२०९१३९७२

**पाण्याच्या टाकीजवळ** शहापूर येथील एक गुंठा प्लॉट विकणे आहे. संपर्क-अमर कल्ले-९९७५१९४२६२

**२ बीएचके फ्लॅट विकणे-** वास्तुशास्त्रनुसार पहिला मजला कॉर्नर फ्लॅट (६५० चौ. फूट+४०० चौ. फूट टेरेससह. तुळजाभवानीनगर, शहापूर, इचलकरंजी. संपर्क-संजय पोरे-९८२२३३६४४४

**जय सांगली नाका** येथे आपला लकी बाझारच्या बाजूस ७X१२ चा लोखंडी गाडा ३ शटरसह विकणे आहे. संपर्क-९७६३२८१६२२

**रजि. इस्टेट ब्रोकर-**गुंतवणूक व राहणेस योग्य एनए प्लॉट, शेतजमीन, बंगला इत्यादी व्यवहार पारदर्शक व कायदेशीरमार्गे केले जातील. संपर्क-९३२६९१३७०१

**साडे आठ गुंठे जमीन** विकणे आहे. खोतवाडी, तारदाळ रोड. संपर्क-९२२६१४१२२५

**तारदाळ, खोतवाडी,** शहापूर, कोरोची, रामलिंग येथे प्लॉट देणे आहेत. संपर्क-९८३४१११७९२

**विकणे आहे.** ४ गुंठे फ्लॅट, ३० फूटी रोड जवाहर नगर, जोतीबा मंदिरजवळ, इचलकरंजी. फोन-७७४१०४१४१५

**फार्म हाऊस विकणे आहे.** जागा साडे दहा गुंठा पूर्ण डेव्हलप, २ बीएचके, स्विमिंग पूल, लॉन गार्डन, पत्ता-राजमाने हायस्कूलमागे, रूई. ९८६०४०५७०४

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ तसेच फवारा, कांडीमशीन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क-८३१७२९१००८

## * भाड्याने देणे/घेणे *

**नरेंद्र सोसायटी** तांबेमाळ येथे सर्व सोयीनियुक्त २ रूम भाड्याने देणे आहे. संपर्क-९४२३०४०२४७, ९४२२५१५१६२

**शेड भाड्याने** ११०० स्क्वे. फूट ११ एचपी लाईटसह संगमनगर, तारदाळ, सिद्धीविनायक सायझिंगसमोर. संपर्क-९३७०६१२२४६

**आमच्या दुकानमध्ये** फोर व्हीलर गाडी टेम्पो पाहिजे. आम्ही रोज १५०० रू.पर्यंत भाडे देऊ. रोज ६० ते ८० किलोमीटर रनिंग राहिल. माल उतरणे भरणे गाडीवाला करेल. मान्य असणाऱ्या गाडीवालेने स्वत: येऊन भेटणे. पद्मावती एजन्सी (सुतार मळा) किनारा बारजवळ, इचलकरंजी.

**भाड्याने देणे-** १००० स्क्वे. फूट आरसीसी गोडाऊन देणे आहे. पत्ता-विवेकानंदनगर, माऊली मंदिरजवळ, कोरोची. संपर्क-९८५०२०७११५, ८३२१०८८७०७

**भाड्याने देणे-** १ बीएचके सांगली नाका व २ बीएचके बिग बझारजवळ, सेमी फर्निचर त्वरीत भाड्याने देणे. संपर्क-९२७०२०२५०७

**शाहू पुतळा, मेन रोड** दुकानगाळा २०० स्क्वे. फूट हॉल १२०० स्क्वे. फूट भाड्याने देणे आहे. मो. ९०२८२०७१९१

**२००० व ३००० स्क्वे.** फूटचे शेड, गोडावून व इतर व्यवसायासाठी भाड्याने देणे. ३० फूटी रोडटच. लक्ष्मीमंदिरसमोर, इचलकरंजी. संपर्क-९०९६९४८८०१

**९०० स्क्वे. फूट** गोडाऊन जागा भाड्याने देणे. पत्ता-१८/१८९, इंडस्ट्रियल इस्टेट, आंबेडकर पुतळ्याजवळ, इचलकरंजी. मगदूम-९७६३४०६०९२

**गणेशनगरमध्ये** सिंगल व डबल आरसीसी रूम सर्व सोयीनियुक्त अर्जंट गहाणवट देणे आहे. संपर्क-८४४६८६१९८६

**शेड भाड्याने देणे-** अ. ११०० स्क्वे. फूटाची गोडाऊन, गारमेंट, क्लासेससाठी उपयुक्त. पत्ता-खंजीरे मळा, दत्तमंदिरजवळ. संपर्क-९९२३९६९४९४

**सर्व सोयीनियुक्त** आरसीसी दुकानगाळा भाड्याने देणे आहे. राणी बागेजवळ, आयसीआयसीआय बँकेमागे संपर्क-भागवत-८८८८८५६०५२

**साखरपे हॉस्पिटलजवळ** सातपुते गल्लीमध्ये १०X२० गाळा भाड्याने देणे आहे. ८१४९९१३०८८

**गाळा भाड्याने देणे आहे.** पहिला मजला १७X४० स्टेशन रोड, सोनाली हॉटेलसमोर ऑफिस, क्लासेस संपर्क-७७०९९३७३८६

**२ बीएचके** सर्व सोयीनियुक्त तळमजल्यावरील आरसीसी घर भाड्याने देणे आहे. आरगे मळा, गल्ली नं.२, इचलकरंजी. संपर्क-९८५०५१६८२७

**आवाडे टॉकीज चौकात** बस स्टॉपवर रोडटच ४५० स्क्वे. फूट (ड्युफ्लेक्स ३०० फूटसह) दुकानगाळा भाड्याने देणे आहे व नदीवेस नाक्याजवळ २०१६ फूट प्लॉट विकणे आहे. संपर्क-९८५००७८७६८

**आर.के. सिनेमामधील** ४००० ग्राऊंड फ्लोअर, ३००० ग्राऊंड फ्लोअर भाड्याने देणे आहे. संपर्क-९८३३८००७३४०

**संग्राम चौक येथे** ४५० स्क्वे. फूट गाळा दुकान, ऑफिस, गोडाऊन व इतर व्यवसायासाठी भाड्याने अथवा गहाणवट देणे आहे. संपर्क-७७२०९९७१११

**भाड्याने देणे-** दाते मळा नामदेव भवनजवळ येथे १५X३० चा हॉल, पतसंस्था, फायनान्स कंपनी, ऑफिससाठी उपयुक्त सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. संपर्क-७७६७८०८४५५, ७०६६९३३४८३

**१ बीएचके** गहाणवट देणे आहे. १ बीएचके भाड्याने देणे आहे. सर्व सोयीनियुक्त. पत्ता- तारदाळ, शहापूर नाका, तारदाळ रोड, तारदाळ. संपर्क-९१५६०५५९३२

**जागा भाड्याने देणे-** डॉ. राहूल चव्हाण यांचे राणी बागेसमोरील आयसीआयसीआय जुने हॉस्पिटल भाड्याने देणे. संपर्क-९८५०७४४७४१

**शहराच्या मध्यवर्ती** मोहन आर्केडमध्ये कमी भाड्यात गाळे भाड्याने देणे आहेत. ऑफिस, क्लासेस, वर्कशॉपसाठी उपयुक्त. संपर्क-९९२३४६००६६

**२ बीएचके** स्वतंत्र बंगला सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. संपर्क-महासत्ता चौक, स्वामी समर्थ नगर, इचलकरंजी. ९७६४१४१६०५, ८०९७४०७६४३

**भाड्याने देणे-** १७०० स्क्वे. फूट शेड २० एचपी लाईट गारमेंट किंवा सीएनसी मशिनकरीता संपर्क-८८०५७९०७२०, खोतवाडी.

**दुकानगाळा भाड्याने देणे-** शाहू पुतळा ते जुना एसटी स्टँड रोडशेजारी. संपर्क-९८९०९७८०९०

**२५०० स्क्वे.** फूटाचे शेड मेन रोडटच तीनबत्ती चौकात आरसीसी कमर्शियल युजसाठी भाड्याने देणे. संपर्क-९१७२९२२६०७

**१२०० स्क्वे. फूट** आरसीसी गाळा भाड्याने देणे आहे. भोनेमाळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. संपर्क-८६६८६४४४५१

**२ हॉल, २ किचन,** २ टॉयलेट, २ बेडरूम सर्वसोयीनियुक्त एकाच फॅमिलीसाठी उपयुक्त भाड्याने देणे. (फक्त शाकाहारींसाठी) संपर्क-८६६८६४४४५१. कोल्हापूर नाक्याजवळ, इचलकरंजी.

**हॉटेल चालवायला देणे आहे.** (व्हेज) मेन रोडटच कोल्हापूर नाका, इचलकरंजी. कामगार हवा आहे. ८६६८५८१७२५

**चालू स्थितीतील दवाखाना** डॉक्टरसाठी भाड्याने देणे आहे. अशोकनगर, हनुमान मंदिरमागे, शहापूर रोड, इचलकरंजी. मो. ८७८८९०००४०

**रोडटच हॉल भाड्याने देणे-** १००० स्क्वे. फूट अंदाजे पत्ता-लक्ष्मी मंगल कार्यालय, चांदणी चौक, डॉ. सुजाता कुलकर्णी, श्री. क्लिनिकसमोर, इचलकरंजी. मो. ७०३८८९९५४०, ९४२०००७००४

**भाड्याने देणे आहे.** १०X२० चे २ आरसीसी गाळे विभागून किंवा एकत्र करून गोडाऊन किंवा ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. कोल्हापूर रोड, एस.एस. मोबाईलसमोर, डॉ. काजवे हॉस्पिटलजवळ, इचलकरंजी. मो. ९१५६१२२३००, ९१५६१२२३००

**नांदणी येथे** सर्व सोयीनियुक्त हॉटेल व गार्डन (व्हेज, नॉनव्हेज) भाड्याने देणे आहे. निसर्गरम्य वातावरणात. संपर्क-९४२२७७११८३

**दुकानगाळा भाड्याने** देणेचे आहे. पत्ता- मेन रोड, जनता चौक, बारटक्के बिल्डींग, इचलकरंजी. ८४११०३८६०८

## बोअरवेल विषयक

**राज बोअरवेल-** आमचेकडे ४।।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात करून मिळेल. संपर्क- ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७.

**चौगुले बोअरवेल जयसिंगपूर-** घरासाठी ४।।। इंची व शेतीसाठी ६।। इंची बोअर मारून मिळेल. संपर्क-९९६०१०५४२१

## व्यवसाय विषयक

**शेअर मार्केट बेसिक्स** ते अॅडव्हॉन्स माफक फीमध्ये परफेक्ट शिका. प्रॉफिट फर्स्ट, कल्पना टॉकीजसमोर. मो. ९६६५४०८८२८, ७७६८९५००२१

**एक्स्ट्रा इनकम-** मिळवण्यासाठी सुवर्णसंधी. नोकरी, व्यवसाय करत एक्स्ट्रा इनकम मिळवू शकता. योगशिक्षक-नंदकुमार सर-९८५०६१५४२१

## कर्ज विषयक

**पर्सनल लोन, बिझनेस लोन,** क्रेडिट कार्ड, होमलोन, प्रॉपर्टी लोन, प्रोजेक्ट लोन मिळेल. मो. ९२०९४२२०७८ (कमिशन बेसवर एजंट पाहिजेत.)

**बिझनेस लोन,** होमलोन, लोन अगेन्स प्रॉपर्टी टेकओव्हर सर्व प्रकारचे मॉर्गेज सिबील कमी असेल तरी करू. ८४०८८३०७५२

## वधु-वर विषयक

**सर्व जातीय** प्रथम घटस्फोटीत विधवा-विधूर प्रौढ वधु-वर मेळावा रवि. १६ नोव्हे. दु. १ वा. त्रंबोली मंगल कार्यालय, लाईन बाजार कसबा बावडा, कोल्हापूर. ८१४९६६०५९९

**लिंगायत उच्च शिक्षित** वधु-वर मेळावा रविवार दि. १६ नोव्हेंबर शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर. बेनाडीकर-९८२३९९३४९०.

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

## आरोग्य विषयक

**जुनाट सर्दीने** हैराण झालात १००% नैसर्गिक उपचारमधून या त्रासातून मुक्त व्हा. (सुप्रसिध्द निसर्गोपचार तज्ञ) मनोजकुमार चव्हाण. संपर्क-९६६५९९२०८१

## हॉटेल विषयक

**अनुभवी फूलटाईम/पार्टटाईम** वेटर, लेडीज, किचन असिस्टंट पाहिजे. आकर्षक पगार. फोन-९०२२७५५१५७

## * नोकरी विषयक *

**हुशार व अनुभवी** व शिकाऊ फोर व्हीलर मेकॅनिक पाहिजेत. मो. ९८२२४३३४२६

**Marketing & Suporvision** साठी बांधकाम क्षेत्रामधील अनुभवी व्यक्ती कागल एमआयडीसी येथील RMC Plant करीता पाहिजे. ९५७९५५३२१६

**आमच्या नामांकित** फर्निचर कंपनीमध्ये मार्केटिंग सुपरवायझर-१ व गादी कामासाठी कामगार-१ पाहिजे. एरिया-शहापूर. संपर्क-८८५५९०४५५५, ७०८३८२६६२६

**मटेरिअर टेस्टींगसाठी** सुपरवायझर पाहिजे. पत्ता-RMC Plant, Kagal MIDC. ९५७९५५३२१६

**माल वाहतुक गाडीवर** (टेम्पोवर) ड्रायव्हर पाहिजे. लायसन्स असणाऱ्यांनी स्वत: येऊन भेटणे. पद्मावती एजन्सी (सुतार मळा) किनारा बारजवळ, इचलकरंजी.

### पाहिजेत

इचलकरंजी शहरातील शेअर मार्केट ऑफिसमध्ये Back Office साठी प्रामाणिक कष्टाळू स्टाफ हवा आहे. PF / ESIC ची सुविधा. पगाराच्या अपेक्षे सहीत अर्ज Whatsup / Email करणे.
**Wh.Up.No. : 8983655657**
**Email - vinayakbugad99820@gmail.com**

**जयदत्त अल्युमिनीयम** अॅन्ड प्रा. लि. कंपनीमध्ये अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर व टेली कॉलिंगसाठी लेडीज स्टाफ आणि हेल्पर कामासाठी जेन्टस पाहिजेत. संपर्क-९३७०५२८९३०

**गारमेंटमध्ये महिना** १०००० रूपये मिळवण्याची संधी. पत्ता-सांगली रोड, संभव रेसिडेन्सी, महालक्ष्मी मंदिरजवळ. संपर्क-९७३०७९२६७७, ९१७२१२९००५

**हॉटेल मयूर बिअरबार** जुना कोल्हापूर नाका डॉ. लांडेजवळ मॅनेजर/वेटर/कामगार पाहिजे.

**बारमध्ये वेटर कामासाठी** कामगार पाहिजे. संपर्क-९७६७८०८२२०, ७९७२१८३६२९

**गारमेंटसाठी** हेल्पर लेडीज-२, जेन्टस-१, टिचींगसाठी-४. संपर्क-८४०८८३०७५२

**पाहिजेत.** कायझन होंडा या नामांकित टू व्हिलर शोरूममध्ये सर्व्हिस अॅडव्हायझर हवे आहेत. पात्रता कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. अनुभवींकरीता प्राधान्य. संपर्क-८९७५६३२०२०

**पाहिजेत.** डिपार्टमेंट व डिस्पॅच सुपरवायझर-४, पदवीधर/अनुभवी टाटा, महिंद्रा गाडीवर ड्रायव्हर-४, TIR लायसन आवश्यक. फोन-९७६६२८८८५५

**फॅब्रिकेशन कामासाठी** वेल्डर, हेल्पर, शिकाऊ कामगार व ग्रॅन्डर मारणारा पाहिजे. आकर्षक पगार, विठ्ठलनगर, शहापूर रोड. ९६०४२७३००७

**कामगार पाहिजे.** इचलकरंजी येथे चहा/नाष्टा सेंटरमध्ये कुक व हेल्पर कामासाठी जेन्टस/लेडीज कामगार पाहिजे. संपर्क-८३२९०८८७०७, ९८५०२०७११५

**अकौंटींग टेलिकॉलिंगसाठी** विवाहीत महिला काम ८ तास. पगार-१० ते १२ हजार. हाऊसकिपींग सुपरवायझर महिला/जेन्टस/हेल्पर पाहिजे. संपर्क-९५०३२३३१००

**निसर्ग लॉजसाठी** कामगार पाहिजे. इचलकरंजी, शिरदवाड रोड, नदीपलिकडे हॉटेल बिग बॉसच्या पाठीमागे. संपर्क-९५४५४४५०००

**मॅकॅनिकल कंपनीमध्ये पाहिजेत.** VMC Operator-5, CNC/VMC Setter-02, Progammer-01, QA, QMS Supervisor-1. सोय-पीएफ/इएसआयसी व डबल ओ.टी. इचलकरंजी. ८९५६१६९६९६/९१७५९६७७६७

**स्वागतम बर्थडे** एवं डिस्पोजेबल शॉपीमध्ये कामासाठी कामगार पाहिजे. नारायण पेठ, इचलकरंजी. संपर्क-९४२३२७५३७३

**हुशार व अनुभवी,** शिकाऊ फोर व्हीलर मेकॅनिक पाहिजेत. संपर्क-९८२२४३३४२६

**स्टोअर किपर+कॉम्प्युटर** ऑपरेटर टॅली येणारा व ऑफिस कामाकरिता हुशार मुलगा पाहिजे. संपर्क-९८२२४३३४२६

**त्वरीत सिक्युरीटी** गार्ड पाहिजेत. इचलकरंजीत बंगल्यासाठी व शहापूर तारदाळ, जयसिंगपूरसाठी. आकर्षक पगार, पीएफ+इएसआयसी सुविधा. संपर्क-८००७०६९१८०, ८०५५६१३०४०

### कॉन्ट्रॅक्टर व कामगार पाहिजेत

साऊंड कास्टींग्ज या नामांकीत कंपनीच्या तारदाळ येथील युनिटमध्ये कामगार पुरविणेसाठी कॉन्ट्रॅक्टर पाहिजे. सदर कॉन्ट्रॅक्ट हे Service Charges पद्धतीने दिले जाईल.

तसेच मशिनशॉप विभागामध्ये VMC, CNC & VTL मशिन करिता (१० वी, १२ वी पास किंवा ITI / Diploma) Operator पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल. तरी इच्छुकांनी आपल्या वैयक्तिक माहितीसह ताबडतोब HRD विभागामध्ये भेटावे.

**एचआरडी विभाग साऊंड कास्टींग्ज प्रा. लि., युनिट - ३**
केअेटीपी इंडस्ट्रियल इस्टेट, तारदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. फोन नं. ९९७५३४७४२९, ८९७५६९५५९२.

**शॉपमध्ये सेल्ससाठी** मुलगा/मुलगी पाहिजे. शिकाऊ/अनुभवी पगार-८००० ते १४००० पर्यंत. पत्ता-सांगली नाका, नदीवेस नाका, इचलकरंजी. संपर्क-८४५९२०५३००, ९०७५०७२६०७

**फॅब्रिकेशन कामासाठी** व हॉस्पिटल फर्निचर करणेसाठी कामगार भरती सुरू आहे. $CO_2$, Orgon वेल्डरांना प्राधान्य. $CO_2$ वेल्डर -४, Orgon वेल्डर-४, हेल्पर-४. संपर्क-९०२१२०२७३१

**औषध दुकानमध्ये** फार्मासिस्ट, सेल्समन, डाटा एंट्रीसाठी स्टाफ पाहिजे. संपर्क-९९७५११५०४६८

**जॉकी स्टोअर** इचलकरंजी, आकर्षक पगारासह खालील जागांची भरती करत आहे. १) पुरूष सेल्समन-२ जागा. २) महिला सेल्सपर्सन-२ जागा. ३) सफाई कर्मचारी-१ जागा. अमृत प्लाझा, जयहिंद मंडळ मैदान समोर, बसस्टॅन्ड रोड, इचलकरंजी. ७२४९८४३२५६, ९५०३५२१००४

**मार्केटिंग ऑर्डर** व डिलेव्हरीसाठी, इचलकरंजी व हातकणंगले तालुक्यासाठी एक सेल्समन व ड्रायव्हर पाहिजे. गरजूंनी संपर्क करावा. ९९२३२९२५५८

**पिझ्झा आऊटलेटमध्ये** डिलेव्हरी, सर्व्हिस आणि बिलींगसाठी मुले हवी आहेत. (डिलीव्हरीसाठी लायसन आवश्यक) ७२७६११७३९०, ८४२१४०८१९७

**सिक्युरीटी गार्ड पाहिजे.** खंजीरे, शहापूर, पार्वतीसह, आवाडे पार्क करिता ८ तास, १२ तास सिक्युरीटी गार्ड त्वरीत पाहिजेत. संपर्क-एस.एम.एस. सिक्युरिटी. ९८५०९४५२२६, ८३०८५०६७९६

**लेडीज कामगार पाहिजे.** मगदूम आयुर्वेदिक क्लिनिक, गांधी पुतळा, इचलकरंजी येथे हुशार व गरजू लेडीज किंवा मुलगी नेमणे आहे. मो. ७३८५११२०३९

**हेल्पर पाहिजेत.** कंपनीतील सीएनसी/व्हीएमसी मशिन क्लिन करणेसाठी १८ वर्षे पूर्ण ते ३० वर्षापर्यंत हेल्पर पाहिजेत. पगार-१२०००. संपर्क-९७६६११३८८०

**अल बहर टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स** ऑफिसमध्ये लेडीज कामगार पाहिजे. शहापूर रोड, गैबान पेट्रोलपंप जवळ, इचलकरंजी. संपर्क-८०८०१०७५२७

**कामगार पाहिजे.** पार्ट टाईम, फूलटाईम इलेक्ट्रीकल दुकानमध्ये सेल्समन कामासाठी लेडीज/जेंटस. समक्ष भेटणे. महालक्ष्मी लाईट हाऊस. ९५२७००६०६०

**सहा चाकी गाडीवर** अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-९९६०६०७४४९, ९८२२२०६८१९

**ई सेवा केंद्रासाठी** कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. संपर्क-जुना शिवाजीनगर पोलिस स्टेशन इमारत, इचलकरंजी. फोन-९३७१६०५६८३, ९७६६०८४७८६

**घोडावत पेट्रोल पंप** मजले (हातकणंगले) येथे आईस्क्रीम शॉपमध्ये कामाकरिता हुशार मुले पाहिजेत. (वेळ-4pm ते 12am) पगार-१००००/- महिना. संपर्क-८२९१५८११११

**कॅफे कामासाठी** कामगार पाहिजे. संपर्क-८०१३०१९६९६, इचलकरंजी.

**टॅली इआरपीचे** ज्ञान असणारी पूर्णवेळ अकौंटंट पाहिजे. संपर्क-सोसायटी इलेक्ट्रीकल, गांधी पुतळा, इचलकरंजी. फोन-९४२११००५५५

**हॉटेल नॉर्वेकर** अख्खा मसुर लिंबू चौक, रिंगरोड, इचलकरंजी येथे सकाळ/संध्याकाळ चपातीसाठी बाई पाहिजे. संपर्क-८६२५९१८७१६

**व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत.** संपर्क-११/२४२, भारत पेट्रोलियम पंपासमोर, ईदगाह मैदानजवळ, स्टेशन रोड, बस स्टॅन्डजवळ. ९८२२७६६७६२, ९८२३२१६०००

**पेट्रोल पंपावर** पेट्रोल, डिझेल सोडण्याकरीता शिकाऊ/अनुभवी लेडीज/जेन्टस कामगार पाहिजेत. कलानगर, चंदूर रोड, संपर्क-९९७००७६४६४

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** पार्वती/खंजीरे इंडस्ट्रिज १२ तास दिवस/रात्र शिक्षण-१० वी, १२ वी, वय-२५ ते ५०. संपर्क-९४२३२८४८३३, ८२०८५०५४७२

**पेट्रोल पंपावर** ८ तासासाठी २४ तास ड्युटीसाठी कामगार पाहिजे. संपर्क-८३८०८१११८८

**इलेक्ट्रीकल टेक्नीशियन** अनुभव २ ते ३ वर्षांचा आयटीआय फिटर पाहिजेत. संपर्क-९९७५७७४८८३

**१) गारमेंट फॅक्टरी** कामासाठी हेल्पर पाहिजे मुले/मुली. २) गारमेंट फॅक्टरीमध्ये सोशल मिडीया इंन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉटसअप हेंडल करणारी व्यक्ती आवश्यकता आहे. इचलकरंजी-९८२३४२५७८५

**हार्डवेअर दुकानात** सेल्स व पॅकिंगसाठी महिला पाहिजेत. स्टेशन रोड, ओल्ड बॉम्बे आईस्क्रीमजवळ, इचलकरंजी. ९२७०१३७९५५

**साफसफाई कामासाठी** पार्टटाईम/फूलटाईम लेडीज कामगार पाहिजे. संपर्क-ओम एक्झीकेटिव्ह, राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. ७६६६२११२१८

**अकाऊंट कामासाठी** अनुभवी अकौंटंट पाहिजे. टॅली आणि एम.एस. ऑफिस ज्ञान आवश्यक. इंग्रजी टायपिंग तसेच स्पिकींग आवश्यक आहे. मो. ९७६६६९२७६५

**कॅफेमध्ये कामासाठी** शिकाऊ/अनुभवी मुलगा पाहिजे आहे. संपर्क-८८५७८५२३०२, ८८५५९३७७५१

**अ. लाटमध्ये** डेंटल मॅनिफॅक्चरिंगसाठी ऑफिस कामासाठी १२ वी पास/नापास महिला/मुले हवे आहेत. संपर्क-९३२६००६८२७

**Leading Software** Company Tally Trainer & Educational Advertiser-1 Post, Business Develop Manager-3 Post. Project Implementations/Support-2 Post. Oddo Engg.-1 Post. G-M/F. Exp.-2-3 yrs. Edu.-B.Com/M.Com/MBA Finance. Loc.-Ichalkaranji/Kolhapur. Contact-HR-7774838855

**अ. लाट मधून** डेंटल क्लिनिक व्हीजीटसाठी स्वत:ची २ व्हिलर असणारे पुरूष/महिला नेमणे आहे. संपर्क-९३२६००६८२७

**सिध्दत्व अग्रो** इंडस्ट्रिजवरील नामांकित फॅब्रिकेशन कंपनीमध्ये खालील पदावर भरती चालू आहे. १-फिटर/$CO_2$ वेल्डर, २-हेल्पर. संपर्क-९९७५६९५४७९

**टर्नर पाहिजे.** प्रोडक्शन कामाकरिता स्कील्ड, सेमी स्कील्ड टर्नर पाहिजेत. संपर्क-८१५१९९९१७१

**ऑफिसबॉय, सेल्सगर्ल,** हाऊसकिपींग, क्लार्क, बॅक ऑफिस, सिक्युरीटी गार्ड, सर्व प्रकारच्या नोकरीसाठी डायमंड जॉब प्लेसमेंट. ८२०८००१७२०

**लेडीज कॉम्प्युटर** ऑपरेटर पाहिजे. जीमेल, एक्सेल येणे आवश्यक. संपर्क-९६३१३१६०३०

**गारमेंट फॅक्टरीमध्ये पाहिजे.** १) काज, बटन मशिनवर ऑपरेटर-१. २) दिवाणजी-१. ३) मशिन ऑपरेटर-८. संपर्क-९८२२३२०७०२

**जेंटस कामगार पाहिजे.** (वय ३२ पर्यंत) टू व्हिलर आवश्यक. संपर्क-९६३१३१६०३०

**पाहिजे.** ट्रॉब व सेंटरलेस ग्राईडिंग मशिनवर पुरूष/महिला अनुभवी किंवा शिकाऊ कामगार पाहिजे. भेटा-श्री गजानन इंडस्ट्रिज, शहापूर, तारदाळ नाका, शहापूर. फोन-८२०८१६९६४७

**इंजिनिअरींग वर्कशॉपमध्ये** कुशल, अकुशल टर्नर, ड्रिलर पाहिजेत. स्त्री/पुरूष संपर्क-जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-८४२१४१११९१, ९४२२०४६०४०

**त्वरीत सिक्युरिटी** गार्डस भरती-अतिग्रे कॉलेज येथे ड्युटी १२ तास, पगार-१४०००+पीएफ+ईएसआयसी+नाष्टा, जेवण, राहण्याची मोफत सोय. संपर्क-८६६९९५९९६४

**दहावी पास अथवा** नापास कष्टाळू, हुशार कामगार भरती करणे आहे. राजवाडा चौक, इचलकरंजी. ९४०५०४१४१५

**टेलिकॉलर पाहिजे.** किमान बारावी पास अनुभवी कॉम्प्युटर ज्ञान असलेली मुलगी/लेडीज टेलिकॉलर पाहिजे. ९४०५०४१४१५

**कामगार पाहिजे.** बांधकाम साईटवरील इतर/वरकाम करण्यासाठी कामगार पाहिजे. योग्य मोबदला. ८१८००४६०६० मेसेज करावा.

**पाहिजेत.** होलसेल कापड शर्टींग गोडाऊन कामासाठी कामगार व एक्सेलचे ज्ञान असणारा जेंटस पाहिजे. संपर्क-९०२८८०६५९६

**लेडीज कॉम्प्युटर टॅली** ऑपरेटर पाहिजे. शहापूर नाक्याजवळ. ८८८८७३१३४२, ८०८७२१८६९५

**पाहिजेत.** नवजीवन डेअरी व बेकरीसाठी ड्रायव्हर व सेल्समन २ जागा. मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह B.BA/MBA २ जागा. टेली कॉलर १ जागा. संपर्क-९६५७०२८८८०

**एका नामांकित** अकॅडमीमध्ये मार्केटिंग करीता जागा भरणेचे आहेत. संपर्क-८६५७६५३६९९, ९०६७९९१९६०

**लेथ मशिनसाठी** टर्नर पाहिजेत. अनुभव-४ वर्षे. (६ दिवसाला पगार) ७२४९४९५००२-शहापूर.

**फ्रेंच डोअर कामासाठी** अनुभवी वेल्डर व हेल्पर व मार्केटिंग कामासाठी जेंटस पाहिजेत. संपर्क-९१३०२०००४५. झुडीओसमोर, सांगली रोड, इचलकरंजी.

**आर.के. सिनेमा येथे** मुले व मुली कामासाठी पाहिजेत. पार्टटाईम/फूलटाईम संपर्क-९८३३८०७३४०, ७४४७४४००७० वेळ-२ पीएम ते ५ पीएम.

**इंटरनेट, कॅफेसाठी** कॉम्प्युटर अनुभवी ऑपरेटर पाहिजे. संपर्क-९०११११४२४३

**घडी, मेडिंग कामगार** व ठेकेदार पाहिजे. संपर्क-बोहरा मार्केट बिल्डींग नं.४ खालील गाळा नं.९१९२, इचलकरंजी. फोन-९४०५६४९०३५

**पाहिजेत.** नामांकित कंपनीसाठी इलेक्ट्रीकल आयटीआय २ जागा, रेफ्रिजरेशन-मेकॅनिक-१, वेल्डर-१, हेल्पर-१ संपर्क-९६७३०२१७३२, इचलकरंजी.

**प्लबिंग व हार्डवेअर** व सिमेंट आर्टीकल प्रोडक्शन कामासाठी शोरूममध्ये कामगार पाहिजे. पत्ता-शहापूर. ९५०४१११७७१

**पाहिजेत.** आयटीआय इलेक्ट्रॉनिक्स/डिप्लोमा इलेक्ट्रॉनिक्स झालेले कामगार पाहिजेत. संपर्क-विन्सर वर्क वेअर, नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. फोन-९८८१७५६०५२

**कापड दुकानात** कटींग व सर्व कामासाठी कामगार पाहिजे. संपर्क-श्रीराम टेक्स, इचलकरंजी. ७०२०६००३००

**सिक्युरीटी गार्ड पाहिजे.** १२ तास, डे/नाईट शिफ्टसाठी आकर्षक पगारासह, इचलकरंजी व कोरोची येथे. संपर्क-९३२६६३३४४५, ९०२१३१२५२४

**ड्रायव्हर पाहिजे.** घरगुती फोरव्हीलर गाडीसाठी फूलटाईम अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-९५१८७२७३०४

**शिटमेटल फॅब्रिकेशन** वेल्डर व हेल्पर पाहिजेत. अनुभवी/शिकाऊ. संपर्क-पत्ता-जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-९५२९२२४०४०

**शाकाहारी हॉटेलमध्ये** निर्व्यसनी २ वेटर, १ रोटीवाला व १ मावशी पाहिजे. संपर्क-८६०५१९५३४८

**ऑफिस कामासाठी** लेडीज विवाहीत व साईटवरती जेंटस सुपरवायझर पाहिजे. शिक्षण-१० वी, १२ वी पास. वेळ-लेडीजसाठी सकाळी ९.०० ते ६.०० पर्यंत. जेंटससाठी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ पर्यंत. पत्ता-कबनूरे अॅन्ड सन्स, शरद डिग्री कॉलेजसमोर, इचलकरंजी. ९८५०१९९९९२, ९९२२२६२६८२

**पॅकिंगसाठी लेडीज पाहिजे.** कामासाठी मुलगा पाहिजे. गारमेंटचे शिलाई काम घरी देऊ. संपर्क-८२०८०२७९३४, ९४०४२६८२५४

**रेडिमेड कापड दुकानासाठी** कामगार पाहिजे. आकर्षक पगार+कमिशन, अनुभवी/शिकाऊ श्री महालक्ष्मी गारमेंट, इचलकरंजी. फोन-९८५०८५८६०२, ७६२०३५८४०८

**अनुभवी वॉचमन पाहिजेत.** आकर्षक पगार-जागा ३. मो. ७२१९२८६२८४, ९८६०८१४४६३

**Staff Required-** For CA Firm Qualification-B.Com/M.Com/M.B.A. CA Intor/Final. Address- Chougale & Associates Charterd Accountant Near Bhagyarekha Talkies First Floor above Yes Bank Rajarambapu Bank. Mob. 9423858214

**हॉटेलसाठी वेटर पाहिजेत.** संपर्क-९५९५२७४५२७, ८८०६४८४९१९

**पाहिजेत.** इलेक्ट्रीक दुकानात सेल्समन मुले/मुली पाहिजेत. प्रकाश लाईट हाऊस, इचलकरंजी. ९४२३०४११५०, ७५८८३३९६३१

**अर्जंट सेल्समन पाहिजेत.** रेडिमेड कापड दुकानात शिकाऊ व अनुभवी सेल्समन पाहिजेत. आकर्षक पगार व कमिशन संपर्क-८३२९९९२३४१

**ड्रायव्हिंग व गोडाऊन** कामासाठी कामगार पाहिजे. पगार-१० ते १२ हजार जे.पी. संघवी, सुंदर बागेजवळ, इचलकरंजी. फोन-९४२२४१४३८५

**अकौंट कामासाठी** अनुभवी कामगार पाहिजे. फूलटाईम जे.पी. संघवी, सुंदर बागेजवळ, इचलकरंजी. फोन-९४२२४१४३८५

**मेडिसर्व्ह कंपनीमध्ये** अकौंटंट,स्टोअर इन्चार्ज, लेसर मशिन ऑपरेटर पाहिजे. (मेकॅनिक डिप्लोमा फ्रेशर) कोंडिग्रे फाटा. ८६२६०५७९५६, ९३२६००५६४९

**खंजिरे मळा येथे** ओव्हरलॉक मशिनवर काम करण्याकरिता व धागाकटींग करण्याकरिता महिला कामगार पाहिजेत. संपर्क-८१८०८०३८०१, ७७४५०८३३८८

**हॉस्पिटल कामासाठी** रात्रपाळीसाठी मावशी पाहिजे. अरिहंत वुमन्स हॉस्पिटल, हॉटेल कॅबसनसमोर, इचलकरंजी. फोन-७०३८७७२७२७

**लक्ष्मी औद्योगिक** वसाहतीमधील नामांकित कंपनीमध्ये सिक्युरिटी गार्ड, हेल्पर, ऑपरेटर पाहिजे आहेत. पीएफ+इएसआयसी सुविधा. संपर्क-८८०६८६७१४३

**इलेक्ट्रीक कामासाठी** अनुभवी/शिकाऊ कामगार पाहिजे. संपर्क-सुरेश इलेक्ट्रीकल्स अॅन्ड इलेक्ट्रॉनिक्स, थोरात चौक, शांतीनगर, इचलकरंजी. ९३२६०१४०१२

**गुरूकृपा ज. स्टोअर्स** कामासाठी मुलगा पाहिजे. एएससी कॉलेजजवळ, पार्ट टाईम किंवा फूल टाईम. मो. ९३२५४१९८२२, ९७३००८५९२४

**नामांकित कंपनीमध्ये** (Assembly Shop) भरती पदवीधर (शिकाऊ व अनुभवी) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक (लेडीज विवाहीत/मुलगा) स्टोअर इन्चार्ज. मो. ९७६६७२७८१६

**झेरॉक्स दुकानात** लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. संपर्क-महालक्ष्मी जंबो झेरॉक्स, एएससी कॉलेजजवळ, इचलकरंजी. ८८५५८९२२२३

**गारमेंटमध्ये हेल्पर कामासाठी** मुले/लेडीज पाहिजे. सेफ्टी फर्स्ट इंडस्ट्रिज एलएलपी, बीजेपी मार्केटजवळ, विक्रमनगर, इचलकरंजी. ९९२३०७२१०३

**टर्नर पाहिजेत.** डेव्हलपमेंट कामासाठी स्कील टर्नर (लेथ मशिनवर) पाहिजे. पत्ता-५२२, शिवाजीनगर, कोरोची. ९६६५९९९८८७, ८७६६७७९११०

**कंपनी सेक्रेटरी** ऑफिसमध्ये स्टाफ पाहिजे. पात्रता बी.कॉम पूर्ण. संपर्क-७७२००६७७८९

**कार अॅक्सेसरीज दुकानात** कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क-सुर्यवंशी कार अॅक्सेसरीज विरशैव बँकेजवळ, बीजेपी कार्यालय, इचलकरंजी. ७७६९८३८७०९

**अर्जंट कामगार पाहिजे.** सायझिंग युनिटमध्ये खरड दिवाणजी, बॅक सायझर, वार्पर, अनुभवी पाहिजेत. प्रत्यक्ष भेटणे. श्री धनलक्ष्मी सायझर्स, गणेशनगर, गल्ली नं.६, इचलकरंजी.

**गोमटेश एंटरप्राईजेस** कंपनीसाठी आयटीआय इलेक्ट्रॉनिक्स युपीएस बॅटरी मेंटनन्ससाठी मुले पाहिजेत. संपर्क-९४२२५८२५१०

* ऊर्वरीत पान ७ वर *

* पान ६ वरून *

**खाजगी क्लाससाठी** शिक्षिका पाहिजे. इचलकरंजीमधील नामांकित क्लाससाठी विज्ञान विषयासाठी शिक्षिका पाहिजे. किमान शैक्षणिक पात्रता-B.Sc, B.E.,अनुभवी/फ्रेशर चालतील. अधिक माहितीसाठी संपर्क- ९८८७०९७४४९

**रात्रपाळीसाठी** वॉचमन पाहिजे. निवृत्तसैनी-पत्ता-बिडला बिल्डींग, हुलगेश्वरी रोड, इचलकरंजी. भेटण्याची वेळ-सायं. ५ ते ७. फोन-(०२३०) २४३१५४२

**कामगार पाहिजे.** इलेक्ट्रीकल दुकानात कॉटरवर शिकाऊ/अनुभवी सेल्समन कामगार पाहिजे. समक्ष भेटा. महालक्ष्मी इलेक्ट्रीकल्स, राणी बागेजवळ, इचलकरंजी. ९०११९४२९६९

**स्पंदन हॉस्पिटल** आणि मेडिकलमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत. तसेच हॉस्पिटलमध्ये डॉक्टर पाहिजेत. बीएएमएस/बीएचएमएस. मो. ८४२१४२६६८५, ८७८८१९३३६०

**अनुभवी लायसनधारक** टेम्पो ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-मो. ९६८९९९३५०८

**पाहिजे.** टेक्स्टाईल ऑफिसमध्ये १) बेडशिट मार्केटिंग आणि सेल्ससाठी दिवाणजी. २) अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर (टॅली चे ज्ञान आवश्यक) ३) ऑफिसबॉय कम हेल्पर, अर्जासह समक्ष भेटा. किस्मत टेक्स्टाईल, शाहू पुतळा, आदर्श मंगल कार्यालय शेजारी, इचलकरंजी.

**गारमेंट कामाकरिता** लेडीज ऑपरेटर व हेल्पर मुले पाहिजेत. ऑफिस कामाकरिता ज्युनियर अकौंटंट (लेडीज) पाहिजे. दत्तनगर, भाटले मळा, इचलकरंजी. मो.९५७९९९७९३९

**Required-** Civil Engineer or Interier Desinger. (Freshors Can apply) Contact-R.B. Consultant. 9637771502, 7620998044

**लेथ मशिन** वर्कशॉपमध्ये फिटर, वेल्डर, हेल्पर व दिवाणजी कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- ९८२२४२०४९७०, इचलकरंजी.

**इलेक्ट्रॉनिक दुकानामध्ये** सेल्समन/कामगार पाहिजे. मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स, सम्राट अशोकनगर, आवळे मैदानजवळ, इचलकरंजी. ९८९०५४७०७८

**हॉटेलमध्ये** अनुभवी चायनिज सेफ व तंदूर असिस्टंट पाहिजेत. संपर्क- ९५९५६०७४४७

**इंजि. वर्कशॉपमध्ये** लेथ मशिन कामासाठी टर्नर-२, व्हीएमसी ऑपरेटर-२, अकौंटंट-१, हेल्पर-४-पुरुष/महिला. फूल टाईम, पार्ट टाईम, आकर्षक पगार. संपर्क- ९८३४९८१०१६, ८३२९१०४२२३, विक्रमनगर, इचल.

**इचलकरंजी** यड्राव फाटा येथे नामांकित शोरूमसाठी टू व्हिलर वॉशिंग बॉय अनुभवी, शिकाऊ पगार-११०००/- ड्युटी-८ तास. साप्ताहिक सुट्टी. कायमस्वरूपी काम. मो. ९५९५०१२८०४

**कामगार पाहिजे.** धोती, मलमल सुटिंग, कटिंग, पॅकिंग स्टॅम्पिंग कापड पेढीवर संपर्क- ८००७२२०९७७, कामवाडे मळा परिसर, इचलकरंजी.

**हॉटेलमध्ये कामासाठी** रोटी उस्ताद व नाष्टा सेंटरसाठी कुक हवा आहे. संगमनगर, तारदाळ. फोन- ८६६९००४२९०

**मोबाईल शॉपीमध्ये** कामासाठी मुली पाहिजे. संपर्क-वेलकम मोबाईल शॉपी, एएससी कॉलेजजवळ, इचलकरंजी. फोन- ७५२२९९७७१७१

**पार्वती एमआयडीसी** यड्राव व व इचलकरंजी येथे सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. ड्युटी १२ तास. संपर्क- ८७९९९५००३३, ८७६७२३३१३४.

**पाहिजेत.** अनुभवी/शिकाऊ फिटर-४, अनुभवी/शिकाऊ टर्नर-४, हेल्पर-२, समर्थ इंजिनिअरिंग, अलायन्स हॉस्पिटल, सुरज गॅस गोडाऊनजवळ, योगायोगनगर, गल्ली नं.२, चंदूर रोड, इचलकरंजी. फोन-७७०९१२०५२५, ९८२३१६४५५०

**होलसेल औषध दुकानासाठी** १० वी/ १२ वी उत्तीर्ण तथा अकाऊंटसाठी मुल-मुली आवश्यक. पत्ता- सुशिल फार्मा एलएलपी नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ९०९६२६१२७२.

## विश्वासराव नाईक कारखान्याचा ३५०० रूपये दर

शिराळा,ता.१४ (प्रतिनिधी)–

**विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखान्यातर्फे सन २०२५–२६ हंगामात गाळपासाठी येणाऱ्या उसाला ३ हजार ५०० प्रतिटन प्रमाणे दर दिला जाईल, अशी माहिती अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांनी दिली. यावेळी उपाध्यक्ष बाबासाहेब पाटील, सर्व संचालक मंडळ व कार्यकारी संचालक अमोल पाटील उपस्थित होते.**

नाईक म्हणाले,कारखान्याने नेहमीच सभासद, ऊस उत्पादकांचे हित जोपासले आहे. प्रत्येक वर्षी जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा प्रयत्न केला आहे.साखर कारखानदारीबाबत केंद्र सरकारचे धोरण सकारात्मक नाही. गेल्या वर्षी गाळपासाठी आलेल्या उसाला ३ हजार २७५ रुपये दर दिला आहे. हा दर एफआरपीपेक्षा १४१.६८ रुपये जास्त आहे. संचालक मंडळाने सर्व गोष्टींचा सारासार विचार करून यावर्षी उसाला प्रतिटन ३ हजार ५०० दर देण्याचा निर्णय घेतला आहे. ऊस उत्पादक शेतकरी, सभासदांनी पिकवलेला सर्व ऊस कारखान्याकडे गाळपास पाठवून सहकार्य करावे.

# सचिन हॉस्पिटलमधील स्त्री रोग मार्गदर्शन शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

मिरज,ता.१४ (प्रतिनिधी)–

**येथील सचिन हॉस्पिटलमध्ये स्त्री रोग व वंध्यत्व निवारण मोफत मार्गदर्शन शिबिरास दांपत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरात महाराष्ट्र व कर्नाटकमधील महिला तसेच अपत्यहीन दांपत्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, अशी माहिती डॉ. सचिन सुगाणावार व डॉ. नेहा सुगाणावार यांनी दिली.**



स्त्री रोग व वंध्यत्व निवारण मोफत मार्गदर्शन शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. सचिन सुगाणावार व डॉ. नेहा सुगाणावार.

डॉ. सुगाणावार म्हणाले, मुल न झालेल्या दांपत्यांवर व स्त्रियांमधील सर्व आजारांवर हॉस्पिटलमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपचार केले जातात. सचिन हॉस्पिटल हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्त्री रोग व वंध्यत्व निवारण (टेस्ट ट्यूब बेबी) सेंटर आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून सचिन हॉस्पिटलतर्फे स्त्री रोग व वंध्यत्व निवारण मार्गदर्शन शिबिराचे सातत्याने आयोजन करण्यात येते. शिबिरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ञ डॉक्टरांचे पथक कार्यरत होते. औषधोपचार, आय.यु. आय. व टेस्ट ट्यूब बेबीच्या पर्यायाविषयी यावेळी उपस्थितांबरोबर चर्चा करण्यात आली. हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची टेस्ट प्रयोगशाळा उपलब्ध असल्याने आधुनिक पद्धतीने व कमी खर्चात वंध्यत्व निवारण शक्य झाले आहे. शिबिरात सहभागी झालेल्यांवर सवलतीच्या दरात उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येतात.

## मुरगूडमध्ये नगराध्यक्षपदासाठी तीन तर नगरसेवक पदाकरीता ४५ अर्ज दाखल

मुरगूड,ता.१४ (प्रतिनिधी)–

**मुरगूड नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या पाचव्या दिवशी शुक्रवारी नगराध्यक्ष पदासाठी तीन तर नगरसेवक पदासाठी ४५ असे ४८ अर्ज दाखल झाले.**

नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून माजी उपनगराध्यक्ष जयसिंग भोसले यांच्या पत्नी अनिता भोसले व माजी नगरसेवक सुहास खराडे यांच्या पत्नी कांचन खराडे तर राष्ट्रवादी अजित पवार गटातर्फे माजी नगराध्यक्ष राजेखान जमादार यांनी अर्ज दाखल केले. मुरगुड नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याकरीता मोठी झुंबड उडाली होती. इच्छुक उमेदवार आपल्या समर्थकासह येवून उमेदवारी दाखल करीत होते.

# आदर्श नेता - पी.डी.पाटील (मामा)

**मामांचे घराणे पिढीजात मातब्बर, नाव पांडुरंग दत्तात्रय पाटील पण पीडी मामा म्हणून राजकीय ओळख.कूर गावाचे चालते बोलते न्यायालय, गाव पातळीवरील अथवा पंचक्रोशीतील कुठलाही निवाडा त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीच्या आड येऊ दिला नाही.आपला अगर परका माणूस समजून कधी पक्षपात केला नाही.जे रास्त तेच बोलणार.त्यांच्या यां स्पष्टवक्तेपणामुळे, त्यांच्यापासून लोक दुरावत गेले पण त्यांनी न्यायीक भान कधी सोडले नाही.या दिलदार नेत्याने मदतीसाठी पुढे केलेला हातही कधी आखडला नाही.**



मामानी गावचे सरपंचपद भूषवले. जि.पं.सदस्य झाले. अनेक सहकारी संस्था उभ्या केल्या.पण राजकारण आणि समाजकारण यात कधी गल्लत केली नाही.राजकारणाला मिळकतीचे साधन न मानता स्वतःचे एक तत्व घेऊन आयुष्यभर चालत राहिले.पण चरित्र आणि चारित्र्यावर कुठलाही डाग पडू दिला नाही.त्यांच्या राजकीय ईर्षेलाही विधायकतेची किनार असायची. विध्वंसक राजकारण त्यांनी कधी आयुष्यात केले नाही.असे दिलदार व्यक्तिमत्व आजकाल राजकारणामध्ये अपवादाने पहायला मिळते.मामांनी राजकारण घराच्या उंबऱ्याच्या आत येऊ दिले नाही.त्यांनी अगदी कौशल्याने घर सांभाळले.दोघे भाऊ राम लक्ष्मणासारखे राहीले.भावाचा एक मुलगा अमेरिकेत, दुसरा आरटीओ तर तिसरा शिक्षक आहे.तर स्वतःचा एक मुलगा वकिल आहे.थोरला चिरंजीव मदनदादा व धाकला जीवनदादा मामांचा राजकीय वारसा चालवतात.मदनदादा गावचे सरपंचपद सांभाळतात तर जीवनदादा जि.पं.सदस्य व बिद्रीचे संचालक म्हणून कार्यरत आहेत.

मामांच्या आदर्शावर अख्ख्या कुटुंबाची वाटचाल सुरू आहे.आयुष्यात अनेक चढउतार आले पण मामा कधीही डगमगले नाहीत.आव्हाने पेलत आणि संकटे झेलत आयुष्यभर चालत राहिले.आज मामा आपल्यात नाहीत.एका सत्वशील चारित्र्यसंपन्न नेत्याला गाव पोरका झाला आहे.मामा आपण काळाच्या काळाकवर आपल्या कर्तृत्वाचा शिलालेख लिहून ठेवलात ते संचित पुढील पिढीला दीपस्तंभाचा प्रकाश देत राहील.म्हणून ही तुमच्या चरणी भावपूर्ण शब्दांजली...!

**– एन.डी.तथा राजन कोनवडेकर**

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नं. ६३८/६३ /१ पैकी समजुतीचे नकाशाप्रमाणे प्लॉट नं. २० चे क्षेत्र २००० चौरस फुट ची खुली जागा मिळकत. यासी चतु:सिमा- पुर्वेस – प्लॉट नं. २९, पश्चिमेस – रस्ता दक्षिणेस – प्लॉट नं. २१, उत्तरेस – प्लॉट नं. १९, सदर मिळकत ही मूळची श्री. श्रीकांत बापूसो देसाई रा. कोरोची यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी तोंडी संचकार केलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. १३/११/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नं. ६३८/६३९/१ पैकी समजुतीचे नकाशाप्रमाणे प्लॉट नं. २१ चे क्षेत्र २००० चौरस फुट ची खुली जागा मिळकत. यासी चतु:सिमा- पुर्वेस – प्लॉट नं. २८, पश्चिमेस – रस्ता दक्षिणेस – प्लॉट नं. २२, उत्तरेस – प्लॉट नं. २०. सदर मिळकत ही मूळची श्री. श्रीकांत बापूसो देसाई रा. कोरोची यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी तोंडी संचकार केलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. १३ / ११ /२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे चंदुर येथील गट नंबर ४४४ पैकी क्षेत्र हे ०.१२.४२ आर ची शेत मिळकत यासि चतु:सिमा– पूर्वेस – श्री विकास माने यांची मिळकत, पश्चिमेस – श्री. मिलिंद नेमिष्टे यांची मिळकत. दक्षिणेस– श्री विकास माने यांची मिळकत, उत्तरेस – श्री. बाबुराव जाधव यांची मिळकत. सदरची मिळकत ही श्री. विकास वसंत माने. रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिल यांच्या कडुन संचकार रक्कम स्विकारून करारपत्र करुन दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट, बोजा, इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. १२/११/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांना कळविणेत येते की, मौजे तारदाळ येथील जुना क.ग.नं. ९४७ याचा नविन गट नंबर ७४७/ब पैकी बिगरशेती प्लॉट नंबर २७ ची याची फुटात मापे – पुर्व बाजु ४५-० फुट, पश्चिम बाजु ४५-० फुट, दक्षिण बाजु २२-६ फुट, उत्तर बाजु २२-६ फुट याचे क्षेत्र चौ. फुट १०००- १७ याचे चौरस मिटर ९३-० क्षेत्र हे. आर. ०-००-९३ ची बिगरशेती खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस याच गट नंबर पैकी प्लॉट नं. २७ पैकी शिल्लक मिळकत, पश्चिमेस- याच गट नंबर पैकी प्लॉट नं. २८ ची शिल्लक मिळकत, दक्षिणेस–२० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस– गट नंबर ७४८ ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील वर्णनाची मिळकत त्यातील तदंगभुत व झाडझुडपासह सर्व मिळकत ही श्री. उदय वसंत तुरंबेकर रा. इचलकरंजी यांचे मालकीची असुन ती त्यांनी आमचे स्नेही यांना लेखी संचकारपत्र करून कायम व खुष खरेदी देणेची ठरलेली असुन त्यापोटी संचकार दाखल रक्कम स्वीकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे स्नेहींना दिला आहे. तरी लवकरच आमचे स्नेही सदर मिळकतीचे खरेदीपत्र पुर्ण करून घेणार आहेत तथापी सदर मिळकतीवर अन्य कोणाचा कसलाही कोणत्याही प्रकारचा वाद, दावा, गहाण, करार, बक्षिस, हक्क व अधिकार असलेस सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व मूळ कागदोपत्रानिशी समक्ष भेटून खात्री पटवून द्यावी. मुदतीअंती कोणाची कसलीही तक्रार आमचे स्नेहींवर बंधनकारक नसेल. म्हणून दिली जाहीर नोटीस दिनांक – १३/११/२०२५ इसवी.

**श्री.अजय राजाराम कुडाळकर**

बॉण्ड रायटर

राजाराम स्टेडीयम, पार्कींग जवळ गाळा नं.९ इचलकरंजी संपर्क क्रमांक ९३२६००६८४०

## जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील गट नंबर ९०५ पैकी बिगरशेती प्लॉट नंबर १८ चे क्षेत्र १३८१-०५ चौरस फुटची खुली जागा यासी चतु:सिमा पुर्वेस – प्लॉट नंबर १९, पश्चिमेस – प्लॉट नंबर १७, दक्षिणेस- कबनुर ग्रामपंचायतची मिळकत, उत्तरेस – रस्ता. सदरची मिळकत ही १) पिरगोंड व २) राजगोंडा बाबगोंडा पाटील व इतर रा कबनुर यांचे कब्जेमालकीची असुन त्यांनी सदर मिळकतीचा खरेदीपूर्व करारपत्र अमर कोरवी रा नेर्ली यांना करून दिलेला आहे. त्यांनी आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकार पावती करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा कोर्ट केस इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणून दिली नोटीस सही

ता.१३/११/२०२५.

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**

३/१५३, देवमोरे वाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी. मो. ९८८१०१४७२५.

## जाहीर नोटीस

जिल्हा कोल्हापूर ता.हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील ग.नं.१३/ब पैकी १०९.२० चौ.मी म्हणजेच १९७५ चौ. फुटची खुली बिगरशेती जागा मिळकत याचे ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे ०.०१.०९ आर असे नमुद आहे. यासी चतु:सिमा अनुक्रमे – पुर्वेस – प्लॉट नं. २०ची गुरव यांची मिळकत, पश्चिमेस – श्रीकांत हिंगमिरे यांची मिळकत,दक्षिणेस–आत्माराम कांबळे यांची मिळकत, उत्तरेस– १० फूट रुंदीचा रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही सुनिता शिवाजी शिंदे यांच्या मालकी कब्जा वहिवाटीची मिळकत असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकारदाखल रक्कम स्विकारुन त्यांना संचकारपत्र करुन दिलेले आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा, कोणताही हक्क,करार,दावा, पोटगी, इजमेंट इ. वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसाच्या मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. मुदतीनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस. ता. १४/११/२०२५.

**ॲड.दिपक मारूती कदम**

वेताळ पेठ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. मो. ९९२२५८५२८८.

## जाहीर नोटीस

१) इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील इचलकरंजी येथील क. ग.नं. ६४०/१, क्षेत्र हे.०.९६ आर, आकार रू. ३.३१ पैसे यापैकी गुंठेवारी विकास नियमाधीन प्रमाणपत्रानुसार भुखंड नं. १२२ व १७५ चे एकुण एकत्रीत क्षेत्र ५५.७६ चौ. मी. ची मिळकत व त्यावरील बांधीव घर मिळकत यापैकी दक्षिण बाजुकडील क्षेत्र २७.८८ चौ. मी. यास सि. स. नं. १७६६२ असा नमुद आहे यांसी चतु: सिमा पुर्वेस :– श्री संभाजी पोवार यांची मिळकत, पश्चिमेस :– श्री बाबू कारदगे यांची मिळकत, दक्षिणेस :– रस्ता व उत्तरेस :– नामदेव राणे यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु: सिमेतील बांधीव घर मिळकत. २) वरील मिळकत ही ''श्री प्रशांत शंकर राणे'' यांचे मालकी वहीवाटीची असून सदरील मिळकतीसंदर्भात त्यांनी आमच्या अशिलांशी करारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे. ३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क, करार, तारणगहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क, कोर्ट केस वगैरे हक्कसंबंध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती कागदपत्रासह लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता. १४/११/२०२५

**ॲड.पंकज आ. पाटील**

ऑफिस- 'श्री दत्त अपार्टमेंट' गाळा नं. १, सांगली नाका, इचलकरंजी. मो. ९०२१२३७६८७.

## जाहीर नोटीस वजा इशारा

सर्व लोकांना जाहीरपणे कळविणेत येते की, –

१) ''जि. कोल्हापूर, ता. हातकणंगलेपैकी मौजे आळते गावचे ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन क. गट नंबर १०५८ याचे एकूण क्षेत्र हे. २- १७ आर. पो.ख. हे. ०-०८ आर., आकार रू. ११-२५ पै. यापैकी तीन आणे तीन पै हिश्याची शेतजमीन म्हणजे हे. ० -४४ आर, आकार रु. २- ५८ पैसेची यासी चतु:सिमा- पूर्वेस – आळते हरीजन लोकांच्या शेतजमिनी, पश्चिमेस – सदर गट नंबरपैकी आण्णाप्पा हावळे यांची शेतजमीन, दक्षिणेस– सरकारी रस्ता, उत्तरेस– सदर गट नंबरपैकी अशोक जयपाल हावळे यांची शेतजमीन, यामधील एक विहीर व विहीरीवरील पाच अश्वशक्तीचा जूनी इलेक्ट्रीक मोटर पंप व एकूण चार नारळाची झाडे असून यातील समाई तीन आणे तीन पै चा हिस्सा, विहिर, पाणी, धावमोटवण, पाणी जाणेचे पाटाचे हक्कासह व झाडझुडसह व इजमेंटचे हक्कासह सर्व'', येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेतजमीन सर्व.

२) वरील मिळकत ही मुळची श्री. नौशाद दिलावर शेख व श्री. इर्शाद दिलावर शेख, दोघे रा. इचलकरंजी यांचे मालकी वहिवाटीची असून ती खरेदी देणेबाबतचा नोटराईज्ड करार दि. २४/१२/२०२४ इ. रोजी आमचे अशील श्री. प्रदीप मल्लू मोरबाळे, रा. इचलकरंजी यांना करुन दिलेला आहे. सदर करारापोटी संचकार दाखल बहुतांशी रक्कम मिळकत मालकांनी स्विकारुन मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा जमीनीचे मालकांनी आमचे अशीलांना दिलेला आहे. त्याप्रमाणे वर नमुद मिळकत आमचे अशीलांना कराराप्रमाणे खुषखरेदी घेणेचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे.

३) असे असता, वरील मिळकतीचे मालक श्री. नौशाद दिलावर शेख व श्री. इर्शाद दिलावर शेख यांनी सौ.हिना नौशाद शेख व सौ. निलोफर इर्शाद शेख, रा. इचलकरंजी यांचे मान्यतेने र.द. नंबर ७३१ / २०२५ दिनांक २०/१/२०२५ इ. रोजी आमचे अशीलांचा करारास मिळकत खरेदी घेणेचा अग्रहक्क डावलून अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे व संगनमताने श्री. अमृत शिवाजीराव जाधव, रा. कबनूर यांना मिळकतीचे पोकळ, बेकायदेशीर, बिनभरण्याचे व अंमलास अपात्र असे खरेदीपत्र केल्याचे आमचे अशील श्री. प्रदीप मल्लू मोरबाळे, रा. इचलकरंजी यांना नुकतेच समजून आले आहे.

४) श्री.अमृत शिवाजीराव जाधव, रा. कबनूर यांनी तथाकथीत पोकळ खरेदीपत्राची नोंद सातबारा पत्रकी असलेचा गैरफायदा करुन घेणेच्या हेतूने वरील मिळकतीची परस्पर विक्री, तबदीली, बोजा, हस्तांतरण करणेचा प्रयत्न चालविलेला आहे. तसे करणेचा कोणताही हक्क अगर अधिकार श्री. अमृत शिवाजीराव जाधव, रा. कबनूर यांना नव्हता व नाही. तरी वरील मिळकतीबाबत आमचे अशील श्री. प्रदीप मल्लू मोरबाळे, रा. इचलकरंजी यांचा अग्रक्रमाने मिळकत करारने खरेदी घेणेचा हक्क डावलून कोणीही कोणतेही गैरव्यवहार करु नयेत, ते केलेस अथवा यापूर्वी केले असलेस ते आमचे अशीलांचे कायदेशीर हक्कांवर बंधनकारक राहणार नाहीत.

म्हणून दिली जाहीर नोटीस वजा इशारा. सही. ता. १४/११/२०२५.

**ॲड. मुकुंद ल. आजरेकर**

'माऊलीगंगा, १३/२६३, दातार मळा, इचलकरंजी. जि. कोल्हापूर. मो. ९४२२५९०२५७, ९०२८४५०४००.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेकरिता आमचे अशीला मार्फत प्रसिध्द करणेत येते की –

मिळकतीचे वर्णन – जिल्हा व तुकडी कोल्हापूर, पोट तुकडी तहसील हातकणंगले, मा. सह दुय्यम निबंधकसा वर्ग २ इचलकरंजी यांचे अधिकारक्षेत्रातील मौजे तारदाळ येथील क.ग.नं. ३०० याचे एकूण क्षेत्र हे. १-२१.०० आर, पोटखराब हे.०-१२.०० आर, आकार रू. २.१० पैसेची मिळकत पैकी मा. जिल्हाधिकारीसो कोल्हापूर यांचेकडील आदेश क्र. डेस्क /III/ आर. बी. / एलएनए /एस आर/ ६७६/१९८३ दि. ३१/१२/१९८३ रोजी ने डेअरी अँन्ड पोल्ट्री या कारणाकरिता बिगरशेती केलेल्या मिळकतीपैकी सौ. दिपा तेजकुमार आंबोलकर याचे क्षेत्र १८८ चौ. मि. म्हणजेच २००० चौ. फुट यासी चतु:सिमा पुर्वेस- रस्ता, पश्चिमेस – धाबोजी यांची मिळकत, दक्षिणेस – रायणावर प्रोफेसर यांची मिळकत, उत्तरेस – सुनिल सदाशिव परीट यांची मिळकत.

येणेप्रमाणे चतु:सीमेतील मिळकत तदंगभूत वस्तूसह यास यापुढे सोयीकरिता ''सदर मिळकत'' असे समजणेचे आहे.

सदर मिळकत ही दिपा तेजकुमार आंबोलकर रा. तारदाळ, सध्या रा. दत्तनगर, शहापूर– इचलकरंजी यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकत त्यांनी आमचे अशीलास खरेदी देणेचे ठरवून संचकाराखाल भरीव रक्कम स्वीकारलेली आहे. आमचे अशील लवकरच सदर मिळकतीचे खरेदीपत्र करून घेणार आहेत. सदर मिळकतीबाबत कोणाचेही, कोणतेही हक्क, अधिकार, मालकी, कब्जा, पोटगी, कर्ज, गहाण करारपत्र, बक्षीसपत्र अगर अन्य कोणत्याही तऱ्हेचे संबंध असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत आपले सर्व अस्सल कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर भेटून खुलासा करावा. मुदतीत कोणाची कसलीही तक्रार आली नाही तर आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग त्यानंतर येणाऱ्या तक्रारींचा कोणताही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. म्हणून प्रसिध्द केली नोटीस ता.१४/११/२०२५.

**ॲड. अमिन अ. मुजावर**

८/८०३, शांतीनगर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. मो. ८९५६०५९१४१.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन :– मौजे कबनूर ग्रामपंचायत हद्दीतील भूमापन गट नं. ९७० याचे एकूण क्षेत्र – ३ हे. ५९ आर आकार २६ रु. ६९ पैसे पैकी बिगरशेती भूखंड नंबर – २३ याचे एकुण क्षेत्र – ६८.०१ चौ. मीटर म्हणजेच ७३१ चौरस फुट ची खुली जागा मिळकत सर्व . याचे फुटा मध्ये मोजमापे पूर्व बाजू – २० फुट, पश्चिम बाजू – २० फुट, दक्षिण बाजू – ३६.६ फुट, उत्तर बाजू – ३६.६ फुट. चतु:सीमा खालीलप्रमाणे पूर्वेस :– प्लॉट नं. २४ ची मिळकत, पश्चिमेस :– प्लॉट नं. २२ ची मिळकत,, दक्षिणेस :– श्री. पाटील यांची मिळकत, उत्तरेस :– १५ फुटी रस्ता.

२) वर कलम – १ मध्ये नमूद केलेली प्लॉट नं. २३ या मिळकत ही श्री. राज जनार्दन हजारे रा. इचलकरंजी यांचे स्वकष्टार्जित आणि खुद्द मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून जागा मालकांनी माझे अशिलांचे कडून संचकार करारने संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकतीवर कोणाचा प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा, करार, अधिकार, कर्ज, गहाण, लागलिगाड असलेस सदरची नोटिस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत खाली नमूद पत्त्यावर योग्य कागदपत्रांनिशी माझी खात्री करून द्यावी. म्हणून दिली जाहिर नोटिस आज मुक्काम इचलकरंजी.

दिनांक :– १४/११/२०२५.

**ॲड. ओंकार मोहन माने**

ऑफिस :– ५ वी गल्ली, नवीन वसाहत, शिरदवाड, ता. शिरोळ, जिल्हा :– कोल्हापूर मो. ८५३०३९५९६०


सुलतानपुरे विद्यालयाच्या क्रीडामहोत्सव उद्‌घाटनवेळी क्रीडा ज्योत प्रज्वलन करताना प्रमुख पाहुणे, शिक्षक वर्ग व विद्यार्थी.

## सुलतानपुरे विद्यालयात वार्षिक क्रीडामहोत्सवास प्रारंभ

इचलकरंजी,ता.१४-

**येथील वीरशैव उत्कर्ष मंडळ संचलित श्री. मृगेंद्रआण्णा सुलतानपुरे प्रा.वि.मं.श्री ज्ञानबाताऱ्या दत्तवाडे हायस्कूल व ज्यु.कॉलेज व डी. एम. बिरादार बाल विद्या मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने ३४ व्या वार्षिक क्रीडामहोत्सवास प्रारंभ झाला.**

उद्‌घाटनप्रसंगी क्रीडा ज्योत प्रज्वलन अनिल भोई यांच्या हस्ते करण्यात आले. तर ध्वजारोहण वैष्णवी पोवार यांच्याहस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी आप्पाण्णा संकेश्वरी हे होते.स्वागत व प्रास्ताविक प्राथमिकचे मुख्याध्यापक श्री.देवमोरे यांनी केले.पाहुण्यांचा परिचय हायस्कूल व कॉलेजच्या मुख्याध्यापिका सौ.मगदूम यांनी करून दिला. या क्रीडामहोत्सवास वीरशैव उत्कर्ष मंडळाचे संचालक श्री.तोडकर,श्री.मुरदंडे, शिवमंदिर कमिटीचे संचालक राजू पाटील, राजगोंडा पाटील, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,पालक व विद्यार्थी उपस्थित होते.सूत्रसंचालन सौ.पाटील व श्री. गवळी यांनी केले.आभार श्री.आडकिल्ला यांनी मानले.


गोकुळ दूध संघ कार्यालयात स्व.वसंतदादा पाटील यांच्या प्रतिमा पूजनप्रसंगी चेअरमन नविद मुश्रीफ,व संचालक मंडळ.

## स्व.वसंतदादा पाटील यांना 'गोकुळ'तर्फे अभिवादन

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) च्या वतीने संघाच्या ताराबाई पार्क कार्यालय येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि सहकार चळवळीचे प्रणेते स्वर्गीय वसंतदादा पाटील यांची १०८ वी जयंती साजरी करण्यात आली.**

यावेळी गोकुळचे चेअरमन नविद मुश्रीफ व संचालक मंडळ यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी माजी चेअरमन व ज्येष्ठ संचालक विश्वास पाटील,अरुण डोंगळे,संचालक बाबासाहेब चौगले,अभिजित तायशेटे,अजित नरके, शशिकांत पाटील-चुयेकर, किसन चौगले, रणजितसिंह पाटील, नंदकुमार ढेंगे, संभाजी पाटील, सुजित मिणचेकर,अमरसिंह पाटील,युवराज पाटील,राजेंद्र मोरे, कार्यकारी संचालक डॉ. योगेश गोडबोले,संघाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## हातकणंगलेत जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली आढावा बैठक

हातकणंगले,ता.१४(प्रतिनिधी)-

**हातकणंगले नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी हातकणंगले तहसिलदार कार्यालयात अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.**

या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या. मतदान केंद्रांवरील तयारी, सुरक्षा व्यवस्था, तसेच मतदारांच्या सोयीसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेतला. या बैठकीस निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सुशिल बेल्हेकर,नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विशाल पाटील यांच्यासह निवडणूक प्रक्रियेशी संबंधित इतर अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी इंगवले हायस्कूल, हातकणंगले येथील मतदान केंद्रास भेट देऊन तेथील प्रत्यक्ष तयारीची पाहणी केली.मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा, सुरक्षेची व्यवस्था, तसेच कर्मचारी नियुक्तीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

## निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांनी पदभार स्विकारला

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**कोल्हापूरचे नवे निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून पुण्याच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांनी नव्या पदाचा कार्यभार स्विकारला.**



गजानन गुरव मूळचे भिलवडीचे असून त्यांनी २००१ मध्ये सांगली जिल्ह्यात नायब तहसीलदार म्हणून आपल्या प्रशासकीय सेवेस प्रारंभ केला.त्यानंतर त्यांनी शिरोळ येथे नायब तहसीलदार तर फलटण, शिरोळ, पंढरपूर, शाहूवाडी येथे तहसीलदार म्हणून काम केले. सांगली व सोलापूरमध्ये उपजिल्हाधिकारी तर पंढरपूरमध्ये प्रांताधिकारी म्हणून काम केले आहे.

# पश्चिम महाराष्ट्रात बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये वाढ

## लोकांमध्ये भितीचे वातावरण; दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**अलिकडील सहा महिन्यांत पश्चिम महाराष्ट्रात बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे.कित्येक वेळी प्राणघातक हल्ले झाले आहेत. अनेक वेळा लोक, जनावरे मृत्यूमुखी पडले आहेत.नंदुरबार आणि पुणे जिल्ह्यांमध्ये जास्त हल्ले झाले असले तरी आता कोल्हापूरसह इतर जिल्ह्यातही बिबट्याचे हल्ले वाढत आहेत त्यामुळे सर्वत्र भितीचे वातावरण आहे.**

कोल्हापूरमधील नागाळा पार्कातील मध्यवस्तीत नुकताच बिबट्याने गोंधळ घातला. नागाळा पार्कात आलेल्या बिबट्याने चार जणांवर जीवघेणा हल्ला केला. आणि त्यांना जखमी केले. बिबट्याच्या हल्यामध्ये वनविभाग, पोलीस प्रशासन यांच्या शर्थीच्या प्रयत्नाने बिबट्या पकडलाआणि सह्याद्रीच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. याबरोबरच कोल्हापूर पन्हाळा किल्ल्याच्या परिसरात बिबट्याचा वावर वाढला आहे. गगनबावडा तालुक्यातील अणदूर या गावामध्ये एका बैलास ठार केले. यावर सर्वांनी ठोस पावले उचलली पाहिजेत. तसे झाले नाही तर आणखी हल्ले होतील असच दिसते. अलिकडे सहा महिन्यात महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात बिबट्याचे हल्ले झाले याचा आढावा घेतला असता त्यातून आपणाला हेच दिसेल की बिबट्याचा नागरी वस्तीमध्ये वाढलेला शिरकाव यावर उपाय केलेच पाहीजेत. दरम्यान, राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी नरभक्षक बिबट्यांना दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश दिले आहेत.

पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत बिबट्यांचा वावर आणि हल्ले चिंताजनक पातळीवर पोहोचले आहेत.नंदुरबार जिल्ह्यात (तळोदा तालुका) गेल्या सहा महिन्यांत ९ जणांचा मृत्यू बिबट्याच्या हल्ल्यामुळे झाला आहे. मृतांमध्ये ३ महिला आणि ६ बालकांचा समावेश आहे. पुणे जिल्हा



(शिरूर तालुका) पिंपरखेड गावात २० दिवसात बिबट्याने दोन मुलं आणि आजोबांचा जीव घेतला. जुन्नर वन विभाग (पुणे जिल्हा) मागील काही वर्षांत अनेक लोकांचा बळी बिबट्याच्या हल्ल्यामुळे गेला आहे. बरेच जण जखमी झाले आहेत, अलिकडील सहा महिन्यांत सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, बेळगाव, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांत बिबट्यांचे हल्ले मोठ्या प्रमाणात वाढले असून, जनजीवनवर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे.

कोल्हापूरसह सांगलीमध्ये सुध्दा बिबट्याची दहशत वाढली आहे. सातारा, कराड आणि पाटण तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यात मागील७ महिन्यांच्या कालावधीमध्ये २४९ जनावरांवर हल्ले झाले आहेत.पन्हाळा किल्ल्याच्या परिसरात बिबट्याचा वावर वाढला आहे. गगणबावडा तालूक्यातील अणदूर या गावामध्ये एका बैलास ठार केले. सोलापूर जिल्ह्यामध्ये ऊस क्षेत्र वाढल्यामुळे बिबट्याचा हंगामी अधिवास तयार झाला आहे.लोकांना बिबट्याचे दर्शन वारंवार घडत आहे. बेळगावमधील मालेगाव तालुक्यात बिबट्याचा वावर वाढला आहे. गंगासागर वस्तीत सहा शेळ्या आणि एका बोकडाचा बिबट्याने फडशा पाडला. सिंधुदुर्गमधील कोंढाळी परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात वर्षभरात १३१ जनावरे ठार झाली. रत्नागिरी मधील ४ तालुक्यांतील १२० गावांमध्ये बिबट्यांचा वावर आहे.

### वन्यजीव-मानव संघर्षाचे गंभीर परिणाम

महाराष्ट्रात बिबट्यांचा वावर वाढल्यामुळे मानव-बिबट्या संघर्ष तीव्र झाला आहे. जंगलतोडीमुळे बिबटे नागरी वस्तीत येत आहेत,त्यामुळे नागरिक भयभीत आहेत.वन्यजीव आणि मानव संघर्षाचे गंभीर परिणाम भोगावे लागत आहेत.यावर वनविभागाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे. जसे की, बिबट्याची नसबंदी करणे गरजेचे आहे. यामुळे बिबट्यांची संख्या नियंत्रित राहील आणि मानवी वस्तीत वावर कमी होईल.जंगलतोड थांबवून बिबट्यांसाठी नैसर्गिक अधिवास राखणे आवश्यक आहे. वनक्षेत्रात पाण्याचे स्त्रोत, झाडांची लागवड आणि अन्नसाखळी टिकवणे गरजेचे आहे.

## ज्येष्ठांमुळे लहान मुलांवर चांगले संस्कार होतात-चौगुले

कुरुंदवाड,ता.१४(प्रतिनिधी)-

**टीव्ही,मोबाईलमुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली असून सध्या वाचनासाठी वाचनालयाकडे युवक पाठ फिरवत आहेत. बदलत्या संस्कृतीमुळे तरुण दांपत्य म्हाताऱ्या माणसांना अनाथ आश्रमात ठेवतात. पण घरात असलेली वयस्कर माणसे ही देवाजवळ असणाऱ्या निरंजनासारखी असतात. त्यांच्यामुळेच लहान मुलांवर चांगले संस्कार होतात, असे प्रतिपादन कवियत्री अपर्णा चौगुले यांनी केले.**

येथील शतकोत्तर रौप्य महोत्सवी नगरवाचनालयात पद्मश्री कै. पां. वा.गाडगीळ व कै.डॉ.स.रा.गाडगीळ यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित शरद व्याख्यानमालेत 'बदलती जीवनशैली योग्य का अयोग्य' या विषयावर चौथे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी वाचनालयाचे कार्याध्यक्ष अ.शा. दानवाडे होते.

त्या पुढे म्हणाल्या की,आधुनिक काळात वेगाने होत असलेले बदल ज्यामुळे लोकांच्या सवयी, विचार आणि जगण्याच्या पद्धतीत मोठे बदल झाले आहेत.तंत्रज्ञानामुळे जीवनात सुविधा वाढल्या असल्या तरी बैठकाम आणि कमी शारीरिक श्रमामुळे आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत.चुकीच्या सवयीमुळे माणसाच्या पुरेशा हालचाली होत नाहीत.त्या कमी होत गेल्यामुळे कालांतराने शारीरिक प्रक्रियाशीलतेचा परिणाम शरीरावर दिसू लागतो.सध्या माणसाच्या जीवनशैलीत झपाट्याने बदल होत आहेत. सगळीकडे आधुनिकीकरण, शहरीकरण झाले आहे.लहान-मोठी कामे सहज होऊ लागली आहेत.सर्वच कामांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर झाल्यामुळे माणसाच्या हालचाली कमी झाल्या आहेत. त्यामुळे प्रत्येकाची काम करण्याची प्रवृत्ती राहिली नसल्याचे सांगितले.

प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक वाचनालयाचे उपकार्याध्यक्ष प्रा.भाऊसाहेब सावगावे यांनी केले. पाहुण्यांचा सत्कार कार्याध्यक्ष अ. शा. दानवाडे यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन माणिक दातार यांनी तर शेवटी आभार प्रा. भाऊसाहेब सावगावे यांनी मानले.या व्याख्यानमालेला शांतगोंड पाटील, शशिकांत पाटील, सदाशिव सुभेदार,मोनाप्पा चौगुले, कुतुबुद्दीन दानवाडे,जयपाल बलवान, सदानंद पाटील, जितेंद्र कुलकर्णी,मलाप्पा प्रधाने, भीमराव चिंचवाडे, दत्तात्रय भोसले, मेघा पाटील, नरसिंह नाईक, दादासो परीट या मान्यवरांसह श्रोते उपस्थित होते.

## डी.वाय.पाटील ग्रुपच्या निखिल कदम यांची सिलेक्टर पदी निवड

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**डी.वाय.पाटील ग्रुपचे फुटबॉल प्रशिक्षक निखिल कदम यांची शासनाच्या 'महादेवा' प्रकल्प अंतर्गत होणाऱ्या १३ वर्षांखालील मुला-मुलींच्या फुटबॉल राज्यस्तरीय निवड प्रक्रियेसाठी सिलेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**



हि समिती १३ वर्षांखालील राज्यातील ६० प्रतिभावान खेळाडूंची निवड करणार असून त्याना 'महादेवा' प्रकल्प अंतर्गत स्कॉलरशिप प्रदान केली जाणार आहे.महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक व्यवहार विभाग,मित्रा,यांच्या विद्यमाने तसेच वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या सहकार्याने ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

यासाठी राज्यातील पाच जणांची निवड समिती जाहीर करण्यात आली असून त्यात कोल्हापूरच्या निखील कदम यांनी स्थान मिळवले आहे. या निवडीबद्दल डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील यांनी अभिनंदन केले.

## शिवसेना जिल्हाप्रमुखपदी नामदेव गिरी यांची निवड

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**शिवसेना ठाकरे गटातील निष्ठावंत शिवसैनिक म्हणून ओळखले जाणारे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख नामदेव शामराव गिरी यांची शिवसेना कोल्हापूर जिल्हा प्रमुखपदी (हातकणंगले लोकसभा) निवड झाली आहे.**



शाहूवाडी तालुक्यातील शित्तूर तर्फ मलकापूर या गावचे रहिवासी असलेले नामदेव गिरी हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटामध्ये उपजिल्हाप्रमुख म्हणून गेल्या दहा वर्षांपासून काम करत होते. शाहुवाडी पन्हाळा तालुक्यात गावागावात शिवसेना रूजवण्याचे काम त्यांनी केले आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये शिवसेनेत केलेल्या कामाची दखल घेऊन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कोल्हापूरचे नूतन जिल्हाप्रमुख म्हणून त्यांच्या नावाची घोषणा केली आहे.

शिवसेनेच्या जिल्हाप्रमुख पदी नामदेव गिरी यांची निवड झाल्याने शाहुवाडी-पन्हाळा तालुक्याला जिल्हाप्रमुख पदाची पहिल्यांदाच संधी मिळाली आहे. त्यांच्या निवडीमुळे शाहुवाडी पन्हाळा व हातकणंगले विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.एक सर्वसामान्य कार्यकर्त्याचा पक्षाकडून झालेला सन्मान सर्व कार्यकर्त्यांना उभारी देणारा आहे.

शिवसेना नेते विनायक राऊत, सुनील प्रभू आणि शिवसेना संपर्कप्रमुख अरुण दूधवडकर, शाहुवाडी पन्हाळा तालुक्याचे शिवसेनेचे नेते माजी आमदार सत्यजित पाटील सरूडकर यांचे जिल्हाप्रमुख पदाच्या निवडीत सहकार्य लाभले आहे.

## जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धेमध्ये कमला कॉलेज विजयी

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्यावतीने आयोजित कोल्हापूर विभागीय क्रीडा संकुल,संभाजीनगर, कोल्हापूर येथे झालेल्या मनपा जिल्हास्तरीय १९ वर्ष मुलींच्या डॉजबॉल स्पर्धेमध्ये कमला कॉलेजच्या कनिष्ठ विभागातील डॉजबॉल संघाने विजेतेपद पटकावले.**



या स्पर्धेमध्ये अंतिम सामना नागोजी पाटणकर हायस्कूल, कोल्हापूर यांच्या संघासोबत झाला.या सामन्यामध्ये कमला कॉलेजने आठ गुणांच्या फरकाने विजेतेपद पटकावले.कमला कॉलेजच्या डॉजबॉल संघामध्ये कर्णधार मनाली कांबळे, संचिता सावंत, वैभवी येडूरकर, प्रणाली ढाले, स्मिता वासुदेव, दक्षता कामिरे, वैष्णवी जाधव,श्रुती चौगुले, राजनंदिनी वागवेकर, तन्वी जाखले या खेळाडूंचा समावेश होता.कोल्हापूर विभागीय डॉजबॉल स्पर्धेसाठी या संघाची निवड झाली.खेळाडूंना ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ.क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील,प्राचार्या तेजस्विनी मुडेकर, मोहन जाधव, लेफ्टनंट ज्योती लेंगरे, पूजा ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले.


श्रीहरी
शुक्रवार, ता.१४/११/२०२५ पासून दुपारी १ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
जिम ट्रेनर
प्रौढांसाठी
दु. ४ व सायं. ७ वा.
A किरायेदार A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १४ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
सेक्रेटीज ऑफिस
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्रवार ता.१४ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज २ खेळ *१२ *९ वा.
रोज २ खेळ *३ *६ वा.

दे दे प्यार दे-२ (हिंदी)

कांतारा-२ (हिंदी)

५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा DOLBY DIGITAL
शुक्रवार ता. १४ पासून
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
रोज ४ खेळ *१२ *३ *६*९ वा.

गोंधळ (मराठी)

कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.१४ पा
१२,३,६,९ वा
रोमँटिक कॉमेडी चित्रपट
(हिंदी चित्र)
DOLBY DIGITAL QUBE

दे दे प्यार दे- २
भू. अजय देवगण, आर.आर.माधवन, जावेद जाफरी, रकुल प्रीत, तब्बू

गुरु
शुक्रवार ता.१४ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
१२.३० ३.३०वा. व ९.३० वा.

दे दे प्यार दे-२ (हिंदी)
सायं. ६.३० वा.
सुपरडुपर हिट गुजराती चित्रपट

लालो-कृष्णा सदा सहायते
सर्वांनाच समजेल असा उत्कृष्ट हृदयस्पर्शी गुजराती चित्रपट

RK CINEMA
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
3 SCREEN MULTIPLEX

"दे दे प्यार दे 2" (हिंदी)
10:15 AM, 01:30 PM 04:30 PM, 07:30 PM 10:30 PM
"कांतारा: चॅप्टर 1" (हिंदी)
12:30 PM, 06:30 PM 09:30 PM
"गोंधळ" (मराठी)
02:15 PM, 07:15 PM
"दी ताज स्टोरी" (हिंदी)
11:15 AM, 03:30 PM 10:15 PM
"दी गर्लफ्रेंड" (हिंदी)
05:00 PM
7447440070
bookmyshow
चित्रपटाचा भरपूर आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11

दे दे प्यार दे २ (HIN) (U/A)
10.45am, 01.30, 04.15, 07.30, 10.30pm
कांतारा २ (HIN) (U/A)
01.45, 07.15, 10.30pm
द ताज स्टोरी (HIN) (U/A)
10.45am, 10.15pm
पुन्हा शिवाजीराजे भोसले (MAR) (U/A)
05.00pm
गोंधळ (MAR) (U/A)
08.00pm
कोणताही सिनेमा पहा 100 रु. पासून पुढे

# सदाशिवभाऊंचा मास्टरस्ट्रोक निर्णायक ठरणार ?

## नवीन-जुन्या भाजपचा मेळ घालण्यात यश; राजकीय वातावरण बदलले

विटा,ता.१४(प्रतिनिधी)-

**खानापूर विधानसभेच्या निवडणुकीत आ. सुहास बाबर यांना विटा शहरातून मोठे मताधिक्य मिळाल्यानंतर पाटील गटात काहीसा चिंतेचा सूर होता. मात्र मुरब्बी राजकारणी असलेल्या माजी आ. सदाशिवभाऊ पाटील यांनी मुलगा वैभव पाटील यांचा भाजपात प्रवेश करत मोठा राजकीय मास्टरस्ट्रोक मारला आहे. याबरोबरच भाजपातील नवे जुने कार्यकर्ते ऐक्य, गायकवाड गटाचा समन्वय अशा माध्यमातून सदाशिवभाऊ पाटील यांनी आपली तगडी टीम पालिकेच्या मैदानात उतरवली आहे. त्यामुळे माजी आ. सदाशिवभाऊ पाटील यांचा हा राजकीय मास्टरस्ट्रोक विटा पालिकेच्या रणांगणात निर्णायक ठरणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहणार आहे.**



सदाशिवभाऊ पाटील | आ.गोपीचंद पडळकर | वैभव पाटील | अशोक गायकवाड

माजी आ. सदाशिवभाऊ पाटील यांच्या घराण्याची गेल्या पन्नास वर्षांपासून विटा नगरपरिषदेवर सत्ता आहे.या काळात पालिका निवडणूक असो किंवा विधानसभेची निवडणूक असो प्रत्येकवेळी विटेकर जनतेचा पाठिंबा हा सदाशिवभाऊ पाटील गटालाच असतो,हा शहराचा राजकीय इतिहास आहे.मात्र गतविधानसभा निवडणुकीत पहिल्यांदाच विटा शहरातून विरोधकांना मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे विटा पालिकेच्या निवडणुकीत पाटील गटाचे काय होणार, राज्यात सत्ता असलेल्या भाजप शिवसेनेविरोधात लढण्यासाठी माजी आ. सदाशिवभाऊ पाटील कोणती रणनीती आखणार,याकडे कार्यकर्त्यांसह विरोधकांचे देखील लक्ष होते.

**सदाशिवभाऊंचा मास्टरस्ट्रोक**

विटा पालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेला रोखण्यासाठी माजी आ. सदाशिवभाऊ पाटील यांनी काही महिन्यापूर्वीच माजी नगराध्यक्ष वैभव पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमधून थेट भाजप पक्षात प्रवेश घडवून आणला. वैभव पाटील भाजपात आल्यामुळे विटा शहरातील भाजपचा निष्ठावंत गट असलेल्या अनिल म.बाबर यांना पाटील गटासोबत यावे लागले.तसेच आ. गोपीचंद पडळकर यांची देखील साथ मिळाली.पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे पारडे जड होणार असल्याचे संकेत मिळाल्यामुळे काँग्रसचे नेते अशोकराव गायकवाड यांच्यासह अन्य प्रमुख मंडळी पुन्हा एकदा पाटील गटासोबत आली आहेत.त्यामुळे माजी आ.सदाशिवभाऊ पाटील यांनी मारलेला हा राजकीय मास्टरस्ट्रोक निवडणुकीच्या रणांगणात निर्णायक ठरणार का,याकडे आता सर्वांचे लक्ष लागून आहे.

**पुतण्या देखील काका सोबत**

काँग्रेसचे ज्येष्ठनेते अशोकराव गायकवाड यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यांचे पुतणे माजी नगरसेवक सुमित गायकवाड यांचा निर्णय झाला नव्हता. शुक्रवारी दुपारी अखेर सुमित गायकवाड यांच्या उमेदवारीबाबत देखील निर्णय झाला आहे. आपण अशोकभाऊ गायकवाड यांच्यासोबतच भाजपच्या टीममधून निवडणूक लढवणार असल्याचे सुमित गायकवाड यांनी दैनिक महासत्ताशी बोलताना जाहीर केले. त्यामुळे भाजपचे नेते सदाशिवभाऊ पाटील यांना अखेर गायकवाड काका-पुतण्याला सुध्दा सोबत घेण्यात यश आले आहे.

## 'कृष्णा' व 'जयवंत शुगर्स'चा ऊस दर जाहीर

कराड,ता.१४(प्रतिनिधी)-



**रेठरे बुद्रुक (ता. कराड) येथील य.मो.कृष्णा सहकारी साखर कारखाना आणि धावरवाडी (ता. कराड) येथील जयवंत शुगर्स साखर कारखान्याने सन २०२५-२६ या हंगामात गळीतास येणाऱ्या उसाला प्रतिटन ३५०० रूपये दर जाहीर केला आहे. कृष्णा कारखान्याचे चेअरमन व जयवंत शुगर्सचे संस्थापक डॉ. सुरेश भोसले यांनी याबाबतची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.**

कृष्णा कारखाना आणि जयवंत शुगर्स या दोन्ही कारखान्यांनी नेहमीच ऊस उत्पादकांच्या हिताला प्राधान्य देत,चांगला दर देण्याचे धोरण अवलंबले आहे. यंदाच्या हंगामासाठी दोन्ही कारखान्यांनी ३५०० रूपये ऊस दर जाहीर केल्याने, शेतकरी सभासदांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



आष्टा : थेट नगराध्यक्ष पदाकरीता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज देताना अमोल पडळकर व अन्य.

## आष्ट्यात थेट नगराध्यक्षसाठी अमोल पडळकर यांचा अर्ज दाखल

आष्टा,ता.१४(प्रतिनिधी)-

**आष्टा नगरपालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी थेट नगराध्यक्ष पदाकरिता भाजपाचे अमोल शामराव पडळकर यांनी नगराध्यक्ष पदाचा उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार राज शेखर लिंबारे यांच्याकडे दाखल केला.चौथ्या दिवसअखेर भाजपाकडून थेटसह सहा, सत्ताधारी शहर विकास आघाडीकडून एक अन् अपक्ष दोन असे अर्ज दाखल झाले आहेत.**

लता अमोल पडळकर यांनी प्रभाग क्रमांक दहा ब मधून,तेजश्री अभिजीत बिरनाळे यांनी प्रभाग क्रमांक सहा अ मधून, स्वप्ना वाडेकर प्रभाग १२, अमोल पडळकर प्रभाग दहामधून अर्ज दाखल केले. तर सत्ताधारी शहर विकास आघाडीकडून अलका सुरेश वारे यांनी तर प्रभाग सहामधून राहुल थोटे, प्रभाग ३ मधून प्रमोद वाघमारे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले.अमोल पडळकर हे आष्टा नगरपालिकेचे माजी नगरसेवक तसेच भारतीय जनता पार्टी वाळवा तालुका मंडल अध्यक्ष आहेत. यावेळी रयत क्रांतीचे शहराध्यक्ष सुदर्शन वाडकर, भाजपाचे आष्टा शहराध्यक्ष नरेंद्र घाटगे,युवा मोर्चा अध्यक्ष अभिजीत बिरनाळे उपस्थित होते.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात 'चंदा' वाघीण दाखल

चांदोली,ता.१४(वार्ताहर)-

**सह्याद्रीच्या पश्चिम घाटात वाघांची संख्या वाढविण्याच्या हेतूने ताडोबा येथील अंधारी या प्रकल्पातील 'चंदा' या वाघिणीला गुरुवारी मध्यरात्री सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या चांदोली रेंजमधील सोनार्ली येथे सोडण्यात आले.**

पर्यावरण मंत्रालयाने दोन महिन्यापुर्वी स्थलांतरास परवानगी दिल्यानंतर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ताडोबाच्या बफर क्षेत्रातील 'चंदा'नावाच्या वाघिणीला पकडले व या वनविभागाच्या पथकाने सुमारे ८५० किलोमिटरचा प्रवास करत गुरुवारी मध्यरात्री तिला सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील चांदोली वन हद्दीतील सोनार्ली गावाजवळ आरक्षित कंपाऊंड केलेल्या क्षेत्रात सोडण्यात आले आहे.

लवकरच तिला हवामानाचा व तिच्या प्रकृतीचा अंदाज घेऊन सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात मुक्त करण्यात येणार असून वन विभागाकडून तिच्या सुरक्षेची खबरदारी घेत या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे,पाण्याचे स्तोत्र व खाद्य यांचा पुरेसा साठा उपलब्ध केला आहे. भविष्यात वाघाची संख्या वाढणार असल्याने चांदोली परिसरातील पर्यटनात वाढ होणार असल्याचे निश्चित आहे.

## सातारा ते पांगारे बस सेवेला अखेर प्रारंभ

सातारा,ता.१४(प्रतिनिधी)-

**सातारा तालुक्यातील दुर्गम, डोंगराळ भागातील पांगारे गाव एसटी महामंडळाच्या बस सेवेपासून गेली ७० वर्ष वंचित होते. सातारा ते पांगारे बस सेवा सुरु करण्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा पाठपुरावा यशस्वी झाला असून अखेर ७० वर्षांची प्रतीक्षा संपली आणि सातारा ते पांगारे एसटी धावली! यामुळे या मार्गावरील प्रवाशांची मोठी गैरसोय दूर झाली असून ग्रामस्थांनी ना. शिवेंद्रसिंहराजे यांचे आभार मानले.**



सातारा ते पांगारे बससेवेच्या शुभारंभप्रसंगी ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ.

पांगारे व परिसरातील इतर गावांना बससेवा मिळावी, सातारा ते पांगारे मार्गावरील डबेवाडी, अंबवडे खुर्द, भोंदवडे, पोगरवाडी, सोनवडी,गजवडी, बोरणे, सज्जनगड, ज्ञानश्री कॉलेजमार्गे पांगारे अशी बससेवा सुरु व्हावी यासाठी राजू भोसले,कर्तव्य सखी मंचच्या अध्यक्षा सौ.अश्विनी शेळके व ग्रामस्थांनी ना. शिवेंद्रसिंहराजे, कर्तव्य सोशल ग्रुपच्या अध्यक्षा सौ. वेदांतिकाराजे भोसले यांच्याकडे पाठपुरावा केला.ग्रामस्थांच्या मागणीनुसार त्यांची गैरसोय दूर

**प्रवाशांची गैरसोय दूर**

करण्यासाठी ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी काही दिवसांपूर्वी एसटी महामंडळाच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून बससेवा सुरु करण्यामध्ये येणारे अडथळे दूर केले.ना.शिवेंद्रसिंहराजे यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असून आज ही बससेवा सुरु झाली. पांगारे येथे पहिल्यांदाच आलेल्या बसचे गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,ग्रामस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी सौ. अश्विनी शेळके यांच्या हस्ते बसचे पूजन करण्यात आले.

## चांदोली परिसरात थंडीमध्ये वाढ ; शेकोट्या पेटू लागल्या

चांदोली,ता.१४(वार्ताहर)-

**गेल्या काही दिवसांपासून वातावरणात कमालीचा बदल जाणवत असून नोव्हेंबर महिन्यात थंडी सुरु झाल्याने अनेक ठिकाणी शेकोट्या पेटू लागल्या आहेत तसेच सकाळच्या प्रहरी रस्ते धुक्यामध्ये हरवून जात आहेत.**



शिराळा तालुक्याच्या पश्चिम विभागातील चांदोली परिसरात तापमानात कमालीची घट झाली असून पहाटेच्यावेळी चांदोली परिसरात दाट धुके पडत आहे त्यामुळे कडाक्याच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे खरेदीकडे कल वाढत आहे. दरम्यान, कडाक्याच्या थंडीमुळे पहाटे फिरायला जाणाऱ्यांचीही संख्या घटली आहे.तर काही हौशी मंडळी दाट धुक्याचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी पहाटे घराबाहेर पडत आहेत.

## म्हैसाळमध्ये पालकमंत्री सेवा सुविधा शिबीर संपन्न

मिरज,ता.१४(प्रतिनिधी)-

**पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित, सांगली, मिरज, कुपवाड भागात २० पेक्षा अधिक शिबिरांचे आयोजन करण्यात आले. तीन हजारपेक्षा अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. हजारपेक्षा अधिक लोकांनी आरोग्य सेवा सुविधा उपक्रमाचा फायदा घेतला.**




सेवा सुविधा शिबिराचे उद्घाटन भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष स्वाती खाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

पालकमंत्री कार्यालयाद्वारे योजना साक्षरता शिबीर व पालकमंत्री सेवा सुविधा शिबिराचे आयोजन आ. सुरेश खाडे यांच्या नेतृत्वाखाली म्हैसाळ देवल कॉलनी येथे करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष स्वाती खाडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा.डॉ.बी.बी.पाटील, मेघराज शिंदे,संग्गाप्पा सनबे, एस.बी. पाटील, एन.डी.पाटील, विशाल पाटील, श्रीशैल्य कोठीवाले,आर.डी. कांबळे, बापूसाहेब पाटील, शिवतेज घोरपडे, नेमिनाथ चौंडाज, रमेश पाटील, प्रा. पोतदार, प्रा.आर.जे. पाटील, दिनेश मोहिते यांच्यासह कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

**मोफत विविध सुविधा**

पालकमंत्री कार्यालय आयोजित शिबीर अंतर्गत आयुष्मान भारत योजना नोंदणी, नवीन मतदार ओळखपत्र, पदवीधर नोंदणी, ई श्रम कार्ड नोंदणी, नवीन आधार कार्ड अथवा दुरुस्ती, नवीन पॅन कार्ड अथवा दुरुस्ती, उद्यम आधार नोंदणी, बांधकाम कामगार कार्ड नोंदणी, बांधकाम कामगारांचे साहित्य वाटप इत्यादी सर्व नोंदणी मोफत देण्यात आल्या. ६७४ पेक्षा अधिक ग्रामीण नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला.

## बनवडी रस्त्यावरील खड्ड्यांच्या निषेधार्थ 'रयत'चे अनोखे आंदोलन

कराड,ता.१४(प्रतिनिधी)-

**कराड तालुक्यातील पार्ले - बनवडी मार्गावरील खड्डेमय अवस्थेबद्दल संताप व्यक्त करत रयत क्रांती संघटनेतर्फे या रस्त्याला हार व फुले वाहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. गेल्या चार महिन्यांपासून रस्त्यावरील खड्ड्यांकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याने संघटनेचे सचिन नलवडे यांनी या अनोख्या आंदोलनातून प्रशासनाचे लक्ष वेधले.**

**रस्त्याला हार घालून वाहिली श्रध्दांजली**

यावेळी बोलताना नलवडे यांनी, सात दिवसांत या रस्त्यावरील खड्डे बुजवले नाहीत, तर आम्ही बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या खुर्चीलाच हार घालू, असा इशारा दिला आहे.बनवडी व ओगलेवाडी या उपराज्यमार्गांवरील खड्ड्यांचे साम्राज्य इतके वाढले आहे की, नागरिकांना आता 'रस्त्यात खड्डा शोधायचा की खड्ड्यात रस्ता?'असा प्रश्न पडला आहे. या मार्गावरून दररोज हजारो विद्यार्थी महाविद्यालयाकडे प्रवास करतात, तसेच पार्ले-बनवडी व ओगलेवाडी औद्योगिक वसाहतीमुळे वाहतूक नेहमीच मोठ्या प्रमाणात असते.

अलीकडेच एका महिलेला खड्डा चुकविताना अपघात झाला आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यातील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यासाठी सरकारने चारशे कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असतानाही कराड विभागातील पी.डब्ल्यू.डी. मात्र सुस्त झोपेत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

तसेच खड्ड्यांमुळे उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांच्या घरात व व्यापाऱ्यांच्या दुकानात माती शिरत असल्याने सर्वजण हैराण झाले आहेत. या आंदोलनावेळी,दादासो पाटील, मनोज करांडे, गणेश खापे, राहुल शिवदास, पोपट नलवडे, प्रसाद धोकटे, अस्लम सुतार यांच्यासह विद्यार्थी व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मुंबई येथे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,आ.विश्वजित कदम यांच्या उपस्थितीत प्रमोद इनामदार व गंगाधर तोडकर यांचा काँग्रेस पक्षप्रवेश झाला.

## मिरज येथील इनामदार, तोडकर यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

मिरज,ता.१४(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, प्रदेश कार्यालय, टिळक भवन, मुंबई येथे मिरज तालुका विधानसभा क्षेत्र राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे माजी अध्यक्ष प्रा. प्रमोद इनामदार व कार्याध्यक्ष गंगाधर तोडकर यांचा राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश झाला.**

याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,खा.चंद्रकांत हांडोरे, खा. प्रतिभा धानोरकर, आ. विजय वडेट्टीवार, माजी मंत्री आ. विश्वजीत कदम,आ.सतेज उर्फ बंटी पाटील,आ. अमित देशमुख, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी आमदार विक्रम सावंत यांच्या उपस्थितीत प्रमोद इनामदार व गंगाधर तोडकर यांचा काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश झाला.

## श्रीनिवास डुबल यांची माथाडी बोर्डावर निवड

कराड ,ता.१४(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ च्या कलम ६ अंतर्गत सदस्य मंडळ स्थापन करण्यात आले आहे.**

किल्ले सदाशिवगड (ता. कराड) येथील श्रीनिवास डुबल यांची या मंडळाच्या अशासकीय सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.श्रीनिवास डुबल-इनामदार हे कराड रेल्वे स्टेशन मालधक्क्यावर वाहतूक कॉन्ट्रॅक्टर व हुंडेकरी म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी माजी खा. श्रीनिवास पाटील यांच्यासोबत २ वर्षे रेल्वेचे सल्लागार म्हणून कार्य केले होते. त्या काळात त्यांनी रेल्वे प्रशासन आणि प्रवासी यांच्यातील संवाद अधिक मजबूत केले होते. कराड रेल्वे स्थानक अमृतभारत योजनेत समाविष्ट करण्यासाठी त्यांनी खा.उदयनराजे भोसले यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे रेल्वे मंत्रालयाकडून १२ कोटी ५१ लाख रूपयांचा निधी मंजूर झाला होता.

# मलकापूर पालिकेसाठी १६ उमेदवारांचे अर्ज दाखल

## नगराध्यक्षपदासाठी सुनंदा साठे यांचा एकमेव तर नगरसेवक पदासाठी १५ अर्ज

कराड,ता.१४(प्रतिनिधी)-

**मलकापूर नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण १६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यात नगराध्यक्ष पदासाठी १ व नगरसेवक पदांसाठी १५ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार कल्पना ढवळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कपिल जगताप व ज्ञानदेव साळुंखे यांनी दिली.**

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष आमदार अतुल भोसले यांच्या उपस्थितीत एकूण १६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. विशेष म्हणजे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे खंदे समर्थक, मलकापूरचे माजी उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे यांनी भाजपकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान, त्यांनी अद्याप भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला नसला, तरी त्यांचा भाजपकडून अर्ज भरल्याने त्यांचा प्रवेश निश्चित झाला आहे.अर्ज भरताना त्यांच्यासोबत माजी नगराध्यक्षा नीलम येडगे यांच्यासह त्यांना मानणारे आजी-माजी नगरसेवक, नगरसेविकाही उपस्थित होत्या.



कराड :उमेदवारी अर्ज दाखल करताना मनोहर शिंदे समवेत आ.डॉ.अतुल भोसले, राजेंद्र यादव, नारायण रैनाक व अन्य मान्यवर.

दरम्यान,भारतीय जनता पार्टीकडून नगराध्यक्षपदासाठी सुनंदा तानाजी साठे यांनी, तर नगरसेवक पदासाठी विविध प्रभागांमधून पुढीलप्रमाणे अर्ज दाखल झाले आहेत.

यामध्ये प्रभाग १ : सर्वसाधारण जागेसाठी नितीन (उर्फ नारायण) विष्णुपंत काशीद-पाटील (अपक्ष) व शहाजी आनंदराव पाटील (भाजप), प्रभाग २ : सर्वसाधारण महिला जागेसाठी गीतांजली शहाजी पाटील (भाजप), तर सर्वसाधारण जागेसाठी विक्रम अशोक चव्हाण (भाजप), प्रभाग ३ : सर्वसाधारण महिला जागेसाठी रंजना अशोक पाचुंदकर (भाजप),प्रभाग ४:अनुसूचित जाती जागेसाठी सचिन संपत खैरे (भाजप), तर सर्वसाधारण महिला जागेसाठी कल्पना नारायण रैनाक(भाजप), प्रभाग ५: सर्वसाधारण जागेसाठी मधुकर महादेव शेलार (शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), तसेच तानाजीराव संभाजी देशमुख आणि राजेंद्र प्रल्हाद यादव (भाजप),प्रभाग ७ : सर्वसाधारण जागेसाठी संभाजी मारुती रैनाक (भाजप), प्रभाग ८:अनुसूचित जाती महिला राखीव जागेसाठी गीता नंदकुमार साठे (भाजप), प्रभाग १० : नागरिकांच्या मागास प्रवर्ग जागेसाठी वसीम शब्बीर मुल्ला (भाजप) तसेच प्रभाग ११: सर्वसाधारण महिला जागेसाठी राजश्री नितीन जगताप,तर सर्वसाधारण जागेसाठी मनोहर भास्करराव शिंदे (दोघेही भाजप) यांनी आपले उदेम्वारी अर्ज दाखल केले.



आष्टा डॉक्टर्स असोसिएशनकडून एक लाख रुपयांचा धनादेश देताना डॉ.राहुल आवटी व मान्यवर.

## डॉक्टर्स असोसिएशनकडून आष्टा जायंट्स ग्रुपला आर्थिक मदत

आष्टा,ता.१४(प्रतिनिधी)-

**येथील आष्टा डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जायंट्स ग्रुप ऑफ आष्टा या सामाजिक संस्थेला समाज कार्यासाठी एक लाख मदतीचा धनादेश देण्यात आला.**

आष्टा डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.राहुल आवटी, डॉ.सुनील मस्के यांच्या हस्ते डॉ.मनोहर कबाडे,महावीर थोटे यांच्याकडे मदतीचा धनादेश सुपूर्त करण्यात आला.डॉ.राहुल आवटी म्हणाले, ज्येष्ठ धन्वंतरी डॉ. मनोहर कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टा व पंचक्रोशीत जायंट्स ग्रुपने सामाजिक बांधिलकी जपली आहे.अनेक सामाजिक उपक्रम राबवून नागरिकांना आधार दिला आहे. आरोग्य शिबिरातून नागरिकांना सुविधा दिल्या आहेत. सेवाभावीवृत्तीने सुरु असलेल्या जायंटस ग्रुपला समाज कार्यासाठी डॉक्टर्स असोसिएशनकडून मदतीचा हात देताना समाधान आहे. यावेळी डॉ.धवल मालगावे,डॉ.अनिल निर्मळे ,डॉ.दीपक लिगाडे, डॉ.अभय झीनगे, डॉ.निवास गावडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## या राशीचे पती-पत्नी म्हणजे लक्ष्मी नारायणाचा जोडा

असं म्हणतात की, जोड्या स्वर्गात बनतात. लग्न संस्थेला हिंदू धर्मात मोठं महत्व आहे. लग्न म्हणजे फक्त दोन व्यक्तींचं नाही तर दोन कुटुंब एकमेकांशी जोडतं. त्यामुळे गोत्र, जन्मपत्रिका, गुणमिलन , कुळ या सगळ्याचा विचार केला जातो. लग्न ठरवताना ज्योतिषशास्त्रात असं म्हटलं जातं की प्रत्येक रास ही इतर राशींच्या मित्र राशी आँणि आहेत त्याचप्रमाणे शत्रराशी देखील आहेत. म्हणूनच कोणत्या राशीच्या व्यक्तीने कोणत्या राशीचा जोडीदार निवडावा याबाबतची माहिती ज्योतिषशास्त्रात सांगितलेली आहे.

काही राशींच्या जोड्या इतक्या समरस आणि परिपूर्ण मानल्या जातात की त्यांचं नातं केवळ पती पत्नीचं नाही तर मित्र मैत्रिणीप्रमाणेच ते एकमेकांशी विश्वासाने राहतात. अशा राशी आहेत ज्यांच्या जोड्या सामान्यतः स्वर्गात जुळलेल्याअसतात असं म्हटलं जातं.

मेष

मेषेची मंडळी ही अत्यंत धाडसी आणि शिस्तप्रिय स्वभावाची असतात. या मंडळींना सिंह आणि धनू राशीचा जोडीदार परिपूर्ण आहे, असं ज्योतिषशास्त्र सांगतं. सिंह आणि धनू या राशीची माणसं देखील स्पष्टवक्ते असतात ही मंडळी देखील समोरच्याला आदर आणि सन्मान देतात त्यामुळे मेषेच्या माणसांचं या राशीच्या व्यक्तींशी चांगलं जमतं.

वृषभ

वृषभेची माणसं शुक्राच्या अधिपत्याखाली येतात. त्यामुळे ही माणसं मनमिळावू निष्ठावान आणि प्रेमळ असातात. त्यामळे कन्या, मकर आणि तळ राशीचे जोडीदार यांना मेड फॉर इच अदर आहेत. कन्या, मकर आणि तूळ या राशीच्या स्थैर्य, निष्ठा आणि व्यवहारिक दृष्टिकोन आहेत . हे दांपत्य शांत, समजूतदार आणि एकमेकांचे आधार बनते.

मिथुन

मिथुन राशीच्या व्यक्तींचं संवाद कौशल्य उत्तम असतं. विचारांची देवाणघेवाण आणि मानसिक जुळवाजुळ ही तूळ आणि कुंभ



राशींच्या मंडळींशी जास्त होते.मिथुन राशीची मंडळी तूळ आणि कुंभच्या लोकांसोबत खूप आनंदात जगतात.

कर्क

या राशीचा स्वामी चंद्र असल्याने ही माणसं प्रचंड भावनाशील असतात. यांना कोणाशीही ओरडून वागणं जमत नाही. या राशीला समजून घेणाऱ्या राशी म्हणजे वृश्चिक आणि मीन. कर्क राशीशी या दोन्ही राशींचा भावनिक बंध मजबूत आहे. त्यामुळे संसार करताना ही माणसं आपल्या जोडीदाराला जास्त सांभाळून घेतात.

सिंह

सिंह राशीची माणसं जोडीदाराप्रती निष्ठावान असतात. या माणसांना मेष आणि धनू राशीचा जोडीदार योग्य ठरतो. या दोन्ही राशीची मंडळी सिंह राशीच्या जोडीदाराला खूप चांगलं समजून घेतात.

कन्या

कन्या राशीची मंडळी मनाने प्रेमळ असतात. या राशीच्या मंडळींना वृषभ आणि मकर राशीचे जोडीदार खूप चांगलं सांभाळून घेतात.

तूळ

ही माणसं व्यक्तीमत्वाने समतोल, संवादप्रिय आणि आकर्षक असतात. कोणतंही नातं ही माणसं जबाबदारीने आणि मनापासून निभावतात.या राशीची मंडळी जोडीदाराशी मित्रासारखं वागतात. तुळ राशीच्या मंडळींना मकर , कुंभ आणि वृषभ राशीचे जोडीदार कायम साथ देतात.

वृश्चिक

कर्क आणि मीन राशीच्या मंडळींशी वृश्चिक राशीचं चांगलं जमतं. त्याचबरोबर वृश्चिकची माणसं निष्ठावान आणि प्रेमळ स्वभावाची असतात. एकमेकांसाठी प्रेम काळजी आणि आपुलकी .या मंडळींना असते.

धनू

साहसी, मुक्त आणि सकारात्मक जोड. प्रेमाच्या नात्यात धनू राशीची मंडळी साहसी, मुक्त आणि सकारात्मक जगण्याचा कल ठेवतात. ही माणसं प्रेमाच्या माणसांबरोबर आयुष्य आनंदाने आणि आत्मविश्वासाने जगतात.मेष आणि सिंह राशीची माणसं यांचे चांगले जोडीदार ठरतात.

मकर

जबाबदार, परिश्रमी आणि दीर्घकालीन नातं टिकवणारी माणसं म्हणजे मकर राशीची.यांना वृषभ आणि कन्या राशीचा जोडीदार अनुकूल ठरतो. हे दांपत्य लक्ष्मी-नारायणासारखं स्थिर आणि समृद्ध मानलं जातं.

कुंभ

विचारशील, आणि मानसिकरित्या स्थिर असलेली माणसं म्हणजे कुंभ राशीची. यांना समजून घेणारी विवेकशील माणसं म्हणजे तूळ आणि मिथुन राशीची.

मीन

कर्क आणि वृश्चिक राशीचं मीन राशीशी खूप चांगलं पटतं. या जोड्यांचे बंध खरोखर स्वर्गात जुळलेले असतात.



## नोव्हेंबरमध्ये मासिक शिवरात्री कधी आहे?


ज्योतिषशास्त्रानुसार नोव्हेंबरमधील मासिक शिवरात्र यावेळी मंगळवार,१८ नोव्हेंबर रोजी आहे.ही मार्गशीर्ष महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्दशी तिथीला येते.या दिवशी दोन शुभ योग तयार होत आहे. शिवरात्रीच्या दिवशी तुम्ही दिवसभरात कधीही पूजा करु शकता.यावेळी निशिता पूजा मुहूर्ताचे विशेष महत्त्व आहे.या पूजेच्या वेळी मंत्रांचा जप करावा.उपवास करुन योग्य विधींनी महादेवांची पूजा करावी. शिवाच्या आशीर्वादाने तुमचे त्रास दूर होतील आणि तुमच्या इच्छा पूर्ण होतील.नोव्हेंबर महिन्यात मासिक शिवरात्र कधी आहे, शुभ योग आणि महत्त्व जाणून घ्या.

पंचांगानुसार, मार्गशीर्ष महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्दशी तिथी मंगळवार,१८ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.१२ वाजता सुरू होणार आहे. या तिथीची समाप्ती १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.४३ वाजता संपणार आहे. मासिक शिवरात्रीला देवतेची पूजा करण्यासाठी रात्रीचा काळ हा सर्वोत्तम मानला जातो,म्हणून मासिक शिवरात्री १८ नोव्हेंबर रोजी साजरी केली जाणार आहे.

मासिक शिवरात्रीच्या पूजेचा शुभ मुहूर्त रात्री ११.४२ वाजता सुरू होणार आहे आणि १२.३६ वाजता संपेल. यावेळी दोन शुभ योग देखील तयार होत आहे. पहिला आयुष्मान योग आहे आणि दुसरा सौभाग्य योग आहे. या दिवशी आयष्मान योग पहाटेपासून सकाळी ८.९ वाजेपर्यंत असेल. त्यानंतर सौभाग्य योग असेल. आयष्मान योगात पूजा केल्याने तुमचे आरोग्य आणि दीर्घायुष्य वाढेल, तर सौभाग्य योगात शिवाची पूजा केल्याने तुमचे भाग्य वाढेल. त्या दिवशी स्वाती नक्षत्र सकाळपासून पूर्ण रात्रीपर्यंत असते.

मासिक शिवरात्रीच्या दिवशी सकाळी लवकर उठून आवरुन झाल्यानंतर स्वच्छ कपडे परिधान करा. त्यानंतर, तुमच्या घरातील देव्हारा स्वच्छ करा. त्यानंतर महादेव आणि देवी पार्वती यांच्या मूर्ती किंवा चित्राची स्थापना करा. नंतर शिवलिंगावर पाणी आणि दुधाने अभिषेक करा. भगवान शिवाला बेलाची पाने, भांग, धतुरा, अखंड तांदळाचे दाणे, फुले आणि चंदनाचा लेप अर्पण करा. यानंतर, शिव चालीसा पाठ करा आणि महामृत्युंजय मंत्राचा जप करा. भगवान शिवाची आरती करा आणि तुमच्या इच्छा पूर्ण होण्यासाठी प्रार्थना करा.

मासिक शिवरात्रीला भगवान शिव आणि देवी पार्वतीची पूजा केल्याने आणि उपवास केल्याने जीवनात आनंद आणि समृद्धी येते. शिवाय, हे व्रत पाळल्याने पापांपासून मुक्ती मिळते. या दिवशी उपवास केल्याने वैवाहिक जीवनातील समस्याही संपतात आणि एक चांगला जीवनसाथी मिळतो, अशी मान्यता आहे.



## वृश्चिक संक्रांतीच्या दिवशी या वस्तूंचे करा दान, सूर्य देवाचा राहील आशीर्वाद

ज्योतिषशास्त्रात सूर्याला ग्रहांचा राजा मानले जाते. तो प्रत्येक राशीतून एक महिना संक्रमण करतो. अशा वेळी सूर्याला सर्व राशीमधून संक्रमण करण्यासाठी एक वर्ष लागते. ज्यावेळी सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीमध्ये प्रवेश करतो तो दिवस संक्रांत म्हणून साजरा केला जातो.वृश्चिक राशीची संक्रांत रविवार,१६ नोव्हेंबर रोजी साजरी केली जाणार आहे.

कारण या दिवशी सूर्य तूळ राशी सोडून मंगळ राशीत प्रवेश करेल. या दिवशी सूर्याची पूजा विधीपूर्वक केली जाते आणि परमेश्वराला पाणी अर्पण केले जाते.यामुळे सुख समृद्धी लाभते.या दिवशी स्नान आणि दान करण्याला देखील विशेष महत्त्व आहे.या दिवशी काही वस्तूंचे दान केल्याने सूर्य देवाचा भक्तांवर आशीर्वाद राहतो असे देखील मानले जाते.वृश्चिक संक्रांतीच्या दिवशी कोणत्या वस्तूंचे दान करावे, जाणून घ्या

पंचांगानुसार,१६ नोव्हेंबर रोजी सूर्य तूळ राशी सोडून मंगळाच्या वृश्चिक राशीमध्ये प्रवेश करणार आहे. सूर्याच्या राशी परिवर्तनाच्या या क्षणाला वृश्चिक संक्रांती म्हणतात. यामुळे यावेळी वृश्चिक संक्रांती रविवार,१६ नोव्हेंबर रोजी साजरी केली जाणार आहे.

वृश्चिक संक्रांतीच्या दिवशी पुण्यकाल आणि महापुण्यकालचा काळ स्नान, दान आणि पूजेसाठी सर्वोत्तम आणि पुण्यपूर्ण असतो. वृश्चिक संक्रांती रविवार, १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.२० ते दुपारी १.४५ पर्यंत असणार आहे. त्याचा एकूण कालावधी ५ तास ४३ मिनिटे असणार आहे.या दिवशी वृश्चिक संक्रांतीचा शुभ मुहूर्त सकाळी ११.५८ ते दुपारी १.४५ पर्यंत असेल. त्याचा कालावधी १ तास ४७ मिनिटे असेल. वृश्चिक संक्रांतीचा मुहूर्त दुपारी १.४५ वाजता असेल.

वृश्चिक संक्रांतीच्या दिवशी सूर्याशी संबंधित वस्तूचे दान करणे खूप शुभ मानले जाते.असे मानले जाते की या दिवशी दान केल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात.वृश्चिक संक्रांतीच्या दिवशी स्नान करून सूर्याची प्रार्थना केल्यानंतरच दान करावे.सकाळी लवकर पवित्र नदीत स्नान करावे. पर्यायी,गंगाजल पाण्यात मिसळून देखील स्नान करता येते. वृश्चिक संक्रांतीच्या दिवशी तुम्ही लाल चंदन, फळे, कपडे आणि फुले इत्यादींचे दान करावे. तुमच्या क्षमतेनुसार तुम्ही गरीब आणि गरजूंना गहू, केशर आणि गूळ देखील दान करू शकता. असे केल्याने साधकाला पुण्यफळ मिळते. कुंडलीतील सूर्याची स्थिती देखील बळकट होते. शिवाय, वृश्चिक संक्रांतीच्या दिवशी तीळ दान करणे अत्यंत शुभ मानले जाते. यामुळे साधकाच्या जीवनात सकारात्मक परिणाम मिळतात.

## घराच्या बाल्कनीत किंवा छतावर कबुतरांनी अंडी घालणं शुभ की अशुभ?

शहरांमध्ये अनेकांची तक्रार असते की आमच्याकडे सतत कबुतर येत असतात, काही लोकांना ते खूप घाण करतात म्हणून आवडत नाही, तर काहींना त्यांचा सतत येणारा आवाज यामुळे नकोसे होतात. तर काही ठिकाणी अगदीच या उलट असतं, जसं की काही जण कबुतरांना पाळतात त्यांना धान्य खायला घालतात. पण वास्तुशास्त्रात कबुतराला लक्ष्मी देवीचा भक्त म्हटले जातं.खरतर काहींना वाचायला हे आश्चर्य वाटेल पण कबुतर हे घरातील सुख-शांतीचे प्रतीक आहे असेही काही लोकांचे मत आहे. पण काही लोकांच्या मते घरात कबूतर असणे अशुभ आहे. याबद्दल वास्तुशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र काय म्हणते ते आपण सांगूया.

वास्तू आणि ज्योतिषशास्त्रानुसार, घरात कबूतराचे घरटे अशुभ आहे का? असे म्हटले जाते की कबुतर ज्या ठिकाणी घरटे बांधतात ती जागा नकारात्मक उर्जेने भरलेली असते, ज्यामुळे कुटुंबाच्या सुख-समृद्धीवर नकारात्मक परिणाम होतो. हळूहळू घरातील लोकांचे आरोग्य बिघडू लागते. म्हणून, कबुतर घरटे बांधताच ते काढून टाकावे.



वास्तुशास्त्रानुसार घरात कबूतर असणे शुभ मानले जाते. हे सुख आणि शांतीचे प्रतीक मानले जाते. पण जर तुमच्या घरात कबुतराने घरटे बनवले तर ते वास्तूशास्त्रानुसार अशुभ आहे. हा एका प्रकारचा संकेत आहे की तुमच्या घरात गरिबी येणार आहे. घरात कबुतराचे घरटे असल्यास आर्थिक परिस्थितीवर परिणाम होतो. त्यामुळे घरात कबुतराचे घरटे कधीही नसावेत आणि ते बांधूही देऊ नयेत.

वास्तुशास्त्रानुसार घरामध्ये कबुतराचे घरटे बांधणे अशुभ मानले जाते. यामुळे घरात गरिबी येते आणि पैशाचा ओघ थांबतो. तसेच घरातील लोकांसाठी अशुभ घडते. तुमच्या घरातही कबुतराने घरटे बनवले असेल तर ते लगेच काढून टाका. कारण त्यामुळे घरात समस्या निर्माण होतात. यासोबतच प्रगतीचे मार्गही बंद झाले आहेत.

काही ठिकाणी बाल्कनी किंवा छतावर घरटे बांधणारे कबुतर शुभ चिन्ह मानले जाते. असे म्हटले जाते की देवी लक्ष्मी तुम्हाला आशीर्वाद देत आहे आणि तुमची एक इच्छा लवकरच पूर्ण होईल.

असे म्हटले जाते की,जर कबुतर घरात घरटे बांधत असेल आणि अंडी घालत असेल तर ते ठिकाण पवित्र होते.हे घरात सकारात्मक ऊर्जा वाढत असल्याचे लक्षण आहे. विज्ञानानुसार, कबुतर अनेक रोगांना देखील कारणीभूत ठरू शकतात, म्हणून जर कबुतराने तुमच्या बाल्कनीत घरटे बांधले असेल आणि अंडी घातली असतील तर तुम्ही ते ताबडतोब काढून टाकावे.

धार्मिकदृष्ट्या, कबुतराला इजा करणे किंवा त्याची अंडी फेकून देणे हे पाप मानले जाते. म्हणून, पिल्ले बाहेर आल्यानंतर त्या भागातून कबुतराचे घरटे काढून टाकणे हाच सर्वोत्तम उपाय आहे.

## ऑफिस बॅगमध्ये या साध्या गोष्टी ठेवत असाल तर, आजच व्हा सावध

पुरुषांसोबत ऑफिसला जाणाऱ्या महिलांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढत आहे. महिला आज घर आणि स्वतःचं करियर सांभाळत आहेत. पण असंख्य प्रयत्न करून देखील काही महिलांना यश मिळत नाही. फक्त महिलांसोबतच नाही तर, असं अनेकदा पुरुषांसोबत देखील होते.सर्व कठोर परिश्रम करूनही, यश मिळत नाही. याचं कारण ऑफिसच्या बॅगेतील काही वस्तू असू शकतात.

महिला अनेकदा त्यांच्या बॅगेत लिपस्टिक, मस्कारा किंवा छोटे दागिने ठेवतात. पण, ज्योतिषशास्त्रानसार, या वस्तू शुक्र ग्रहाशी संबंधित आहेत, तर ऑफिसमधील वातावरण बुध आणि मंगळ ग्रहाशी संबंधित मानलं जातं. यामुळे, या वस्तू तुमच्या एकाग्रतेवर आणि निर्णय घेण्याच्या क्षमतेवर परिणाम करू शकतात.

नेल कटर किंवा लहान चाकूबाळगणं ही एक सामान्य गोष्ट वाटू शकतं, परंतु वास्तुनुसार, या वस्तू संधी आणि नातेसंबंध कापण्याचे लक्षण मानले जातात. हे तुमच्या करिअरमध्ये अडथळा आणू शकतात आणि लोकांशी असलेल्या तुमच्या नातेसंबंधांवर परिणाम करू शकतात.

पुरुष अनेकदा त्यांच्या ऑफिस बॅगमध्ये परफ्यूम किंवा डिओडोरंट ठेवतात. दररोज बॅगेत परफ्यूम किंवा डिओडोरंट बाळगल्याने तुमच्या कामात अडथळा येऊ शकतो. या उत्पादनांमध्ये अल्कोहोलचं प्रमाण मानसिक एकाग्रतेला बाधा पोहोचवते. यामुळे ऑफिसमध्ये गांभीर्याचा अभाव निर्माण होतो आणि प्रगती मंदावते.

तुमच्या ऑफिस बॅगेत टूथब्रश, कंगवा किंवा इतर वैयक्तिक स्वच्छतेच्या वस्तू ठेवणं अयोग्य मानलं जातं. वास्तुशास्त्रानुसार, या वस्तू आजूबाजूच्या उर्जेवर परिणाम करतात, ऑफिसमध्ये नकारात्मक वातावरण निर्माण करतात आणि तुमचं लक्ष विचलित करतात.

जर तुम्ही कधीकधी तुमच्या ऑफिस बॅगेत वापरलेले किंवा घाणेरडे कपडे ठेवत असाल तर ही सवय हानिकारक ठरू शकते. वास्तुशास्त्रानुसार, यामुळे नकारात्मक ऊर्जा निर्माण होते, ज्यामुळे थकवा आणि चिडचिड होते. यामुळे तुमची एकाग्रता कमी होते.

जर तुम्हाला कामावर चांगली कामगिरी करायची असेल आणि तुमच्या करिअरमध्ये पुढे जायचे असेल, तर तुमच्या ऑफिस बॅगमधील गोष्टींकडे लक्ष द्या. मग तुम्हाला तुमच्या नोकरीत यश मिळू शकते.



## साप्ताहिक राशीभविष्य

१५ नोव्हेंबर २०२५ ते २१ नोव्हेंबर २०२५

**सहयोग लाभणार आहे**
**मेष** : आपला जोडीदार तसेच परिवारातील व्यक्तींचा सहयोग लाभणार आहे. व्यवसायातील काही कामे महिला कर्मचाऱ्यांच्या मदतीने पूर्ण कराल. आपल्याला मित्रांचा व सहयोगी व्यक्तींचा पूर्ण सहकार लाभणार आहे. व्यापार, व्यवसायांमध्ये आपले वडील किंवा ज्येष्ठ व्यक्ती यांच्या सल्लयाचा फायदा होणार आहे. भागीदारीच्या व्यवसायात भागीदाराचे म्हणणे पूर्णपणे ऐकून घेऊन, त्यावर निर्णय घ्या, फायद्यात राहाल. व्यापार, व्यवसायांमध्ये नवीन करारमदार करताना आपण सतर्क असावे.या कालावधीमध्ये शत्रू पूर्णपणे नामोहरम होणार आहे.स्पर्धकांवर मात कराल.

**चांगला समन्वय असेल**
**वृषभ** : आपल्या भावनांवर संयम ठेवा.कोणताही निर्णय घेताना भावनाशील होऊ नका. प्रत्यक्षातील वस्तुस्थिती आकलन महत्त्वाचे ठरेल. कोणतेही असे कार्य करू नका की,तुम्ही स्वतःअडचणीत याल. प्रेमिकांसाठी चांगला कालावधी.सरकारी कामे करणाऱ्यांसाठी महत्त्वाची कामे सोपवली जातील. मात्र या कालावधीमध्ये महिलांसोबत काम करताना सावधगिरी बाळगा.सप्ताहाच्या मध्यावधी काळामध्ये संततीची काळजी घेणे आवश्यक आहे.दाम्पत्य जीवनासाठी हा कालावधी चांगला आहे. कुटुंबातील सदस्य एकमेकांना सहयोग करतील, त्यांच्यामध्ये चांगला समन्वय असेल.

**सहकार्य मिळेल**
**मिथुन** : टेक्निकल गोष्टीमध्ये काम करणाऱ्यांना अतिशय उत्तम कालावधी आहे. त्यांना आपल्या क्षेत्रामध्ये उत्तम यश मिळणार आहे. कुटुंबाच्या दृष्टिकोनातून घरांमध्ये पाहुण्यांची ये-जा राहील. मलांच्या फर्माईशी पूर्ण करण्यामध्ये आपला जोडीदार व्यस्त राहील. नोकरी-व्यवसाय करणाऱ्या महिलांचा सन्मान होईल. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले यश मिळेल. सप्ताहाच्या अखेरीस आपणास नवीन कॉन्ट्रॅक्ट मिळण्याची शक्यता आहे; पण नवीन कामे विचारपर्वक घ्या. शेअर मार्केट विचारपर्वकच गुंतवणूक करणे आवश्यक आहे. शिक्षणाचे मार्ग खुले होतील. गुरुजनांचे सहकार्य मिळेल.

**वाद-विवाद टाळणे महत्त्वाचे**
**कर्क** : घरातील वातावरण बिघडणार नाही, याची काळजी आपण घ्या. कुटुंबातील सदस्यांशी लहान-मोठ्या कारणांवरून जाणीवपर्वक वाद-विवाद टाळणे महत्त्वाचे ठरेल. विद्यार्थ्यांचे लक्ष अभ्यासात असेल; पण ज्यांना स्पर्धा परीक्षा द्यावयाची आहे, त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. शेवटच्या क्षणापर्यंत परीक्षेची तारीख पुढे जाऊ शकते किंवा स्वतः तरी आजारी पडू शकता. सरकारी कामे पूर्ण करण्यासाठी कोणत्या तरी मोठ्या अधिकारी व्यक्तीची ओळख असण्याची आवश्यकता भासणार आहे. व्यावसायिक जुनी येणी वसूल होतील.

**मार्ग प्रशस्त होतील**
**सिंह** : शिक्षणासाठी हा कालावधी आपणास चांगला आहे. नवीन कुठला तरी छोटा कोर्स पूर्ण करण्याकडे आपले लक्ष राहील. कोणत्याही टेक्निकल साइडमध्ये आपल्याला विशेष यश मिळेल. मात्र कोणत्याही कारणास्तव आळस करू नका. जास्त कष्ट आपणास यश देणारे आहे. विद्यार्थी वर्गाला आपण घेतलेल्या कष्टाचे फळ मिळेल. अपेक्षित यश मिळन उच्च शिक्षणाचे मार्ग प्रशस्त होतील. कुटुंब परिवारातून मदत मिळेल. तसेच गुरुजनांचे आशीर्वाद मिळतील. शैक्षणिक भाग्योदय होईल. परदेशगमनाची शक्यता. कार्यक्षेत्रात वरिष्ठांची मर्जी राहील.

**यश येणार आहे**
**कन्या** : आपल्या कार्यक्षेत्रात आपल्याला यश येणार आहे. आपल्या कार्यक्षेत्रात आपण पूर्वी केलेले नियोजन प्रत्यक्षात उतरताना पाहून आनंद होईल. नवीन संकल्पना तसेच नवीन तंत्रज्ञान वापरून, आपला व्यवसाय विशिष्ट जागेवर नेऊन ठेवण्यात यशस्वी व्हाल. स्पर्धकांवर मात कराल. पद आणि प्रतिष्ठा याच्यामध्ये वृद्धी होईल. काही जुनी थांबलेली कामे परत सरू होतील. आपल्याला जर काही गुंतवणूक सोन्यामध्ये केलेली चांगली ठरेल. आर्थिक आलेख उंचावेल.

**कुसंगत टाळा**
**तूळ** : रोजच्या कामासह इतर कामांमध्ये जास्तीचा लोड वाढणार आहे. त्या प्रमाणात आपली एनर्जी लेव्हल कमी वाटणार आहे. आपण परिस्थितीशी सामना करण्यासाठी खूप प्रयत्न कराल; पण समाधान आपणास कमीच वाटेल. सप्ताहाच्या मध्यावधीमध्ये आपणास आत्मविश्वास कमी असल्याचे भासेल; पण आपण आत्मविश्वासाने कामे करावीत. आर्थिक गुंतवणूक करताना खूप सावधानता पाळली पाहिजे. विद्यार्थ्यांना हा कालावधी खूप महत्त्वपूर्ण आहे. कठीण परिस्थितीमध्ये आपण यश संपादन कराल. मात्र वेळेचे नियोजन करणे क्रमप्राप्त ठरेल. तसेच कुसंगत टाळा.

**यश खेचून आणाल**
**वृश्चिक** : आपल्या आजूबाजूला अनुकूल वातावरण असेल. बरेच दिवस एखादे महत्त्वाचे काम होण्याची आपण वाट बघत होता. ते काम मार्गी लागल्यामुळे आपल्या उत्साहात व आनंदात भर पडेल. आपल्या समोरील कामे आपण वेगाने कराल. आपण आपल्या कार्यक्षेत्रामध्ये खूपच उत्साही राहाल. आपल्यामध्ये उच्च प्रतीचा उत्साह असल्यामुळे, कुठल्याही परिस्थितीशी सामना करण्यास तयार असणार आहात. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये आपण यश खेचून आणाल. अतिआत्मविश्वास टाळणे महत्त्वाचे ठरेल.

**विवाह ठरतील**
**धनु** : कुटुंब परिवारातील विवाहयोग्य तरुण-तरुणींचे विवाह ठरतील. ज्यांचे विवाह करण्यामध्ये अडचणी येत होत्या, अशा अडचणी दूर होऊन, त्यांचे विवाह ठरतील. विवाहविषयक बोलणी यशस्वी ठरतील. काहींचे परिचयोत्तर विवाह ठरतील. विवाहित व्यक्तींचे वैवाहिक जीवन सुख-शांतीपर्वक चालेल. मात्र आपल्या संततीविषयी काही प्रकृतीचे प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामळे संततीच्या भविष्याविषयी आपण चिंतीत असाल. गर्भवती स्त्रियांनी काळजी घेणे.

**प्रलोभने टाळा**
**मकर** : आपण जर सरकारी क्षेत्रात काम करत असाल, तर या कालावधीमध्ये आपल्याला अपेक्षित सफलता मिळणार आहे. पदोन्नती अथवा वेतन वृद्धी मिळेल. आपल्या कार्यकक्षेत वृद्धी होईल. तसेच जबाबदाऱ्याही वाढतील. आपली कार्य आपण आपल्या कार्यकक्षेमध्ये पूर्ण करणे महत्त्वाचे ठरेल. लहान-मोठी प्रलोभने टाळा, फायद्यात राहाल. फायनान्स आणि रियल इस्टेट क्षेत्रामध्ये आपण काम करत असाल, तरी सुद्धा आपणास चांगले परिणाम मिळणार आहेत. चांगले आर्थिक उत्पन्न मिळणार आहे.

**धनप्राप्ती होऊ शकते**
**कुंभ** : आर्थिकदृष्ट्या हा कालावधी आपणासाठी अतिउत्तम आहे. आपणास एकापेक्षा जास्त ठिकाणाहून धनप्राप्ती होऊ शकते. टेक्नॉलॉजी, मीडिया, सोशल मीडिया अशा माध्यमातून आपणाला धनप्राप्ती होऊ शकते. नोकरी करणाऱ्या व्यक्तींना महिला सहकार्याकडून सहकार्य मिळणार आहे. त्यामळे आपण जास्तीची अर्थप्राप्ती करू शकता. एकमेकांच्या सहकार्यामळे आपण पढे जाऊ शकता. विद्यार्थ्यांचे अभ्यासामध्ये पर्ण लक्ष केंद्रित असेल. उच्च शिक्षणाचे मार्ग प्रशस्त होतील. शिष्यवृत्तीचे स्वप्न साकार होऊ शकते.

**बढतीचे योग**
**मीन** : बुद्धिजीवी जातकांना तसेच साहित्य क्षेत्रातील मंडळींना व नोकरी करणाऱ्यांना सदरील सप्ताह अविस्मरणीय ठरू शकतो. उच्च व प्रतिष्ठित लोकांच्या गाठीभेटी होण्याची शक्यता आहे. त्यांची ओळख पुढे वाढणार आहे, त्याचा उपयोग आपणास लाभप्रद होणार आहे. जे जातक बेकार आहे, त्यांना नोकरी मिळेल. जे जातक नोकरी करत आहे, त्यांना बढतीचे योग आहेत. आपण जर कुठली जमीन खरेदी किंवा विक्रीसाठी विचार करत असाल, तर ते आपणासाठी लाभदायक आहे. पण त्यामध्ये थोडासा ताणतणाव निर्माण होण्याची शक्यता आहे, तरीही यश मिळेल. विवाहासाठी सुद्धा हा कालावधी चांगला आहे.

# महावितरणला सर्वोच्च न्यायालयाचा झटका

## वीज नियामक आयोगाच्या निकालास स्थगिती देण्यास नकार

इचलकरंजी,ता.१४–

**वीज नियामक आयोगाने दिलेल्या वीज दरवाढीच्या तसेच स्थिर आकार व वीज वापराच्या वेळेतील बदलाच्या निकालास स्थगिती मिळणेबाबत महावितरण कंपनीने केलेला अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे. महावितरण कंपनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालास स्थगिती मिळवण्यात अपयशी ठरल्यामुळे दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनतर्फे १ जुलै २०२५ पासून वाढलेले दर व त्यावरील सर्व कर परत मिळणेसंदर्भातील याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पॉवरलूम असोशिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

ते म्हणाले, नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने वीज नियामक आयोगाने दिलेल्या वीज दरवाढीसह स्थिर आकार व वीज वापर वेळेतील बदलाचा निकाल रद्दबातल ठरवला. या निर्णयाविरोधात महावितरणने सर्वोच्च न्यायालयात स्थगितीसाठी दाखल केलेला अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे. महावितरणने पंचवार्षिक वीज दर ठरविणेसाठी वीज नियामक आयोगासमोर दाखल अर्जास सर्वच औद्योगिक व ग्राहक संघटनांचा विरोध व महावितरणच्या आर्थिक नियोजनाबाबत सविस्तर मांडणीमुळे २८ मार्च २०२५ रोजी ग्राहकांच्या बाजूने ५ ते १५ टक्के कमी दराचा निकाल आयोगाने दिला होता. त्याला २ एप्रिल रोजी महावितरण कंपनीने स्थगिती मागितली. त्याला ग्राहक व औद्योगिक संघटनांचे म्हणणे ऐकून न घेता आयोगाकडून एकतर्फी स्थगिती देण्यात आली.

त्यानंतर जाहीर सुनावणी न घेता किंवा संकेतस्थळावर महावितरणची नविन याचिका सादर न करता केवळ महावितरणचे म्हणणे ऐकूण घेत २५ जून २०२५ रोजी आयोगाने विरूद्ध निकाल दिला. या निकालास महाराष्ट्रातील औद्योगिक, ग्राहक व सौर ऊर्जा संघटना यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिल्याने उच्च न्यायालयाने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोगाचा २५ जूनचा निकाल रद्दबातल ठरवत महावितरणला वीज नियामक अयोगासमोर रितसर विभागवार जाहीर सुनावणी घेण्याचे आदेश दिलेले होते. महाराष्ट्रातील औद्योगिक व ग्राहक संघटना मिळून या सुनावणीमध्ये उच्च कौन्सिल वकील देऊन त्या सुनावणीस एकत्रित प्रतिवाद करण्याचे ठरविले आहे. वीज नियामक आयोगाने प्रथम दिलेला दर निश्चितीचा निकाल कायम होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. तोपर्यंत १ जुलै २०२५ पासून भरलेले वाढीव वीज दर व त्यावरील कर परत देण्यासंदर्भात याचिका दाखल केली जाणार आहे. वीज नियामक आयोग कायदा १९९८ नुसार ग्राहक व औद्योगिक संघटनांचे १५ प्रतिनिधी नेमण्याचा कायदा अस्तित्वात असताना २०१६ पासून असे प्रतिनिधी नेमणे बंद करण्यात आले आहे. त्यामुळे आयोगासमोर सुनावणीस येणाऱ्या विषयांची माहिती ग्राहक संघटनांना होत नसल्याने त्याचा गैरफायदा घेऊन २५ जून रोजी एकतर्फी निकाल लावण्यात आला. याबाबत इचलकरंजी पॉवरलूम असोसिएशनने मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांच्याकडे वीज नियामक आयोगावर १५ ग्राहक प्रतिनिधींची नियुक्ती पुन्हा करण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन देण्यात आल्याचे पाटील यांनी सांगितले.यावेळी उपाध्यक्ष रफिक खानापुरे, सतिश कोष्टी, किरण पोवार, सोमा वाळकुंजे, हरिहर होगाडे आदी उपस्थित होते.

# उमेदवारी गुलदस्त्यात,इच्छुक संभ्रमात!

## अर्ज भरण्यास दोन दिवसांचा अवधी; मोठे पक्ष शांत, इच्छुकांत धाकधूक

हुपरी,ता. १४(वार्ताहर)–

**हुपरी नगरपरिषद निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेत शुक्रवारी पाचवा दिवस असूनही मोठ्या राजकीय पक्षांनी आपले उमेदवार अद्याप जाहीर केलेले नाहीत. केवळ दोनच दिवस अर्ज भरण्यासाठी शिल्लक राहिल्याने, इच्छुक उमेदवारांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.**

आज पाचव्या दिवशी प्रभाग क्रमांक दोन मधून विठ्ठल पाटील या अपक्ष उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज दाखल करत निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे. मोठ्या पक्षांच्या घोषणेची वाट न पाहता त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) या दोन्ही गटांचे उमेदवार निश्चित झाले असून, त्यांची केवळ औपचारिक घोषणा बाकी असल्याचे समजते. दोन्ही गट योग्य वेळेची वाट पाहत असल्याचे चित्र आहे.

महाविकास आघाडी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), मनसे, स्वाभिमानी शेतकरी संघटना यांची अजूनही काँग्रेससोबत जागावाटपाची बोलणी सुरू आहे. त्यामुळे त्यांच्या उमेदवारांची घोषणाही रखडली आहे. शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या दोन्ही पक्षांनी ही निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी केली असून, त्यांच्याही उमेदवारांची यादी अद्याप गुलदस्त्यात आहे. या सर्व राजकीय घडामोडींमुळे, अर्ज दाखल करण्याची मुदत जवळ येत असतानाही प्रमुख पक्षांकडून कोणतीही स्पष्टता मिळत नसल्याने, हुपरीतील निवडणूक उत्कंठावर्धक व अनिश्चिततेच्या वळणावर येऊन ठेपली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे दोन दिवस उरले असल्याने राजकीय पक्षांची रणनीती काय असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



पुरवठा कार्यालयात ठिय्या आंदोलन करताना घेतलेले छायाचित्र. (छाया. मयूर चिंदे)

# पुरवठा कार्यालयात ठिय्या आंदोलन

इचलकरंजी,ता.१४–

**आम. राहुल आवाडे यांच्या पाठपुराव्यातून इचलकरंजीतील पुरवठा कार्यालयासाठी आवश्यक इष्टांक मंजूरी मिळाली असतानाही पात्र लाभार्थ्यांना रेशनचा लाभ मिळत नसल्याचा आरोप करत माजी नगरसेवक राजू बोंद्रे, नितेश पोवार आणि सतीश मुळीक यांच्या नेतृत्वाखाली पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.**

जवाहरनगर परिसरातील ११७ तर गणपती कट्टा परिसरातील ५५ रेशनकार्डधारकांना मागील अनेक महिन्यांपासून धान्य मिळत नव्हते. संबंधितांचा फेरसर्व्हे करून प्रशासनाने त्यांना ५९ हजार रुपये उत्पन्नाचा दाखला दिला होता. लाभार्थ्यांनी सर्व आवश्यक कागदपत्रे पुरवठा कार्यालयात जमा करूनही त्यांच्या नावांची पात्र यादी जाहीर होत नव्हती. नऊ महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या या प्रक्रियेत लाभार्थी सहा महिन्यांपूर्वीच पात्र ठरले असतानाही प्रत्यक्षात त्यांना धान्य मिळत नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी होती. वारंवार हेलपाटे मारूनही धान्य मिळत नसल्याने राजू बोंद्रे, सतिश मुळीक व नितेश पोवार यांनी या प्रश्नी पुरवठा निरिक्षकांच्या कार्यालयासमोरच ठिय्या आंदोलन केले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत जोपर्यंत यादी जाहीर होत नाही तोपर्यंत हलणार नाही अशी भूमिका घेतली.

या आंदोलनाची दखल घेत पुरवठा निरिक्षकांनी संबंधित अधिकाऱ्यांची कानउघडणी करत सोमवारपर्यंत पात्र लाभार्थ्यांची संपूर्ण यादी जाहीर करण्यात येईल असे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. त्याचबरोबर सोमवारी यादी जाहीर न झाल्यास सर्व लाभार्थ्यांसह पुरवठा कार्यालयातच आणखीन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राजू बोंद्रे यांनी दिला आहे. यावेळी भागातील नागरिक सहभागी झाले होते.

# निपाणी मतदारसंघातील १६ गावांत रस्ते दुरुस्तीसाठी ५४ लाख : आम.जोल्ले

निपाणी,ता.१४ (प्रतिनिधी)–

**निपाणी मतदार संघातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी आम. शशिकला जोल्ले यांच्या विशेष प्रयत्नातून ५४ लाख रुपये मंजूर झाले असून एकूण १६ गावांमध्ये रस्ते दुरुस्तीच्या कामाची सुरुवात झाली आहे.**



निपाणी मतदारसंघाच्या विकासासाठी कायमच कटिबद्ध असलेल्या आमदार जोल्ले यांनी प्रत्येक गावामध्ये या कामास चालना दिली आहे सदर रस्ते देखभाल व दुरुस्ती कामामध्ये आडीमध्ये ६.५ कि.मी. रस्त्यासाठी ५.२३ लाख रुपये, जैनवाडीमध्ये ८ किमी रस्त्यासाठी ६.४७ लाख रुपये, सिदनाळमध्ये ५ कि.मी. रस्त्यासाठी २.६८ लाख रुपये, अक्कोळमध्ये ४ कि.मी. रस्त्यासाठी २.८० लाख रुपये, निपाणी मध्ये ३ कि.मी. रस्त्यासाठी एक लाख ६१ हजार रुपये, शिरगुप्पीमध्ये ६ कि.मी. रस्त्यासाठी ३.२१ लाख रुपये,शेंडूरमध्ये २.५० कि.मी. रस्त्यासाठी १.३४ लाख रुपये, कसनाळमध्ये २.५० कि.मी. रस्त्यासाठी २.४३ लाख रुपये, बोरगावमध्ये २.५० कि.मी. रस्त्यासाठी २.४३ लाख रुपये, शिरदवाडमध्ये ३ कि.मी. रस्त्यासाठी २.९२ लाख रुपये, बेडकीहाळमध्ये ४.५० कि.मी. रस्त्यासाठी ४.३८ लाख रुपये, जत्राटमध्ये ३ कि.मी. रस्त्यासाठी २.९२ लाख रुपये, बेनाडीमध्ये ४.५० कि.मी. रस्त्यासाठी ४.३८ लाख रुपये, हंचिनाळमध्ये ४.५० कि.मी. रस्त्यासाठी ४.३८ लाख रुपये,कोगनोळीमध्ये ३.५० कि.मी. रस्त्यासाठी ३.४० लाख रुपये, मत्तिवडे गावामध्ये ३.४४ कि.मी. रस्त्यासाठी ३.३५ लाख रुपये.अशा १६ गावांना ६६.४४ कि.मी. रस्ता दुरुस्तीसाठी ५४ लाख रुपये इतका निधी आम.जोल्ले यांनी मंजूर करून आणला.जोल्ले यांनी मानवी हस्तक्षेपामुळे व पावसामुळे खराब झालेल्या थोड्याफार रस्त्यांना पुन्हा दुरुस्ती करून जनसामान्यांची सोय केली आहे.

# शेतकरी सभासदांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा : उत्तम पाटील

बोरगाव,ता.१४(प्रतिनिधी)–

**सहकारी संस्थांमुळे ग्रामीण भागाचा विकास होत असतो.या सहकार तत्त्वावरच ग्रामीण भागातील शेतकरी, ऊस उत्पादक व सभासदांचे कल्याण व्हावे यासाठी बोरगांव विविधोद्धेश प्राथमिक ग्रामीण कृषी सहकारी संघातर्फे विविध योजना हाती घेतल्या आहेत. कर्जदार सभासदांना शासनाच्या सर्व सोयी सुविधा मिळाव्यात व त्यांना योजनेचा लाभ व्हावा यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत.**



आरोग्य विमा योजनेतून मेघा सातपुते यांच्याकडे १ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करताना उत्तम पाटील सोबत प्रदीप माळी,राजू ऐदमाळे, राजेंद्र पाटील आदी.

सभासदांच्या कल्याणकरिता आरोग्य विमा,अपघाती विमा, ० टक्के व्याज दरात कर्ज, पाणी योजना ट्रॅक्टर यासाठी विविध कर्ज योजना हाती घेतल्या जात असून शेतकरी सभासदांनी सर्व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी संघाचे चेअरमन उत्तम पाटील यांनी केले.

बोरगाव येथे कृषी संघात, संघाचे कर्जदार सभासद संतोष सातपुते यांचे नैसर्गिक निधन झाले होते.आरोग्य विमा योजनेतून त्यांच्या वारसदार मेघा सातपुते यांच्याकडे १ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.उत्तम पाटील यानी, संस्थेतर्फे कर्जदार सभासदांसाठी फिनहॅट इन्शुरन्स कंपनीकडून कर्जदार सभासदांसाठी विमा उतरण्यात आला आहे.नैसर्गिक मृत्यू झाल्यास १ लाख रुपये मिळतात, असे सांगितले.

यावेळी उद्योजक अभिनंदन पाटील,उपाध्यक्ष सुमित रोड्ड, संचालक प्रदीप माळी, राजू ऐदमाळे, राजेंद्र पाटील, दर्शन पाटील, सुरेश बंकापुरे, राजू गजरे,अशोक माळी,संस्थेचे सीईओ रावसाहेब चौगुले, राकेश फिरगनवर उपस्थित होते.



विद्यापीठस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत बक्षिस स्विकारताना डीकेटीईचे विद्यार्थी.

# विद्यापीठस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत डीकेटीईच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

इचलकरंजी,ता. १४ –

**डीकेटीईच्या टेक्स्टाईल अँण्ड इंजिनिअरींग इन्स्टियूटच्या पुरुष व महिला बुध्दीबळ संघाची विद्यापीठस्तरीय झोनल स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. या विद्यार्थ्यांची इंटर झोनल बुध्दीबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

डॉ.ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (गडहिग्लज) येथे झालेल्या स्पर्धेत डीकेटीईच्या संघानी उपविजेतेपदाचे बक्षिस संपादन केले. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी डीकेटीईकडून वेळोवेळी प्रोत्साहन देण्यात येते. येथील विद्यार्थी अशा स्पर्धेमध्ये विविध कलागुणांचे सादरीकरण करुन स्पर्धेमध्ये ठसा उमटवतात. यामुळेच इचलकरंजी आणि डीकेटीईचे नांव विविध स्पर्धेमध्ये सन्मानाने घेतले जाते.

विजयी पुरुष संघामध्ये तन्मय पवार, विहान नरगुंडे, युग भराडिया, प्रणव पाटणी, शार्दुल राखुंडे,तर महिला संघामध्ये दिशा पाटील, शिवानी जमखंडी, आकांक्षा कुंजतवाड, स्वरा दमुगडे व सलोनी नार्वेकर यांचा सहभाग होता.

संघास संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, उपाध्यक्ष प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ.सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व विश्वस्त यांचे प्रोत्साहन तर प्रा. डॉ. एल.एस. आडमुठे, डॉ.यु. जे. पाटील, ओंकार खानाज यांचे मार्गदर्शन लाभले.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस.याना जलजीवन मिशन संदर्भात नवीन देताना विनोद कोराणे व सहकारी.

# डिसेंबर अखेर तारदाळ खोतवाडी गावांना पाणी द्या: विनोद कोराणे

तारदाळ,ता.१४ (वार्ताहर)–

**तारदाळ – खोतवाडी संयुक्त जलजीवन योजनेच्या प्रलंबित कामाची पाहणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस.यांनी सामाजिक कार्यकर्ते विनोद कोराणे यांच्या उपोषणाची दखल घेत १२ सप्टेंबर रोजी प्रत्यक्षस्थळी केली होती.**

यावेळी त्यांनी संबंधित मक्तेदार व अधिकारी यांना वेळेत काम पूर्ण करण्याच्या सक्त सूचना दिल्या होत्या. त्यावेळी विनोद कोराणे यांच्या उपोषणाला यश मिळाले. त्यानंतर तारदाळमधील जलकुंभ व इतर योजनेच्या कामाला त्वरीत गती मिळाल्याने सदरची योजना मार्गी लागणार अशी अपेक्षा स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केली. या अनुषंगाने कोराणे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस.यांना शुक्रवारी समक्ष भेटून त्यांचे आभार मानले.तसेच डिसेंबर २०२५ अखेर सदर योजनेची कामे पूर्ण करून एक दिवस आड दोन्ही गावांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा अन्यथा पुन्हा पाण्यासाठी जन आंदोलन छेडण्याचा इशारा कोराणे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# मद्यधुंद चालकाची दोन रिक्षांना धडक

कोल्हापूर, ता.१४ (प्रतिनिधी)–

**मद्यधुंद अवस्थेतील भरधाव कार चालकाने गजबजलेल्या गंगावेश चौकात दोन रिक्षांना जोरदार धडक दिल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. या अपघातात रिक्षातील प्रवासी अनिल भोसले (रा. पंढरपूर) हे गंभीर जखमी झाले.**

रंकाळा स्टँडकडून गंगावेशकडे भरधाव वेगाने येत असलेल्या सहदेव पाटील या कारचालकाने (मद्यधुंद अवस्थेत) गंगावेश चौकात पोहोचताच राजू ठोंबरे यांच्या रिक्षाला आणि महंमद खान जबर धडक दिली. धडकेत दोनही रिक्षांचे मोठे नुकसान झाले.अपघातानंतर परिसरातील व्यावसायिक, वाहनचालक आणि नागरिक संतप्त झाले. त्यांनी मद्यधुंद चालक सहदेव पाटील याला वाहनातून बाहेर खेचून बेदम चोप दिला.

महापारेषण

ई-निविदा सूचना

**एसआरएम निविदा क्र. २६/२०२५-२६ (RFX No. ७०००३८१५७)**

११० के. व्ही. कोथळी उपकेंद्र, ११० के. व्ही. पुईखडी उपकेंद्र आणि ११० के.व्ही. राधानगरी उपकेंद्र, जिल्हा कोल्हापूर येथील दैनंदिन देखभालीची स्थापत्य कामे करणे.

**अंदाजित रक्कम रु.** १३,६९,२४६.००

**निविदा सादर करण्याची अंतिम तारीख:** १४/११/२०२५ (११.००) ते २९/११/२०२५ (११.००)

**टीप :** सदरच्या कामाची फेरनिविदा करणेची गरज पडलेस वृत्तपत्रांमध्ये पुन्हा प्रसिद्ध करणेत येणार नाही. पुढील प्रक्रियेकरिता इच्छुक निविदा सादर करणाऱ्यांनी महापारेषण कंपनीच्या वेबसाईटला भेट द्यावी.

अधिक माहितीसाठी वेबसाईटला भेट द्या **https://srmetender.mahatransco.in**

**कार्यकारी अभियंता (स्था), अउदा स्था बांध नि सु. विभाग, कोल्हापूर**

महावितरण

ई–निविदा (प्रथम मुदतवाढ)

म.रा.वि.वि.कं.मर्या; कोल्हापूर शहर विभाग कार्यालयांतर्गत MIDC शिरोली करिता(24 x 7 Hrs – Bolero/ Equivalent) १ वर्षांसाठी ई–निविदा **EE/KPU/Vehicle/24x7 MIDC/T-14/2025-26** म.रा.वि.वि.कं.मर्या; च्या http://works.mahadiscom.in/eTender/etender या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली आहे. तरी सदर निविदेला **दि.२०.११.२०२५ पर्यंत प्रथम मुदतवाढ** देणेत आलेली आहे. तरी संबंधितांनी नोंद घ्यावी.
कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक –७८७५७६९११२

| अ. क्र. | उपविभाग | ई–निविदा रक्कम(लाखांमध्ये) Excluding GST | निविदा क्र. | निविदा शुल्क (Excluding GST) | इसारा (EMD) रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MIDC शिरोली 24 x 7 Hrs | 6.00 (1 वर्षांसाठी) | EE/KPU/Vehicle/24x7 MIDC/T-14/ 2025-26 | 1000.00 | 6000.00 |

PR NO. PRO/KOPZ/196/2025-26

कार्यकारी अभियंता, शहर विभाग, कोल्हापूर

महावितरण

जाहीर आवाहन

महावितरणच्या वीज ग्राहकांना तत्पर सेवा देता यावी व कामांमध्ये सुसूत्रता यावी या दृष्टीने इचलकरंजी विभागातील अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या कामाची पुनर्रचना (Restructuring) करण्यात आलेली आहे.

महावितरणच्या विज ग्राहकांनी विज पुरवठ्याच्या तक्रारी संबंधित महावितरण ॲपद्वारे किंवा मिस कॉल क्रमांक ०२२–५०८९७१०० त्याचप्रमाणे महावितरणच्या टोल फ्री क्रमांक १८००–२१२–३४३५ / १८००–२३३–३४३५ / १९१२ वर संपर्क करावा.

| अ.क्र. | उपविभागाचे पुनर्रचने पूर्वीचे नाव | उपविभागाचे पुनर्रचने नंतरचे नाव | पुनर्रचने नंतरचा कार्यालयाचा पत्ता | अधिकाऱ्यांचे नाव, पदनाम व मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|
| १) | १) अ उपविभाग २) ब उपविभाग इचलकरंजी | संचलन व सुव्यवस्था उपविभाग | सुंदर बागेजवळ, इचलकरंजी. | श्री.प्रसाद पभाकर अवघडे अति.कार्यकारी अभियंता –७८७५९३५८५३ |
| | | देयके व महसूल उपविभाग | स्टेशन रोड, इचलकरंजी. | श्री. सारंग श्री. हातोळकर अति.कार्यकारी अभियंता ७८७५९३७५२५ |

तसेच ग्राहक या परिसरात राहतो तेथील संबंधित २४ X ७ तक्रार निवारण करणाऱ्या संबंधित कर्मचारी यांची परिसरनिहाय भ्रमणध्वनी क्रमांकाची यादी खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | उपविभाग | शाखा कार्यालय | शाखा कार्यालयांतर्गत येणारा परिसर | विज पूरवठा खंडीत तक्रार निवारण केंद्र व भ्रमणध्वनी क्र. | शाखाधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | संचलन व सुव्यवस्था उपविभाग इचलकरंजी श्री. प्रसाद प्रभाकर अवघडे, ७८७५९३५८५३ | उत्तर | आवळे गल्ली, जाधव मळा, वेताळ पेठ, कुंभार गल्ली , गोसावी गल्ली, पोलीस स्टेशन, शिवाजी नगर, प्रांत ऑफिस, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा. | १. ग्राहक तक्रार निवारण केंद्र पूर्व, पश्चिम, उत्तर, मध्य शाखा कार्यालय ७८७५९३५०९९ | श्री. अमोल प्रमोद पांढरे ७८७५९३६८१४ (सहाय्यक अभियंता, विज पुरवठा) श्री. केतन किरण पोवार ७८७५९३६०२० (सहाय्यक अभियंता, विज वाहिनी) |
| | | पूर्व | मंगळवार पेठ, आसरानगर, पाटील मळा, एलाज मळा, शिक्षक कॉलनी, मधुरा नगर, नारायण मळा , बिग बजार, मगदूम मळा, वृंदावन कॉलनी, टाकवडे रोड. | | |
| | | पश्चिम | लिंबू चौक, पुजारी मळा, कागवाडे मळा, तांबे मळा, चंदूर रोड, किसान रोड, लायकर मळा, लक्ष्मी व्यंकटेश नगर. | | |
| | | मध्य | गावभाग, नदीवेस, गुजरी पेठ, वखारभाग. | | |
| | | कबनूर | कोल्हापूर नाका, सहारा नगर, दत्त नगर, दावत नगर, धुळेश्वर नगर, तिरंगा कॉलनी, भोने माळ, यशवंत कॉलनी, कबनूर गाव, फॅक्टरी रोड | २.ग्राहक तक्रार निवारण केंद्र (कबनूर शाखा का.) ७८७५७६९३२० | श्री. विनोद गणपती लोटके ७८७५९३९३६० (सहाय्यक अभियंता, विज पुरवठा) श्री. पुंडलिक बाबुराव कुंभार ७८७५९३८८७३ (सहाय्यक अभियंता, विज वाहिनी) |
| | | शहापूर | कोरोची, खंजीरे इस्टेट, गणेश नगर गल्ली नं ६ ते ९. | ३.ग्राहक तक्रार निवारण केंद्र (शहापूर शाखा का.) ७८७५९३५५०० | |
| | | शहर | इचलकरंजी इंड इस्टेट, भाजी मार्केट, आयजीएम, गोकुळ चौक, शाहु पुतळा, ए.एस.सी. कॉलेज. | ४.ग्राहक तक्रार निवारण केंद्र (शहर/विकासनगर/जवाहरनगर ) ७८७५७६९३२२ | |
| | | विकासनगर | वर्धमान चौक, स्टाईल अप टेलर, मंगलमुर्ती टॉकिज, गैबान हाऊस, जाधव पेट्रोल पंप, विकासनगर, विक्रमनगर. | | |
| | | जवाहरनगर | गणेश नगर गल्ली नं १ ते ५, जवाहरनगर, गणपती कट्टा, माताळ गल्ली, लिगाडे मळा, डॉ. अरुण पाटील दवाखाना, शास्त्री सोसायटी, हवामहल, मराठा चौक, ठाकरे चौक, स्वामी अपार्टमेंट, केटकाळे नगर, भारत माता हौ. सोसायटी, डेक्कन चौक, आंबेडकर नगर, स्टेशन रोड | | |

महावितरणच्या विज ग्राहकांनी विज पुरवठ्याच्या तक्रारी संबंधित महावितरण ॲपद्वारे किंवा मिस कॉल क्रमांक ०२२–५०८९७१०० त्याचप्रमाणे महावितरणच्या टोल फ्री क्रमांक १८००–२१२–३४३५ / १८००–२३३–३४३५ / १९१२ वर संपर्क करावा. तसेच ग्राहक या परिसरात राहतो तेथील संबंधित विज बिल तक्रार निवारण करणाऱ्या संबंधित कर्मचारी यांची परिसरनिहाय भ्रमणध्वनी क्रमांकाची यादी खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | उपविभाग | शाखा कार्यालय | शाखा कार्यालयांतर्गत येणारा परिसर | शाखाधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|
| २ | महसूल व देयके उपविभाग इचलकरंजी श्री. सारंग श्री. हातोळकर, ७८७५९३७५२५ | उत्तर | आवळे गल्ली, जाधव मळा, वेताळ पेठ, कुंभार गल्ली , गोसावी गल्ली, पोलीस स्टेशन, शिवाजी नगर, प्रांत ऑफिस, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा. | श्री. कुणाल अनिल माळवदे, सहाय्यक अभियंता, महसूल व देयके Team I ७८७५९३७०६१ |
| | | पूर्व | मंगळवार पेठ, आसरानगर, पाटील मळा, एलाज मळा, शिक्षक कॉलनी, मथुरा नगर, नारायण मळा , बिग बजार, मगदूम मळा, वृंदावन कॉलनी, टाकवडे रोड. | |
| | | पश्चिम | लिंबू चौक, पुजारी मळा, कागवाडे मळा, तांबे मळा, चंदूर रोड, किसान रोड, लायकर मळा, लक्ष्मी व्यंकटेश नगर. | |
| | | मध्य | गावभाग, नदीवेस, गुजरी पेठ, वखारभाग. | |
| | | जवाहरनगर | गणेश नगर गल्ली नं १ ते ५, जवाहरनगर, गणपती कट्टा, माताळ गल्ली, लिगाडे मळा, डॉ. अरुण पाटील दवाखाना, शास्त्री सोसायटी, हवामहल, मराठा चौक, ठाकरे चौक, स्वामी अपार्टमेंट, केटकाळे नगर, भारत माता हौ. सोसायटी, डेक्कन चौक, आंबेडकर नगर, स्टेशन रोड | श्री. संतोषकुमार जगोंडा पाटील, सहाय्यक अभियंता, देयके व महसूल Team I ७८७५९३८२०२ (शहापुर व जवाहरनगर शाखा कार्यालय) |
| | | शहापूर | कोरोची, खंजीरे इस्टेट, गणेश नगर गल्ली नं ६ ते ९. | |
| | | शहर | इचलकरंजी इंड इस्टेट, भाजी मार्केट, आयजीएम, गोकुळ चौक, शाहु पुतळा, ए.एस.सी. कॉलेज. | स्नेहल शहाजी पाटील सहाय्यक अभियंता, देयके व महसूल Team (Additional) ७८७५९३७६३१ |
| | | विकासनगर | वर्धमान चौक, स्टाईल अप टेलर, मंगलमुर्ती टॉकिज, गैबान हाऊस, जाधव पेट्रोल पंप, विकासनगर, विक्रमनगर. | |
| | | कबनूर | कोल्हापूर नाका, सहारा नगर, दत्त नगर, दावत नगर, धुळेश्वर नगर, तिरंगा कॉलनी, भोने माळ, यशवंत कॉलनी, कबनूर गाव, फॅक्टरी रोड | |
| ३ | ग्रामिण उपविभाग, इचलकरंजी श्री. सुनिल बाबुराव चौगुले ७८७५७६९३३१ | यड्राव | तारदाळ, खोतवाडी, यड्राव | श्री. संदिप अधिकराव थोरात सहाय्यक अभियंता ७८७५९३४५५० |
| | | चंदुर | रुई, चंदुर | श्री. युवराज रामचंद्र वाघ सहाय्यक अभियंता ७८७५९३५२४६ |
| | | अब्दुललाट | शिरदवाड, शिवनाकवाडी, अब्दुललाट, लाटवाडी | श्री. अभिजीत दिनकर लोखंडे सहाय्यक अभियंता ७८७५९३४९४० |
| | | साजणी | माणगाव, तिळवणी, साजणी | श्री. प्रमोद अशोक सोनावणे सहाय्यक अभियंता ७८७५७६९३३७ |

PRO/ KOPZ/194/25-26

कार्यकारी अभियंता, इचलकरंजी विभाग

दैनिक
महासत्ता
शनिवार,ता. १५ नोव्हेंबर २०२५
SPORTS



# कसोटी संघातून रिलीज करा

## कुलदीप यादवची बीसीसीआयकडे मागणी

नवी दिल्ली,ता.१४-

**भारतीय संघ सध्याच्या घडीला दक्षिण आफ्रिकेविरूद्ध कसोटी मालिका खेळत आहे. यानंतर दोन्ही संघांमध्ये वन डे आणि टी-२० मालिकाही खेळवली जाणार आहे. कसोटी मालिकेत कुलदीप यादव संघाचा भाग आहे. तर वन डे सामन्यात व टी-२० विश्वचषकाचा विचार करता कुलदीप या दोन्ही मालिकांमध्ये खेळण्याची शक्यता आहे, पण यादरम्यान त्याने कसोटी संघातून रिलीज करावे,असा बीसीसीआयकडे अर्ज केला आहे.**

चायनामग गोलंदाज कुलदीप यादव भारतीय संघाचा नंबर वन फिरकीपटू आहे. कुलदीपने अनेक सामन्यांमध्ये मॅचविनिंग गोलंदाजी करत सामन्याचा रोख बदलला आहे. इंग्लंड दौऱ्यावर एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नसली तरी त्यानंतर त्याने पुनरागमन करत सामनावीराचा पुरस्कार पटकावला.यानंतर दक्षिण आफ्रिकेविरूद्ध भारताला दुसरा कसोटी सामना खेळायचा आहे. यादरम्यान कुलदीपने सुट्टीसाठी बीसीसीआयने अर्ज केला आहे.या महिन्याच्या अखेरीस कुलदीप यादव लग्न करणार असून यासाठी त्याने अर्ज केला आहे.भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळे इंडियन प्रीमियर लीग २०२५ नियोजित तारखेपेक्षा उशिरा संपल्यामुळे त्याचे लग्न पुढे ढकलावे लागले होते.

कुलदीपने नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यासाठी सुट्टीची विनंती केली आहे. भारत २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटीत दक्षिण आफ्रिकेविरूद्ध दुसरा कसोटी सामना खेळणार आहे, तर दोन्ही संघांमधील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला ३० नोव्हेंबरला रांचीमधून सुरूवात होणार आहे. कुलदीपच्या सुट्टीवर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

# बुमराहने दक्षिण आफ्रिकेला रडवले

## पहिला डाव सर्वबाद १५५ धावांत आटोपला : भारतीय गोलंदाजांचे वर्चस्व

कोलकाता,ता.१४-

**भारत - दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिकेतील पहिला सामना कोलकातामधील ईडन गार्डन्स मैदानात खेळला जात आहे. पण हिवाळा असल्याने लवकर अंधार पडत आहे.त्यामुळे पहिला दिवसाचा खेळ लवकर थांबवण्यात आला.**

दरम्यान, पहिल्या दिवसावर भारतीय



गोलंदाजांचे वर्चस्व राहिले. भारतीय गोलंदाजांनी पहिल्याच दिवशी पहिल्या दोन सत्रात टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेला पहिल्या डावात १५५ धावांवर रोखले. त्यानंतर तिसऱ्या सत्रात भारतीय संघ फलंदाजीला उतरला होता. भारताने पहिला दिवस संपला, तेव्हा २० षटकात १ बाद ३७ धावा केल्या.पहिल्या दिवसाअखेर भारत दक्षिण आफ्रिकेपेक्षा १२२ धावांनी पिछाडीवर आहे.

भारताकडून यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल यांनी डावाची सुरुवात केली होती. या दोघांनीही संयमी सुरुवात केली होती. कारण भारताप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनाही खेळपट्टीकडून मदत मिळत होती. पण ७ व्या षटकात मार्को यान्सिनने १२ धावांवर यशस्वी जैस्वालला त्रिफळाचीत केले.पण नंतर केएल राहुलला वॉशिंग्टन सुंदरची चांगली साथ मिळाली. या दोघांनी दिवसाचा खेळ संपेपर्यंत विकेट जाऊ दिली नाही. केएल राहुल ५९ चेंडूत १३ धावांवर नाबाद आहे, तर वॉशिंग्टन सुंदर ३८ चेंडूत ६ धावांवर नाबाद आहे.तत्पुर्वी, दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. दक्षिण आफ्रिकेकडून एडेन मार्करम आणि रायन रिकल्टन यांनी सलामीला ५७ धावांची भागीदारी करत सुरुवात चांगली केली होती. पण रिकल्टन २३ धावांवर बाद झाला, तर मार्करम ३१ धावांवर बाद झाला.जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि कुलदीप यादव यांच्या माऱ्यासमोर दक्षिण आफ्रिकेचे फलंदाज फार काही करू शकले नाहीत. रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल यांचीही बुमराह, कुलदीप आणि सिराजला साथ मिळाली.

दक्षिण आफ्रिकेकडून विआन मुल्डर (२४) आणि टोनी डी झोर्झी (२४) यांनीही सुरुवात चांगली केली, पण ते मोठी खेळी करू शकले नाहीत. ट्रिस्टन स्टब्स ७४ चेंडूत १५ धावांवर नाबाद राहिला. पण त्याला बाकी कोणाचीच भक्कम साथ मिळाली नाही.भारताकडून जसप्रीत बुमराहने ५ विकेट्स घेतल्या, तर मोहम्मद सिराज आणि कुलदीप यावव यांनी २ विकेट्स घेतल्या. अक्षर पटेलने १ विकेट घेतली.कर्णधार टेम्बा बावुमा (३) सह पाच फलंदाज दहाच्या पुढेही जाऊ शकले नाहीत.



५ विकेट
२७ धावा
१४ ओव्हर

# बुमराहची मोठ्या विक्रमाला गवसणी

**येथील ईडन गार्डन्सच्या मैदानात रंगलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात जसप्रीत बुमराहने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.१४ षटकात २३ धावा खर्च करताना जसप्रीत बुमराहनं दक्षिण आफ्रिकेचा अर्धा संघ तंबूत धाडला. डाव आहे. रेड बॉल क्रिकेटमध्ये पहिल्या दिवशी पाच विकेट्स हॉलचा साधणारा तो पहिला भारतीय जलदगती गोलंदाज ठरला याआधी इशांत शर्मा याने कसोटीत अशी कामगिरी केली होती. पण त्याने डे नाईट क्रिकेट सामन्यात हा डाव साधला होता.**

स्टॅन विकेट्सचा बुमराह हा

२००८ मध्ये दक्षिण आफ्रिकेचा जलदगती गोलंदाज डेल याने कसोटी सामन्यात पहिल्या दिवसाच्या खेळात ५ डाव साधला होता. त्यानंतर अशी कामगिरी करणारा जसप्रीत दुसरा गोलंदाज आहे. २०१९ मध्ये इशात किशन याने कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानात डे नाईट कसोटी सामन्यात अशी कामगिरी नोंदवली होती.

जसप्रीत बुमराहने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात पाच विकेट्स घेत भागवत चंद्रशेखर या दिग्गज भारतीय गोलंदाजाशी बरोबरी साधली. भागवत चंद्रशेखर याने ५८ डावात कसोटीत १६ वेळा ५ विकेट्सचा डाव घेतला होता. जसप्रीत बुमराहने ५१ व्या सामन्यात १६ व्या वेळी अशी कामगिरी करून दाखवली आहे. या यादीत आर. अश्विन अव्वलस्थानी आहे. त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीतील १०६ व्या सामन्यात ३७ व्या वेळी पाच विकेट्सचा डाव साधला होता.

प्रतिस्पर्धी संघातील खेळाडूंना सर्वाधिक वेळा बोल्ड करणाऱ्या भारतीय गोलंदाजांच्या यादीत बुमराहने आर. अश्विनला मागे टाकले आहे. आर. अश्विनने कसोटी कारकिर्दीत १५१ विकेट्स या बोल्डच्या रुपात घेतल्या. बुमराहनं रिकल्टनला बोल्ड करत त्याला मागे टाकले.

**भारताकडून सर्वाधिक वेळा पाच विकेट्स घेणारे गोलंदाज**

**३७ - आर. अश्विन (१०६ व्या सामन्यात)**
**३५ - अनिल कुंबळे (१३२ व्या सामन्यात)**
**२५ - हरभजन सिंग (१०३ व्या सामन्यात)**
**२३ - कपिल देव (१३१ व्या सामन्यात)**
**१६- जसप्रीत बुमराह (५१ व्या सामन्यात) / भागवत चंद्रशेखर (५८ व्या व्या सामन्यात)**

**वसीम अक्रमचा विक्रमही मोडला**

देशांविरुद्ध सर्वाधिक वेळा पाच विकेट्स घेणाऱ्या आशिया गोलंदाजांच्या यादीत बुमराहने पाकिस्तानच्या वसीम अक्रमचा विक्रम मोडीत काढत अव्वलस्थान पटकावले आहे. वसीम अक्रमने आपल्या कारकिर्दीत ७५ डावात १२ वेळा दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया विरुद्ध पाच विकेट्सचा डाव साधला होता. बुमराहने १३ व्या वेळी ही कामगिरी करून दाखवली आहे.



## सैयद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी

# तमिळनाडूच्या कर्णधारपदी वरुण चक्रवर्तीची वर्णी

नवी दिल्ली,ता.१४-

**सैयद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५-२६ साठी तमिळनाडूच्या कर्णधारपदी भारतीय फिरकीपटू वरुण चक्रवर्ती याची नियुक्ती करण्यात आली आहे. ही स्पर्धा २६ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून तमिळनाडू आपला पहिला सामना राजस्थानविरुद्ध खेळणार आहे. नारायण जगदीसन संघाचा उपकर्णधार असेल. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी २० मालिकेत चक्रवर्ती यांने उत्कृष्ट कामगिरी करत तीन डावांमध्ये एकूण ५ बळी घेतले होते.**

भारतातर्फे ४ वनडे सामन्यांत १० बळी आणि २९ टी २०सामन्यांत ४५ बळी मिळवलेल्या चक्रवर्ती याने २७ लिस्ट-ए सामन्यांत ६९ बळी घेतले आहेत. तसेच, एकमेव फर्स्ट-क्लास सामन्यात त्याने १ बळी मिळवला. भारताचा डावखुरा वेगवान गोलंदाज टी. नटराजन आणि गुरजपनीत सिंह यांनाही संघात स्थान देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आर. सिलंबरासन,आर.साई किशोर आणि एम. सिद्धार्थ यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे.सैयद मुश्ताक अली ट्रॉफीत तमिळनाडूचा संघ एलीट गट डी मध्ये आहे. या गटात तमिळनाडूसह दिल्ली, उत्तराखंड, राजस्थान, कर्नाटक, त्रिपुरा, सौराष्ट्र आणि झारखंड यांच्या संघांचाही समावेश आहे.

**तमिळनाडू संघ (सैयद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५-२६):** वरुण चक्रवर्ती (कर्णधार), नारायण जगदीसन (उपकर्णधार/यष्टिरक्षक), तुषार रहेजा (यष्टिरक्षक), व्ही.पी. अमित सात्विक, एम. शाहरूख खान, आंद्रे सिद्धार्थ, प्रदोष रंजन पॉल, शिवम सिंह, आर. साई किशोर, एम. सिद्धार्थ, टी. नटराजन, गुरजपनीत सिंह, ए. इसाक्कीमुथु, आर. सोनू यादव, आर. सिलंबरासन आणि एस. रितिक ईश्वरन (यष्टिरक्षक).

# केकेआर संघाच्या गोलंदाजी प्रशिक्षक पदी टिम साउदी

मुंबई,ता. १४ -

**इंडियन प्रीमियर लीगच्या १९व्या हंगामापूर्वी डिसेंबरमध्ये मिनी ऑक्शन होणार आहे. शनिवारी आयपीएलची रिटेन्शन लिस्ट जाहीर होण्याआधी कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) संघाने मोठे पाऊल उचलले आहे. गुरुवारी शेन वॉटसन यांच्या नियुक्तीनंतर, शुक्रवारी संघाने घोषणा केली की टिम साउदी यांची गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**



केकेआरने अभिषेक नायर यांना मुख्य प्रशिक्षक म्हणून निवडले असून त्यांनी चंद्रकांत पंडित यांची जागा घेतली आहे. गुरुवारी फ्रँचायझीने जाहीर केले होते की, ऑस्ट्रेलियाचे माजी अष्टपैलू शेन वॉटसन यांना सहाय्यक प्रशिक्षक नेमण्यात आले आहे. आता आणखी एका परदेशी प्रशिक्षकाच्या रूपात टिम साउदी केकेआर मध्ये परतले आहेत. ते या फ्रँचायझीसाठी ३ वर्षे खेळले होते.

साउदी म्हणाले, केकेआर मला नेहमी घरासारखे वाटले आहे आणि या नव्या भूमिकेत परत येणे हा माझ्यासाठी सन्मान आहे. फ्रँचायझीची संस्कृती अद्‌भूत आहे, फॅन्स उत्साही आहेत आणि खेळाडूंचा एक उत्कृष्ट गट आहे. मी गोलंदाजांसोबत काम करण्यास आणि आयपीएल २०२६ मध्ये संघाला यश मिळवून देण्यासाठी उत्सुक आहे.

साउदीने २०२१ ते २०२३ दरम्यान केकेआरसाठी १४ सामने खेळले असून १९ बळी घेतले आहेत. २०२२चा हंगाम त्यांच्यासाठी विशेष ठरला होता. ९ सामन्यांत १४ विकेट्स घेतल्या होत्या. ते सीएसके, राजस्थान रॉयल्स, मुंबई इंडियन्स आणि आरसीबीसाठीही खेळले आहेत. आयपीएल मध्ये त्यांनी ५४ सामने खेळून ४७ बळी घेतले आहेत.

# भारताचा युएईवर दणदणीत विजय; सुर्यवंशीचे दमदार शतक

डोहा,ता.१४-

**आशिया चषक रायझिंग स्टारमधील पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने मोठा विजय मिळवला आहे. भारताच्या अ संघाने वैभव सूर्यवंशी व कर्णधार जितेश शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर युएई संघावर तब्बल १४८ धावांनी विजय मिळवला. गोलंदाजीत गुर्जपनीत सिंगने ३ विकेट्स घेतल्या. तर भारताच्या इतर गोलंदाजांनीही त्याला चांगली साथ दिली. भारताचा आता पुढील सामना पाकिस्तान अ संघाविरूद्ध होणार आहे.**

भारतीय संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशीचे शतक व जितेश शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर भारताने २० षटकांत ४ बाद २९७ धावा केल्या. प्रत्युत्तरात युएईचा संघ ६ बाद १५० धावाच करू शकला. यासह भारताने १४८ धावांनी मोठ्या विजयाची नोंद केली.



युएईचा संघ २९८ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला. युएईच्या सलामीवीरांना हर्ष दुबे व गुर्जपनीत सिंगने माघारी धाडले. तर सोहेब खानने ४१ चेंडूत ३ चौकार, ६ षटकारांसह ६३ धावांची झटपट खेळी केली. याशिवाय कोणताच फलंदाज ३० धावाही करू शकला नाही. भारताकडून गुर्जपनीत सिंगने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. गुर्जपनीतने ४ षटकांत १८ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तर हर्ष दुबेने २ विकेट्स आणि रमणदीप, यश ठाकूरने प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारतीय संघाने २९७ धावांचा डोंगर उभारला. वैभव सूर्यवंशीने एकट्याने १४४ धावांची खेळी केली.

वैभवने ३२ चेंडूत शतक झळकावल्यानंतर ४२ चेंडूत ११ चौकार व १५ षटकारांसह १४४ धावा केल्या. यानंतर नमन धीरने २३ चेंडूत ३ चौकार, २ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. तर कर्णधार जितेश शर्माने ३२ चेंडूत ८ चौकार व ६ षटकारांसह झटपट ८३ धावा करत संघाला मोठी धावसंख्या गाठण्यात मदत केली. याशिवाय भारताकडून नेहाल वधेराने १४ धावा, रमणदीपने नाबाद ६ धावा व प्रियांश आर्यने १० धावा केल्या.

आशिया चषक रायझिंग स्टार २०२५ मध्ये भारताचा पुढील सामना पाकिस्तान अ संघाविरूद्ध होणार आहे. हा सामना १६ नोव्हेंबरला भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होणार आहे.



# हवालदार इब्राहिम अरभावी यांना ॲथलेटिक्समध्ये दोन कांस्य

मिरज,ता.१४ (प्रतिनिधी)-

**चेन्नई येथे झालेल्या एशियन मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत गुन्हे अन्वेषण शाखा, लोहमार्ग पुणे, युनिट मिरज येथील हवालदार इब्राहिम अरभावी यांना दोन कांस्यपदके प्राप्त झाली. त्यांची साऊथ कोरिया येथे २०२६ मध्ये होणाऱ्या वर्ल्ड मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली.**

स्पर्धेत लांब उडी, ११० मीटर अडथळ्यांची शर्यत या दोन क्रीडा प्रकारांमध्ये त्यांना कांस्यपदके मिळाली आहेत. या स्पर्धेत २२ देशांमधील सुमारे ३ हजार ६०० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

इब्राहिम अरभावी मिरजेतील जिल्हा क्रीडा संकुल येथे सराव करतात. त्यांना पुणे लोहमार्ग पोलीस दलाच्या पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक रोहिदास पवार, पुणे लोहमार्ग एलसीबीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब अंतरकर, मिरज लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक रुपाली गोरड याचे प्रोत्साहन मिळाले.

# मुंबई उपनगर,पुणे,अमरावती,वर्धा,कोल्हापूर, नाशिकची आगेकूच

## सांगली जिल्ह्याच्या पुरुष- महिला संघांची विजयी सलामी

ईश्वरपूर,ता.१४ (प्रतिनिधी) -

**लोकनेते राजारामबापू पाटील वरिष्ठ गट पुरुष व महिला राज्य अजिंक्य पद व्हॉलीबॉल स्पर्धेच्या पहिल्या दिवसाच्या खेळात पुरुषांमध्ये मुंबई उपनगर,पुणे,अमरावती व वर्धा या संघांनी,तर महिलांमध्ये पुणे,कोल्हापूर आणि नाशिक संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर मात करीत पुढे वाटचाल केली. सांगली जिल्ह्याच्या पुरुष व महिला संघांनी अनुक्रमे रायगड व बीड या संघांना सहज पराभूत करून विजयी सलामी दिली.**

महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष प्रतिक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांगली जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनतर्फे उरूण ईश्वरपूर (ता.वाळवा) येथे चार दिवसीय राज्यस्तरीय स्पर्धा आयोजिली आहे.

पुरुषांच्या परभणी जिल्हा विरुद्ध अकोला जिल्हा संघातील सामना चुरशीचा झाला. परभणीने पहिला सेट २५-२१ ने जिंकला,तर अकोलाने २५-



१८ ने दुसरा सेट जिंकत सडेतोड उत्तर दिले. मात्र परभणीने १५-१२ ने तिसरा सेट जिंकत अकोलावर मात केली. सांगली जिल्हा संघाने रायगड संघास २५-४,२५-१५ गुणांनी,तर वर्धा संघाने अहिल्यानगर संघास २५-६,२५-६ गुणांनी सरळ मात दिली.

पुणे संघाने लातूर संघास २५-११,२५-२४ गुणांनी,अमरावती संघाने सातारा संघास २५-११,२५-२०गुणांनी,मुंबई उपनगर संघाने नाशिक संघास २५-४,२५-१० गुणांनी, कोल्हापूर संघाने नांदेड संघास २५-१७, २५-१९ गुणांनी,अहिल्यानगर संघाने वाशीम संघास २५-९,२५-१० गुणांनी,छत्रपती संभाजीनगर संघाने २५-२२,२५-१४ गुणांनी, चंद्रपूर संघाने हिंगोली संघास २५-१३,२५-१४ गुणांनी पराभूत केले. महिलांच्या गोंदिया विरुद्ध जळगाव,तसेच नाशिक विरुद्ध बीड या संघातील सामने चांगलेच रंगतदार झाले. गोंदिया व नाशिक संघानी दोन सेट जिंकत विजय प्राप्त केला. सांगली संघाने २५-६,२५-१० गुणांनी बीड संघावर सहज विजय मिळविला. पुणे संघाने अहिल्यानगर संघावर २५-१३, २५-८ गुणांनी, मुंबई शहर संघाने लातूर संघावर २५-१९, २५-१७ गुणांनी,कोल्हापूर संघाने मुंबई उपनगर संघावर २५-१३, २५-२० गुणांनी, वर्धा संघाने अहिल्यानगर संघावर २५-१८, २५-२० गुणांनी,मुंबई शहर संघाने धाराशिव संघावर २५-१६,२५-६ गुणांनी,बीड संघाने गोंदिया संघावर २५-१३,२५-१२ गुणांनी मात केली.पुरुषांचे ८ गट,तर महिलांचे ४ गट असून पहिल्या फेरीत साखळी पध्दतीने सामने खेळविले जात आहेत. शनिवारी उप उपांत्य आणि उपांत्य सामने पाहण्याची संधी क्रीडा प्रेमींना मिळणार आहे.

# सनरायझर्स हैदराबादचा स्टार खेळाडू मोहम्मद शमी 'लखनौ'च्या ताफ्यात

नवी दिल्ली,ता.१४-



**आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू व्हायला आणखी काही महिने शिल्लक आहेत. पण त्याआधी होणाऱ्या आयपीएल स्पर्धेसाठी मिनी ऑक्शन होणार आहे. या लिलावाआधी सर्व संघांना १५ नोव्हेंबरपर्यंत रिटेन आणि रिलीज केलेल्या खेळाडूंची यादी द्यावी लागणार आहे. यादरम्यान खेळाडूंची अदला बदली देखील सुरू आहे. पण आतापर्यंत केवळ शार्दुल ठाकूर अधिकृतरित्या लखनौ सुपर जायंट्स संघातून मुंबई इंडियन्स संघात दाखल झाला आहे. दरम्यान, आणखी एक खेळाडू मोहम्मद शमी अधिकृतरित्या एका संघातून दुसऱ्या संघात गेला आहे.**

मोहम्मद शमी गेल्या हंगामात सनरायझर्स हैदराबाद संघाकडून खेळताना दिसून आला होता. पण माध्यमातील वृत्तानुसार, आगामी हंगामापूर्वी त्याने लखनौ सुपरजायंट्स संघात प्रवेश केला आहे. वर्ल्डकप २०२३ स्पर्धेतील स्टार गोलंदाज मोहम्मद शमी आता भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करत आहे. दुखापतीमुळे संघाबाहेर पडल्यानंतर, तो पुन्हा संघात स्थान मिळवू शकलेला नाही. कसून सराव करून त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आणि संघात स्थान मिळवण्यासाठी दावा केला. पण भारतीय संघात त्याला स्थान मिळालेले नाही. मात्र, आगामी हंगामात तो लखनौ सुपर जायंट्सकडून खेळताना दिसणार आहे.